


# मेहता मराठी ग्रंथजगत


मे, २०१६ । किंमत १५ रुपये

अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला
वाहिलेले
दर्जेदार
मासिक











## आमची वाचनीय पुस्तके









सार्वजनिक वाचनालय, नाशिक
?पु.ना.पंडित पुरस्कार

स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे
डॉ. प्र. न. जोशी
ग्रंथश्रे? ता पुरस्कार

या वर्षी

**श्री. डॉ. संजय ढोले**

प्राध्यापक भौतिकशा?ा विभाग
(पुणे विद्यापीठ)
यांच्या

संक्रमित या

**मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे**

प्रकाशित झालेल्या विज्ञानकथासंग्रहास
जाहीर झाले आहेत.

**हार्दिक अभिनंदन !**

# मेहता मराठी ग्रंथजगत

। मे २०१६ । वर्ष सोळावे । अंक पाचवा ।

**मांडणी-अक्षरजुळणी**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २३८

E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
**सुनील मेहता**

कार्यकारी संपादक
**शंकर सारडा**

अंकाची किंमत **१५ रु.**

वर्गणी
**मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.**

प्रसिद्धी
**दरमहा ११ तारखेस**

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | ११ |
| **पुरस्कार** | ३९ |
| **<u>पुस्तक परिचय</u>** | |
| **तेच दिन सोनेरी...** | ५१ |
| **एका मातेचा लढा** | ६८ |
| **स्मरण** | ८४ |
| **बालनगरी** | ९० |

**डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.**

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय

## तुमचा फोन, तुमचे पुस्तक

पुस्तकांची विक्री वाढावी, पुस्तके सर्वत्र सहज उपलब्ध व्हावीत यासाठी ॲमेझॉन डॉट कॉमची स्थापना झाली. मुद्रित पुस्तकांची बाजारपेठ नवनव्या कल्पनांनी बहरू लागली. मुद्रित पुस्तकांच्या खपात वाढतर झालीच; डिजिटल ई-बुक्सची कल्पनाही ॲमेझॉनने प्रत्यक्षात आणली. पुस्तकांच्या विक्रीतून पुरेशी कमाई होत नाही हे लक्षात आल्यावर ॲमेझॉनने पुस्तकांच्या बरोबर संगीत, कॅसेट्स गेम्स (क्रिडासाहित्य) एवढेच नव्हे तर किराणा मालाची विक्री सुरू केली. ॲमेझॉनची उलाढाल वाढली. पुस्तकांच्या माध्यमातून सुरुवात करून ॲमेझॉन सर्व प्रकारच्या रिटेल स्टोअर्सचा जगातील एक प्रमुख आउटलेट बनला.

त्या पुढचा टप्पा म्हणजे किंडल रीडर. ई-बुक्सबरोबर संगणक, मोबाईल, आयफोन, आयपॅड, आयपॉड वगैरे साधनांवर कुठलेही पुस्तक वाचणे सुलभ झाले. किंडलने लाखो पुस्तके वाचकांना उपलब्ध करून दिली. गुगलने लाखो पुस्तके स्कॅन करून वाचकांना सहजपणे मिळू शकतील अशी व्यवस्था निर्माण केली. किंडलसारखे डेडिकेटेड (एकच काम करणारे) साधन वाचकाला बंधनकारक वाटू नये, कुठल्याही इलेक्ट्रॉनिक, डिजिटल माध्यमाच्या पडद्यावर ते वाचता यावे अशी सुविधा, यामुळे वाचनाचा आणि पुस्तकाचा एकूण ढाचाच बदलला. पुस्तक प्रकाशकांबरोबर इतरही नवे तंत्रज्ञ पुस्तकांच्या बाजारपेठेत घुसले. पारंपरिक मुद्रित पुस्तकांना असणाऱ्या छपाई-टाइप-मांडणी-बांधणी, वगैरे मर्यादा असत. त्या मर्यादा ई-पुस्तकांनी झुगारून दिल्या. पेपरलेस, बुकलेस ग्रंथालये, ई-लर्निंग, ई-गव्हर्नन्स, ई-पब्लिशिंग इत्यादी एकापेक्षा एक बदल घडू लागले. या प्रत्येक क्षेत्रात नवी वळणे रुळत राहिली आहेत. ई-बुक्सच्या क्षेत्रात लेखिका ई.एल.जेम्सच्या ‘फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे’ ह्या स्व-प्रकाशित कादंबरीच्या लाखो प्रती अल्पावधीत वाचकांपर्यंत गेल्या. त्यामुळे सेल्फ पब्लिशड् पुस्तकांनाही प्रतिष्ठा लाभली. ॲमेझॉन, ॲपल, मायक्रोसॉफ्ट वगैरे संस्थांनी सेल्फ पब्लिशिंग पुस्तकांच्या निर्मितीसाठी वेगवेगळी मॅन्युअल्स प्रसिद्ध केली. पुस्तकांच्या दुकानांना ई-बुक्सनी

आरंभी मोठाच हादरा दिला. काही ग्रंथदालने बंद पडली. काही दिवाळखोर निघाली. प्रकाशन संस्थांची संपादकीय काटेकोर शिस्त सेल्फ पब्लिशड् पुस्तक निर्माते (लेखक) पाळतातच असे नाही. लेखक त्याबाबत स्वातंत्र्य देतात आणि सेल्फ पब्लिशड्‌चा एकूण ग्रंथ व्यवहारातला वाटा सालोसाल वाढत आहे. पुस्तकाचे संहिता लेखन आणि प्रसिद्धी यांकडे पाहण्याची दृष्टी बदलली.

जुगरनाट पब्लिशिंग हाऊस या दिल्लीतील प्रयोगशील प्रकाशन संस्थेच्या प्रमुख चिकी सरकार यांनी मोबाईल फोनवर वाचता येतील अशा पुस्तकांची निर्मिती सुरू केली आहे. त्या अर्थाने चिकी सरकार ही भारतातील पहिली फोन पब्लिशर ठरली आहे. पुस्तक जे करू शकत नाही ते फोन करू शकतो, असे तिचे घोषवाक्य आहे. ‘डेलिशिअस स्टोरीज ऑन द स्क्रीन’ या सनी लिऑन या पोर्नस्टारने लिहिलेल्या फोन बुकचे वैशिष्ट्य काय? ही छोटीशी कथा. रोज रात्री दहा वाजता तिचे एकेक प्रकरण अपलोड होईल. वाचकाला सनी लिऑनची जणू ती कादंबरी रीडिंगची अपॉइन्टमेंटच! दररोज रात्री एक कथा, दीर्घकथा, लघुकथा, धारावाहिक, प्रणय कथा, जगरनॉटतर्फे उपलब्ध होईल. चिकी सरकारने त्यासाठी सनी लिऑन या पोर्नस्टारची मदत घेतली आहे. अरुंधती रॉय, प्रशान्त किशोर, ट्विंकल खन्ना, श्वेतलाना वगैरे लेखकांशी तिने करार केले आहेत. मोबाईलवर एकेक पान/प्रकरण रोज वाचकाला मिळू शकेल. शिवाय ही पुस्तके मुद्रित स्वरूपातही उपलब्ध असतील. डिजिटल आणि फिजिकल पारंपरिक पुस्तके सुटीही विकत मिळू शकतील. शंभर पुस्तकांचा पहिला संच प्रकाशनाच्या वाटेवर आहे. अशा चटपटीत, चावट, रोमँटिक, लव्ह, सेक्स, क्राइम, फँटसी वगैरे प्रकारांतील पुस्तकांना चांगली मागणी राहील, अशी चिकी सरकारची धारणा आहे. याआधी ती पेंग्विनमध्ये मुख्य संपादक म्हणून काम करीत होती. त्या वेळी तिने नवनव्या लेखकांचा शोध घेण्यासाठी खूप परिश्रम घेतले होते.

चिकी सरकारचा ठाम विश्वास आहे की मुद्रित पुस्तके कधी अस्तंगत वा कालबाह्य होणार नाहीत. डिजिटल व पारंपरिक दोन्हीचे अस्तित्व राहील. मोबाइलवर स्मार्ट फोनवर एखादी मसालेदार कथा वाचण्याची चटक लागली तर वाचकांची संख्याही वाढत राहील.

फोन बुकच्या या नावीन्यपूर्ण कल्पनेचे स्वागत चांगले होईल असे वाटते.

# मेहता मराठी ग्रंथजगत

## विशेष...

दि. १ मार्च, २०१६ पासून
मेहता पब्लिशिंग हाऊस
'मेहता मराठी ग्रंथजगत'ची
वार्षिक वर्गणी
बंद करीत आहोत.
तरी आपण
त्रैवार्षिक किंवा पंचवार्षिक वर्गणी
पाठवून सहकार्य करावे,
ही विनंती.

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.**

# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही
बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे
पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड,
टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६
शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६
शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखल ठाणा, एमआयडीसी,
औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी संपर्क
www.wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

**सर्व प्रकारची महाविद्यालय्सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएसी, एमपीएसी, सेट-नेट, इंजीनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघरीन पुस्तके, युपीएसी, एमपीएसी, सेट-नेट, इंजीनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर**

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१

Email : mehtabooksellers@gmail.com

GET IT ON Google Play आणि dailyhunt

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

eBooks



# निवेदन

## नियमांचे सर्रास उल्लंघन?

*पुण्यामध्ये डेक्कन, फर्ग्युसन रस्ता व वाडेश्वर हॉटेल जवळ आजच्या दिवसात पायरेटेड पुस्तकांची बिनधास्त विक्री चालू असते.*

कोणते ही पुस्तक ५० रुपयांपासून ते ८० रुपयांपर्यंत मिळते, म्हणजे लेखकाच्या विचारांपासून ते पुस्तकाच्या प्रकाशना पर्यंतच्या प्रवासाची हीही किंमत आणि ही किंमत ठरवणारे हे 'चोर' कोण? व आश्चर्य म्हणजे हे पुस्तक विकत घेणाऱ्यांमध्ये तरुण वर्गाचा समावेश जास्त आहे.

बरं ही पुस्तके कुठे छापली जातात व बाजारात कशी आणली जातात याचा मार्ग काढणे हा खरच कठीण प्रश्न आहे का ? आज आपण फक्त पुण्याबद्दल बोलतो आहोत; परंतु मुंबई, कोल्हापूर, सातारा, नाशिक व औरंगाबाद या शहरामध्येसुद्धा हीच परिस्थिती आहे. मला हा प्रश्न पडतो की याला जबाबदार कोण ?

कायदा, की ज्याकडून आपण नियमांची अंमलबजावणी व्हावी ही माफक अपेक्षा करतो की बेजबाबदार नागरिक? कायद्याप्रमाणे पुस्तकाचे हक्क हे त्या प्रकाशनाकडे व लेखकांकडे असतात. त्याचे उल्लंघन झाल्यास त्या प्रमाणे दंडात्मक तरतूद ही केलेली आहे.

हा वरील उल्लेख फक्त पायरेटेड पुस्तकासंबधित नसून बाजारात मिळणाऱ्या अनेक पायरेटेड वस्तूंशी निगडीत आहे.

जर शासन प्रत्येक व्यवसायधारकाकडून कर वसूल करत असेल तर मग या बेकायदेशीर व कर चुकवेगिरी  व्यवसाय करणाऱ्यांकडे शासन का दुर्लक्ष करत आहे. द हिंदू दैनिकामध्ये ०१ जून २००३रोजी एक लेख छापून आला होता, संदर्भात त्या मध्ये

पायरेटेड पुस्तकांमुळे शासनाचे सर्वसाधारण ४०० करोड रुपयाचे नुकसान होत आहे, तर लेखकाचे व प्रकाशन व्यवसाय करणाऱ्यांचे किती  नुकसान होत असेल?

व्यवसाय करणाऱ्यांकडून जर काहीसा उशीर झाला तर शासन अतिरिक्त कर वसूल करते. परंतु हे रस्त्यावरीलगुन्हेगार कुठलाही कर न भरता, भर दिवसा फुकट व्यवसाय करतात... शासनाला इतक समजले पाहिजे की या मध्ये लेखक, प्रकाशक व शासन यांना गेले कित्येक वर्षे मोठ्या प्रमाणात आर्थिक व बौद्धिक नुकसान सोसावे लागत आहे.

पायरेटेड व्यवसायाची पाळे-मुळे ही वाढत चालली आहेत, जर त्याला वेळीच थांबवले नाही तर शासन व प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्यांचे जे नुकसान होत आहे किंवा होणार आहे त्याची भरपाई करणे शक्य होणार नाही.  शासनाने या सर्व गोष्टींवर कडक नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे व दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे. माझे सर्व वाचकांना आवाहन आहे की इथून पुढे आपण कोणतीही पायरेटेड पुस्तक विकत घेऊ नयेत.

आता कायद्याच्या दृष्टिकोनातून राज्यातील या सर्व प्रकाशकांना अच्छे दिन कधी येणार याची वाट बघत बसण्यापलीकडे काही पर्याय नाही.

**– सुनील मेहता**



# साहित्य वार्ता

## ✍ सोशल मिडियावर प्रसिद्धी

सिनेमा आणि मालिकांच्या प्रसिद्धीसाठी सोशल मीडियाचा वापर सर्रास होत असतो; पण जास्तीत जास्त प्रेक्षकांना नाटकाकडे खेचून आणण्यासाठी फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम अशा अनेक सोशल नेटवर्किंग साइट्सवर नाटकाचे वेगळेपण सिद्ध करण्यासाठी रंगकर्मींमध्ये चुरस सुरू आहे.

नाटकांच्या ऑफिशिअल पेजेसवर पडद्यामागची तयारी, नाटकातील लक्षवेधी प्रसंग, आणि मराठी-अमराठी कलाकारांनी नाटकाला दिलेली मनमुराद दाद यांची रेलचेल पाहायला मिळते. 'दोन स्पेशल', 'गोष्ट तशी गमतीची', 'हा शेखर खोसला कोण आहे?', 'ढोलताशे', 'सेल्फी' ही सध्याची लोकप्रिय नाटकं सोशल साइट्वर धुमाकूळ घालताहेत.

नाटकातले तंत्रज्ञ आणि कलाकारही प्रेक्षकांनी नाटकाला दिलेला रिस्पॉन्स पर्सनल अकाउंटवरून शेअर करताना दिसत आहेत. नाटकांचे परदेश दौरे, पुरस्कार, मान्यवरांकडून मिळालेली शाबासकीची थाप आणि काही गमतीशीर किस्से या पेजेसवर पाहायला मिळतात.

## ✍ कपडे पार पाडतील संगणकाची भूमिका

माहिती तंत्रज्ञानाचा नवा आविष्कार लवकरच प्रत्यक्षात उतरणार असून, शरीरावर परिधान केलेले कपडे संगणकाची भूमिका पार पाडणार आहेत.

अमेरिकेतील ओहायो विद्यापीठातील संशोधकांचा एक गट या विषयावर संशोधन करत आहे. याबाबतचा लेख एका नियतकालिकात नुकताच प्रकाशित झाला आहे. शरीरावर परिधान केलेल्या कपड्यांनी स्मार्टफोन किंवा टॅब्लेटसाठी अँटेनाची भूमिका पार पाडावी, असा प्रयत्न करण्यात येत आहे. याशिवाय शरीरावरील विविध अवयवांची सक्रियता, खेळाडूंच्या फिटनेसची पातळी तपासण्यासाठीची आवश्यक माहिती आदींबाबत हे कपडे माहिती देऊ शकतील.

त्यासाठी कपड्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक सर्किट बसविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. 'या संशोधनामुळे वस्त्रोद्योगात मोठी क्रांती होईल. या कपड्यांचा संवादासाठी, तसेच आरोग्याबाबतची माहिती मिळविण्यासाठी उपयोग होऊ शकेल, अशी माहिती संशोधकांनी दिली आहे.

## ✍ '४ जी' स्मार्टफोन आवाक्यात

भारतातील तरुणाईला '४ जी' सेवा आणि स्मार्टफोनचे मोठे आकर्षण आहे. देशात '४ जी' स्मार्टफोनच्या किमती स्वस्त होत असून, सध्या बाजारात पाच हजार रुपये किंवा त्यापेक्षा कमी किमतीचे १५ कंपन्यांचे फोन उपलब्ध या स्मार्टफोनच्या किमती सामान्यांच्या आवाक्यात येत असून, पाच इंच स्क्रीन, ८ जीबी इंटरनल मेमरी, ५ मेगा पिक्सेल कॅमेरा आणि २३०० एमएएच बॅटरी असणारा फोन केवळ ४ हजार रुपयांत उपलब्ध आहे. सहा महिन्यांपूर्वी '४जी' स्मार्टफोनची किंमत सात हजार रुपयांच्या घरात होती, ती आता बरीच कमी झाली आहे. स्थानिक, तसेच चिनी बनावटीचे स्मार्टफोन ग्राहकांना परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध आहेत. स्वस्त किमतीमुळे स्मार्टफोनच्या विक्रीत वेगाने वाढहोत आहे. गेल्या वर्षी भारतात आयात केलेल्या एकूण फोनमध्ये स्मार्टफोनचा वाटा ४२टक्के होता. 'टेक्नोसॅव्ही' व्यक्तींना 'अच्छे दिन' येत असल्याचे चित्र आहे.

## ✍ पॉप गझलचा नजराणा

'केव्हा तरी पहाटे', 'उषःकाल होता होता', 'मी मज हरपून बसले गं', 'मलमली तारुण्य माझे,' 'तरुण आहे रात्र अजूनी...' गझलकार सुरेश भट यांचे शब्द आणि गानसम्राज्ञी आशा भोसले यांचे स्वर यांनी अजरामर झालेली गाणी आजही लोकप्रिय आहेत. भटांचे शब्द आणि आशाताईंचा आवाज हे समीकरण नव्या रंगरूपात अनुभवण्याची संधी रसिकांना मिळणार आहे.

सुरेश भट यांच्या काही गझलांना पॉप, ब्लुज, रॉक, सोल या प्रकारांत सादर करणारा '८२ मराठी पॉप' हा अल्बम साकारला आहे, युवा संगीतकार मंदार आगाशेयाने. भटांच्या 'ओठ', 'आसवांचे बरसून', 'हा असा चंद्र', 'तोरण' आणि 'दिवस हे जाती कसे' या सहा गझलांचा अल्बममध्ये समावेश केला आहे. अल्बमविषयी आशाताई म्हणाल्या, ''सुरेश भट यांच्याशी माझे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्याविषयी अनेक आठवणी आहेत. या अल्बमच्या निमित्तानं त्या पुन्हा जाग्या झाल्या. मंदारच्या संगीताची 'पॉप अँड रॉक' शैली आहे. त्या शैलीत माझ्या

आवाजात या गझल रेकॉर्ड व्हाव्यात, अशी भट साहेबांची खूप इच्छा होती. ती पूर्ण झाल्याचा आनंद आहे; पण भट साहेब या गझल ऐकायला आपल्यात हवे होते.''

१९९४ मध्ये सुरेश भट यांना भेटल्यापासूनच मंदारच्या इंग्लिश पॉप संगीताच्या शैलीत आणि आशाताईंच्या आवाजात भट यांच्या गझलांची ध्वनिफीत व्हावी, अशी भट यांचीच इच्छा होती. या अल्बमचे संगीत संयोजन डेरेक ज्यूलियन आणि ताल संयोजन रवी वेदांत यांनी केले आहे.

## ✍ पालिका शाळांत ई-लर्निंग

भारत संचार निगम लिमिटेडतर्फे (बीएसएनएल) पुणे महापलिकेच्या २८ माध्यमिक शाळांमध्ये ऑनलाइन एज्युकेशन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

शिवाजीनगर येथील हुतात्मा बालवीर शिरीषकुमार माध्यमिक विद्यालयामध्ये महापालिका माध्यमिक विद्यालयामध्ये महापालिका आयुक्त कुणाल कुमार यांच्या हस्ते या सुविधेचे उद्घाटन झाले. इनामदार यांनी त्यांच्या अहुरा बिल्डर्स या कंपनीच्या सामाजिक बांधिलकी निधीतून या प्रकल्पासाठी १५ लाख रुपये दिले आहेत.

'पुणे मनपाच्या सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये ऑनलाइन एज्युकेशन सुविधा देण्यात येईल. एकत्रित प्रयत्नांतून प्रश्न सुटू शकतील, असे कुणाल यांनी सांगितले. 'बीएसएनएल ही सरकारी कंपनी आहे. त्यामुळे पालिकेने बीएसएनएलसाठी आवश्यक खोदकामासाठी सहकार्य करून सवलत द्यावी.' अशी मागणी डॉ. होता यांनी केली. 'पालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांनाही या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी आम्ही या प्रकल्पाला पाठबळ दिले,' असे डॉ. इनामदार यांनी सांगितले.

रत्नागिरी, सिंधुदुर्गमधील आठ हजार विद्यार्थ्यांपर्यंत आणि बीड आणि लातूरमधील जिल्हा परिषदेच्या १०० शाळांतही वेब पोर्टलद्वारे पहिली ते दहावीपर्यंत अभ्यासक्रम उपलब्ध असणार.


माध्यमिक अभ्यासक्रमावर आधारित दृक्श्राव्य आणि व्हर्चुअल क्लासरूम माध्यमाद्वारा या शाळांमध्ये आधुनिक डिजिटल शिक्षणासाठी व्हर्चुअल क्लासरूमदेखील उपलब्ध असेल. ऑनलाइन परीक्षा, स्पोकन इंग्लिश प्रोग्रामदेखील या उपक्रमातून राबविले जाणार आहेत. यासाठी पुणे महापालिकेच्या शाळांतील सर्व शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे,' असे पी. के. होता यांनी सांगितले.

**नवं कोरे**

भाग २ व ३

# चिकन सूप फॉर द वुमन्स सोल

*स्त्रीच्या मनोगुणांचा शोध घेणाऱ्या कथा*




लेखक व संकलन
**जॅक कॅनफिल्ड / मार्क व्हिक्टर हॅन्सन**
**जेनिफर रीड हॉथॉर्न / मार्सी शिमॉफ**

अनुवाद - **उषा महाजन**

**प्रत्येकी किंमत : १९५/-रु. । प्रत्येकी पोस्टेज :५०/-रु.**

प्रत्येक स्त्रीच्या जीवनात कन्या, पत्नी, माता व आजी होण्याचे टप्पे येत असतात. त्याचप्रमाणे बहीण, मावशी, आत्या, मैत्रीण, शेजारीण व व्यावसायिक सहकारी हीदेखील तिची विविध रूपं असतात. हे प्रत्येक नातं निभावताना, सांभाळताना तिच्या प्रेमाची, त्यागाची व सहनशीलतेची कसोटी लागत असते.

जगभरातील बेस्ट सेलर्सच्या यादीतील 'चिकन सूप फॉर द सोल' या पुस्तकांच्या मालिकेमधील 'चिकन सूप फॉर द वुमन्स सोल'च्या पहिल्या भागाप्रमाणेच या दुसऱ्या भागातही, स्त्रीची विविध रूपं दाखवणाऱ्या, तिच्या मनोव्यापाराचं रेखाटन करणाऱ्या हृदयस्पर्शी कथांचा ठेवा आहे. या कथा वाचून प्रत्येक स्त्रीला आणि तिच्या कुटुंबीयांनाही स्फूर्ती व आनंद मिळेल, यात तिळमात्र शंका नाही.

सामान्य व असामान्य स्त्रियांच्या आयुष्यातील जिवंत अनुभवांच्या या सर्व सत्यकथा तमाम स्त्री वर्गाच्या मनास नक्कीच भावतील.

## ✍ कट्यार

'कट्यार काळजात घुसली' या चित्रपटातील गाण्याबरोबर रसिकांना माझा अभिनयही आवडला. त्यांच्याकडून भरभरून कौतुकही झाले. प्रेम आणि आशीर्वादही मिळाला,' अशी भावना गायक शंकर महादेवन यांनी व्यक्त केली.

महादेवन म्हणाले, ''मी २० वर्षांपासून संगीत क्षेत्रात काम करत आहे. मी पहिल्यांदाच एखाद्या चित्रपटात अभिनय केला. एका चित्रपटात सादर केलेली कलाकृती फक्त एकदाच साकारता येते. कारण ती कलाकृती अजरामर असते. त्यामुळे मी पुन्हा अभिनय करेन की नाही हे माहीत नाही; पण संगीतासाठी नेहमीच झटत राहीन. एक संगीतकार म्हणून मी नेहमीच वेगळ्या धाटणीची शैली वापरण्याला प्राधान्य देतो. आजच्या पिढीपर्यंत आपले अभिजात शास्त्रीय संगीत पोचविण्याची जबाबदारी आमच्यासारख्या संगीतकारांवर आहे. जुन्या संगीतकार-गायकांनी शास्त्रीय संगीताला उंचीवर नेले; ते नव्या पिढीपर्यंत पोचविणे आमचे कर्तव्य आहे. कोणतेही गाणे गाताना ते पॅशनने गावे. असेच गाणे रसिकांना भिडते. आज नवी पिढी शास्त्रीय संगीत ऐकत असून, तिच्यापर्यंत ते प्रभावीपणे पोचविण्यासाठी संगीतातील जाणकारांनी एकत्र यावे.''

''मी पुण्यात प्रत्येक शैलीत गायलो आहे. त्याला पुणेकर रसिकांनी दादही दिली आहे. येथील रसिकांची संगीताची जाण प्रभावशाली आहे. त्यांना संगीतातील वैविध्य माहीत असून, पुणेकर रसिक हे खऱ्या अर्थाने संगीताचे चाहते आहेत. त्यांच्याकडून मिळणारा अभिप्राय माझ्यासाठी महत्त्वाचा असतो. त्यामुळे पुणेकरांसमोर गाताना माझ्यात नेहमीच एक उत्सुकता आणि कुतूहल असते.'' असे शंकर महादेवन यांनी सांगितले.

## ✍ सूक्ष्म जिवाणूंचा उगम शोधणार

'वातावरणाच्या वरच्या थरात सापडणाऱ्या जिवाणूंच्या कार्बन आयसोटोपचे गुणोत्तर तपासून त्या जिवाणूंचा स्रोत पृथ्वीबाहेरील आहे का, याची लवकरच शहानिशा करण्यात येणार आहे,' अशी माहिती ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी दिली. भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या पुढाकाराने (इस्रो) भारतीय शास्त्रज्ञांनी वातावरणाच्या वरच्या थरातून दोनदा सूक्ष्मजीव जमा केले होते. त्या सूक्ष्मजीवांचे उगमस्थान शोधण्यासाठी आता प्रयत्न करण्यात येणार असल्याचे डॉ. नारळीकर यांनी सांगितले.

डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशनच्या (डीआरडीओ) डिफेन्स

सायन्स फोरमतर्फे आयोजित 'विश्वात आपण एकटेच का?' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाला डीआरडीओच्या आर्मामेंट अँड कॉम्बॅट इंजिनिअरिंगचे (एसीइ) महासंचालक डॉ. पी. के. मेहता, डीआरडीओच्या पुण्यातील प्रयोगशाळांचे संचालक, शास्त्रज्ञ यांची प्रमुख उपस्थिती होती.

पृथ्वीबाहेरही जीवसृष्टीचे अस्तित्व असण्याची दाट शक्यता असून, प्रा. फ्रेड हॉएल आणि चंद्रा विक्रमसिंगच यांच्या यासंबंधीच्या सिद्धान्ताची पडताळणी करण्यासाठी जगभरात केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची माहिती डॉ. नारळीकर यांनी दिली.

ते म्हणाले, "गेल्या १५ वर्षांत इस्त्रोच्या पुढाकाराने दोन वेळा वातावरणाच्या वरच्या थरात बलून पाठवून हवेचे नमुने जमा करण्यात आले होते. २००५ मध्ये केलेल्या प्रयोगादरम्यान जमिनीपासून ४१ किलोमीटर उंचीवर तीन नवे जिवाणू आम्हाला सापडले, ज्यांचे पृथ्वीवरील जिवाणूशी साधर्म्य नव्हते. जमिनीवरून हे जिवाणू इतक्या उंचीवर जाण्याची शक्यता अत्यंत कमी असते, तसेच हे जिवाणू अल्ट्रा व्हायोलेट किरणांच्या माऱ्यामध्येही जिवंत होते. यामुळे ते अवकाशातून आले असावेत, असा शास्त्रज्ञांचा कयास आहे."

या वेळी डॉ. नारळीकर यांनी अवकाशात पृथ्वीसारखा दुसरा ग्रह अस्तित्वात असण्याची शक्यता कितपत आहे आणि असेल तर त्या ग्रहाशी संपर्क करणे किती कठीण आहे, त्याचे गणित उलगडून दाखवले.

## ✍ डॉ. कृ. पं. देशपांडे- अमृत महोत्सव

'उर्वरित आयुष्य विधायक लेखन करण्यासाठी व्यतीत करणार आहे. पुण्याने माझ्या अंगी असलेल्या विविध पैलूंना घडवले,' असे मनोगत डॉ. कृ. पं. देशपांडे यांनी व्यक्त केले. 'फुले-शाहू-आंबेडकर एज्युकेशन अँड सोशल फाउंडेशन'तर्फे डॉ. देशपांडे यांचा अमृतमहोत्सवपूर्ती समारंभ पुणे विद्यार्थी गृहाच्या इंजिनिअरिंग कॉलेज सभागृहात झाला.

या वेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, महापौर प्रशांत जगताप, पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष रामचंद्र शेटे, डॉ. विक्रम घोले, निवृत्त न्यायाधीश मान्धाता झोगडे, निर्मला गद्रे, शुभदा देशपांडे आदी उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. देशपांडे यांची ग्रंथतुला करण्यात आली. डॉ. देशपांडे लिखित गावाकडच्या आठवणी, 'दीनाची साउली' पुस्तके तसेच गौरव अंकाचे प्रकाशन झाले.

“शिक्षक हा अध्यापन क्षेत्राव्यतिरिक्त विविध कौशल्ये जाणणारा असावा. सुसंस्कारित पिढी घडवण्यासाठी शिक्षकांनी व्यासंगी असले पाहिजे,” असे डॉ. पंडित विद्यासागर म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्ना दुर्वे यांनी केले, तर राजेंद्र कांबळे यांनी आभार मानले.

## ✍ ३७ वे मराठवाडा साहित्य संमेलन- जालना

‘दुष्काळावर मार्ग निघू शकतो, पण ती मानसिकता पाहिजे, तसेच विचारांचा दुष्काळ संपला पाहिजे. शेती हा केंद्रबिंदू मानून राज्य चालवावे, ही नीती आज सत्ताधाऱ्यांमध्ये राहिलेली नाही. ते होण्याची आवश्यकता असून, त्यासाठी योग्य नियोजनाचीदेखील गरज आहे,’ असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर यांनी केले.

जालना शहरातील गुरू गणेश भवन येथे आयोजित ३७व्या मराठवाडा साहित्य संमेलनाच्या विचारपीठावर संमेलनाध्यक्ष प्रा. दत्ता भगत, मावळते अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, मसापचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील, कार्यवाह दादा गोरे, आ. अर्जुन खोलकर, उद्योगपती बद्रिनारायण बारवाले, संमेलनाचे स्वागताध्यक्ष विनयकुमार कोठारी, मधुकर अण्णा मुळे आदी उपस्थित होते.

शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न हाच या संमेलनाचा केंद्रबिंदू आहे. साहित्य संमेलनात झालेल्या चर्चेचा फायदा होत नाही असे नाही. अनेक वेळा सरकारवर दबाव वाढून त्याचा परिणाम झालेला दिसून येतो. दलित साहित्य मर्यादित ठेवले नाही तर विस्तारित केल्याचे सांगून महानोर म्हणाले, १९८१च्या काळात मराठवाड्यात सुरू झालेली साहित्य चळवळ आजतागायत सुरूच आहे. काही वर्षांपूर्वी जागतिक मराठी परिषद स्थापन करण्यात आली. याचे अध्यक्षपद शरद पवार यांच्याकडे होते. उपाध्यक्षपद आपल्याकडे होते; मात्र अनेकदा असाहित्यिकांचीच उपस्थिती असायची. संमेलने म्हणजे पर्यटन असे सूत्र बनले, मराठी भाषा विकास मंडळाची अवस्थाही वेगळी नाही. राज्यात ग्रंथालय आणि ग्रंथालय चळवळ मोडण्याचा प्रयत्न सध्या सुरू आहे, अशी खंतही त्यांनी आपल्या भाषणात व्यक्त केली.

## ✍ जंगली खाद्य वनस्पतीचे विश्व शब्दबद्ध

जैवविविधतेने समृद्ध अशा पश्चिम घाटातील केली, आंबुशी, रान शेवरा, खारमाट्या, आटकी अशा जवळपास १४२ जंगली खाद्य वनस्पतीचे विश्व आता

साहित्यातून उलगडले आहे. खाद्य वनस्पतींवरील संशोधनावर आधारित हे पुस्तक आघारकर संशोधन संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आले आहे.

या पुस्तकाचे प्रकाशन राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते झाले. या वेळी संस्थेचे संचालक डॉ. के. एम. पाकणीकर, डॉ. डी. आर. बापट, डॉ. अनुराधा उपाध्ये, डॉ. मंदार दातार वगैरे उपस्थित होते.

डॉ. काकोडकर म्हणाले, ''जंगलातील खाद्य वनस्पतीचा उलगडा झाल्याने प्रक्रिया प्रकल्पांना चालना मिळणार आहे. त्याबरोबरच या वनस्पतींवर प्रक्रिया करण्याचे तंत्र नव्याने विकसित करता येण्याची संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे तेथील स्थानिकांना रोजगार उपलब्ध होईलच; शिवाय उत्पादन, तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांत नव्या संधी मिळतील, याचा विचार व्हावा.''

जंगलातील खाद्य वनस्पतींवर संशोधन करण्याचा प्रस्ताव आघारकर संस्थेतील दातार आणि उपाध्ये यांनी पुणे वन विभागाकडे पाठविला होता. प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर २०१३ ते २०१५ दरम्यान पश्चिम घाटातील १२ जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षण आणि संशोधन करून शोधनिबंध सादर करण्यात आला होता.

शोधनिबंध हे संशोधक आणि अभ्यासकांपुरते मर्यादित असतात. त्यामुळे संशोधनातून समोर आलेली माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोचविण्यासाठी संस्थेतर्फे या संशोधनावर आधारित पुस्तक तयार करण्यात आले आहे.

देशात यापूर्वी ओरिसा, आसाम येथील जंगली खाद्य वनस्पतींचा अभ्यास केल्याचे डॉ. दातार यांनी या वेळी सांगितले. ते म्हणाले, ''जंगलातील या वनस्पतींची बहुतांश माहिती संबंधित परिसरातील स्थानिकांनी दिली. एखाद्या वनस्पतीची फुले, फळे, पाने यांच्या भाज्या किंवा लोणचे करून खाल्ले जाते. काही वनस्पती वाळवून काही दिवसांनंतर खाण्यासाठी ठेवल्या जातात. मात्र त्यालाही पारंपरिक संदर्भ जोडत कोणत्या वनस्पतीची भाजी कधी खावी, कधी खाऊ नये, अशी माहिती मिळाली आहे. त्याचे महत्त्व वनस्पतिशास्त्रज्ञाच्या दृष्टिकोनातून संशोधनात नमूद केले आहे.'' धुळे, नंदूरबारपासून ते अगदी सिंधुदुर्गपर्यंत विस्तारलेल्या पश्चिम घाटातील खाद्य वनस्पतींचा अभ्यास केल्याचे डॉ. उपाध्ये यांनी नमूद केले.

## ✍ पुण्यातील सोसायट्यांची मेळघाटाशी 'मैत्री'

शहरातील काही सोसायट्यांमधील रद्दी मेळघाटातील बालकांचे कुपोषण आणि बालमृत्यूपासून संरक्षण करत आहे. 'मैत्री' या नागरिकांच्या गटातर्फे 'रद्दीतून सद्दी' या उपक्रमांतर्गत विविध सोसायट्यांमधून गेल्या नऊ वर्षांत रद्दीच्या विक्रीतून एकूण साडेअठरा लाखांहून अधिक रक्कम जमा झाली आहे. मेळघाटातील बालकांचा कुपोषणापासून बचाव व्हावा आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी हा निधी वापरण्यात येत आहे.

गेल्या नऊ वर्षांत रद्दीच्या विक्रीतून एकूण १८ लाख ६२ हजार ३०८ रुपये 'मैत्री'कडे जमा झाले आहेत. कोथरूडमधील राहुल टॉवर्स या मोठ्या सोसायटीतून २००७ पासून आतापर्यंत सहा लाख २३ हजार ६१५ रुपये, तर स्प्रिंगफिल्ड्स सोसायटीमधून २०११ पासून आतापर्यंत ७९ हजार १८२ रुपये जमा झले आहेत. सिंहगड रस्त्यावरील प्रज्ञानगड, औदुंबर, शुक्रतारा, त्रिमूर्ती-ब्रह्मा आणि पौड रस्त्यावरील पिनाक सदिच्छा, शिल्पा सोसायटी, राहुल टॉवर्स, स्प्रिंगफिल्डस्, वुडलँड सोसायटी या उपक्रमात सहभगी असून, मधुकोष ही सोसायटी या उपक्रमात नव्याने सहभागी झाली आहे. प्रत्येक सोसायटीतून जो निधी 'मैत्री'कडे जमा झाला आणि त्याचा विनियोग कुठल्या उपक्रमासाठी केला, याचा एक अहवालही दर सहा महिन्यांनी सोसायटीकडे दिला जातो.

'मैत्री' हा नागरिकांचा गट १९९७ पासून सातत्याने मेळघाटातील २८ दुर्गम गावांत कुपोषण, बालमृत्यू आदी मुद्द्यांशी संबंधित काम करत आहे. आरोग्य शिबिर, स्वच्छता, व्यवसाय शिक्षण, शालेय शिक्षण आदी उपक्रम या गटातर्फे राबवण्यात येतात. मेळघाटसारख्या दुर्गम आदिवासी भागांत प्रत्यक्ष काम करणे प्रत्येकालाच शक्य नाही. परंतु घरात अडगळ होणारी रद्दी सामाजिक कामासाठी देणे अजिबात अवघड नाही. आधी आमचे काम समजून घ्या आणि मगच या उपक्रमात सहभागी व्हा, असा आमचा आग्रह असतो. सगळ्यांसोबत मैत्रीच्या नात्याने जोडले जाण्यासाठी ते महत्त्वाचे ठरते,' असे 'मैत्री'चे स्वयंसेवक सांगतात. गुरुदत्त रद्दी डेपो, तुळजाभवानी रद्दी डेपो, यादव रद्दी डेपो यांनी आजवर रद्दी नेण्यासाठीचा वाहन खर्च न घेता देणगी जमा केली आहे.

रद्दीतून सद्दी या साध्या उपक्रमातून आम्हालाही मेळघाटातील बालकांसाठीच्या उपक्रमात सहभागी होता येते. आमच्या सोसायटीतून या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. इतरांनीही याचे अनुकरण करावे.

**- दिनेश वैद्य राहुल टॉवर्स, कोथरूड.**

**आता सर्वांना वाचनाकडे वळावेच लागेल. - विश्वास पाटील**

**प्रयोगशील शिक्षणासाठी शिक्षक साहित्य संमेलन कितपत उपयुक्त ठरेल असे वाटते?**

विद्यार्थी फक्त ज्ञानाने समृद्ध होऊन चालणार नाही, तर यापुढे सिद्धान्ताने प्रगत व्हायला हवेत. त्यासाठी शिक्षकांनी अनेक प्रयोग करून विद्यार्थ्यांना घडविणे गरजेचे आहे. यासाठी शिक्षक प्रतिभा संमेलनाचे आयोजन करण्यात आले, हा स्तुत्य उपक्रम आहे. त्याचा उपयोग शिक्षकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी होईल. शिक्षकांनी एकाच व्यासपीठावर येण, ही बाब साहित्यातील गोडी वाढविण्यासाठी उपयुक्त आहे. प्राचार्य ग. ह. पाटील, द. मा. मिरासदार यांच्याप्रमाणे अनेक कवी, लेखक शिक्षण क्षेत्रातून निर्माण झाले आहेत. शिक्षक पारंगत असल्यास त्याच गतीने विद्यार्थी घडत असतात. त्यामुळे नवी पिढी गतिशील होते. आम्हालाही शिक्षकांनीच घडविले आहे. त्यामुळे हे संमेलन नक्कीच उपुयक्त ठरेल.

**साहित्य, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील नाते दृढहोण्यासाठी कोणते प्रयत्न आवश्यक आहेत?**

भाषेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ही भाषा वाचनातून घडते. त्यातून संस्कृती निर्माण होते. तेच संस्कार विद्यार्थ्यांवर घडतात. त्यामुळे साहित्य, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील नाते दृढअसायला हवे. उत्तम वाचन झाल्यास उत्तम लेखन होईल आणि विद्यार्थ्यांवर उत्तम संस्कार होतील. त्यामुळे शिक्षकांनी सकस, समग्र वाचन करायला हवे; अन्यथा, मराठीतील म्हणीप्रमाणे, ‘आडात नाही, तर पोहऱ्यात कुठून येणार?’ अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. तांत्रिक शिक्षण कितीही उपयुक्त असले तरी त्याचा मूळ गाभा भक्कम असायला हवा.


**साहित्यनिर्मितीत शिक्षकांचे योगदान काय राहिले आहे? भविष्यात काय योगदान असावे?**

पद्मश्री नारायण सुर्वे, ग. ह. पाटील, द. मा. मिरासदार यांचे साहित्यनिर्मितीतील योगदान स्पृहणीय आहे. आता जग झपाट्याने बदलते आहे; परंतु, त्यामध्ये संस्कृतीचे प्रतिबिंब दिसत नाही. पुस्तकांमधूनच नव्हे तर शेतातून बैलगाडी अदृश्य होऊ लागली आहे. त्याची जागा ट्रॅक्टरने घेतली आहे. धोतर नेसून शेतात राबवणारे शेतकरी दिसत नाहीत. त्यांचे पेहराव बदलले. आचार-विचार बदलले. वाहिन्यांचा प्रभाव विस्तृत होत आहे. नवीन संस्कृती निर्माण होत

**६वी आवृत्ती**

# अमरगीत

बाबा आमटे यांचं जीवनचरित्र




**मूळ लेखक -** निशा मिराचंदानी

**अनुवाद -** लीना सोहोनी

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

सधन जमीनदाराच्या घरात जन्माला आलेले मुरलीधर देवीदास आमटे हे स्वभावतः बंडखोर वृत्तीचे, आयुष्य भरभरून जगण्याची इच्छा असलेले! पण आयुष्यात फार लवकर एका गोष्टीची त्यांना तीव्रतेने जाणीव झाली- आपल्याला जगायचंय ते स्वतःसाठी नाही, तर दुसऱ्यांसाठी. अन्यथा हे सारं वैभव, हा मानसन्मान, ही बुद्धिमत्ता... हे सगळं फोल, तकलादू, बेगडी ठरेल.

...मग सुरुवात झाली ती आनंदवनात कुष्ठरुग्णांसाठी उभारलेल्या वसाहतीने. त्यानंतर राष्ट्रीय एकात्मता आणि सलोखा यांचा पुरस्कार करण्यासाठी भारताच्या पूर्व-पश्चिम आणि उत्तर-दक्षिण टोकांना जवळ आणणारं 'भारत जोडो' अभियान झालं. त्यापुढचं पाऊल म्हणजे बाबांचं नर्मदा खोऱ्यातील दहा वर्षांचं प्रदीर्घ वास्तव्य. सरकारनं पर्यावरणाचा योजनाबद्ध विनाश चालविला होता, त्यामुळे होरपळून निघणाऱ्या कुटुंबांच्या पाठीशी बाबा उभे राहिले. हे सर्व करीत असताना पाठीच्या कण्याच्या असाध्य व्याधीनं त्यांच्या शरीराला ग्रासून टाकलं होतं.

बाबांच्या ध्येयस्वप्नांची व्याप्ती किती मोठी आहे, याचं तळपतं उदाहरण म्हणजे बाबा आमटे यांच्या मुला-नातवंडांच्या तीन पिढ्यांनी आमूलाग्र बदलून टाकलेली हजारो लोकांची आयुष्यं. बाबांच्या स्वप्नांची पूर्तता होण्यामागे त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या अदम्य इच्छाशक्तीचाही फार मोठा वाटा आहे.

आहे. परिवर्तनाची दिशा स्पष्ट होते. त्याप्रमाणात साहित्यानेही बदलायला हवे. बदल झपाट्याने आत्मसात करून साहित्यनिर्मिती करायला हवी. तरच साहित्याची गोडी टिकून राहण्यास मदत होईल.

**शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील दरी कमी करण्याचे माध्यम म्हणून साहित्याची भूमिका काय असावी?**

साहित्य आणि विद्यार्थी यांच्यातील दरी कमी करण्यासाठी साहित्याच्या भूमिकेपेक्षा हे माध्यम होणे गरजेच आहे. या माध्यमाचा उपयोग शिक्षकांनी दोघांमधील नाते दृढकरण्यासाठी करायला हवा. शिक्षकांनी सकस साहित्य वाचले तरच ते विद्यार्थ्यांना सकस विचार देऊ शकतील. त्या विचारांचे आदानप्रदान घडून अपेक्षित समाजनिर्मिती होईल. हीच बाब आपणा सर्वांसाठी आनंददायी असेल.

**बदलत्या काळात विद्यार्थी घडविण्याची आव्हाने काय आहेत?**

स्पर्धात्मक दुनियेत विद्यार्थी टिकविणे हेच मोठे आव्हान असणार आहे. या युगात गुणवत्तेच्या आधारावरील विद्यार्थीच टिकू शकतील. त्यामुळे त्यांना उत्तम शिक्षण देणे गरजेचे आहे. हे काम शिक्षक करू शकतात. त्यामुळे त्यांच्यावरील जबाबदारी मोठी आहे. ती त्यांनी उत्तमप्रकारे पार पाडल्यास चांगले विद्यार्थी निर्माण होतील. त्यातून संस्कारक्षम पिढी घडून देशाच्या प्रगतीला हातभार लागू शकेल.

**संमेलनानिमित्त अध्यक्ष या नात्याने तुम्ही काय संदेश देऊ इच्छिता?**

आजच्या काळात वाचन कमी झाले आहे. माध्यमांचा जोर वाढला आहे. त्यांचा आवाज अंतःकरणापर्यंत पोहोचेलच याची शाश्वती नाही. फेसबुक, व्हॉटस्अप या माध्यमातून कोणते विचार पोहोचतील हे सांगता येत नाही. गुगलच्या माध्यमातून मिळणारी माहिती परिपूर्ण आणि योग्य असेलच याची खात्री नाही. त्यामुळे आपल्याला ग्रंथालयांकडेच वळावे लागणार आहे. कारण हे साहित्य दीर्घ काळ टिकणारे आणि सकस आहे, हा संदेश संमेलनाच्या व्यासपीठावरून देऊ इच्छितो.

## ✍ 'महाराष्ट्राचे शिल्पकार' मालिकेत पुस्तिका

घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समावेश आता 'महाराष्ट्राच्या शिल्पकारांमध्ये होणार आहे. 'महाराष्ट्राचे शिल्पकार' पुस्तिकांच्या मालिकेत बाबासाहेबांवर चरित्रात्मक पुस्तिका काढण्यात येणार आहे.

राज्य शासनाच्या राज्य मराठी साहित्य व संस्कृती मंडळातर्फे 'महाराष्ट्र शिल्पकार योजना' राबविण्यात येते. रानकवी ना. धों. महानोर यांनी आपल्या

आमदारपदाच्या कारकिर्दीत सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री असताना सरकारशी भांडून ही योजना सुरू केली होती. महाराष्ट्राला घडवण्यात ज्यांचा मोलाचा वाटा आहे, अशा उत्तुंग व्यक्तिमत्त्वांची चरित्रे छोटेखानी स्वरूपात व दहा रुपयांत प्रसिद्ध करून ती समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने ज्येष्ठ साहित्यिक रा. रं. बोराडे मंडळाचे अध्यक्ष असताना १९९४-९५ या काळात ही योजना सुरू झाली. महानोर यांनी यासाठी सरकारकडे महनीय व्यक्तींची यादी दिली होती. त्यामध्ये संत ज्ञानेश्वर, तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बालगंधर्व, दादासाहेब फाळके अशा उत्तुंग व्यक्तिमत्त्वांचा समावेश होता. मात्र ही यादी डावलून दुसऱ्याच व्यक्तींवर मंडळाने चरित्रात्मक पुस्तके प्रसिद्ध केली. अखेर मंडळाला वीस वर्षांनंतर जाग आली असून, बाबासाहेबांनंतर लवकरच चरित्रात्मक पुस्तक काढण्यात येणार आहे. 'डॉ. आंबेडकर यांचे 'महाराष्ट्राचे शिल्पकार' हे चरित्र प्रसिद्ध करण्याचा निर्णय मंडळाच्या बैठकीमध्ये झाला आहे. लवकरच यावर शासनातर्फे शिक्कामोर्तब होईल व पुस्तक प्रसिद्ध केले जाईल', अशी माहिती बाबा भांड यांनी दिली.

'नॅशनल बुक ट्रस्ट व साहित्य अकादमी यांच्यातर्फे चरित्रात्मक पुस्तकांची निर्मिती होते. महाराष्ट्राचे जे शिल्पकार आहेत, त्यांच्यावर अशाच छोट्या पुस्तिका काढण्यात याव्यात. उत्तुंग व्यक्तिमत्त्वांचे विचारदर्शन घडावे, यासाठी मी पाठपुरावा केला होता,' अशी प्रतिक्रिया महानोर यांनी दिली.

## ✍ अथर्वशीर्ष अनुवाद

डॉ. अविनाश पितळे विरचित 'श्री गणपती अथर्वशीर्षसूक्ताचा मराठी ओवीबद्ध अनुवाद' या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच झाले. गोविंदराव बेडेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्र. ल. गावडे अध्यक्षस्थानी होते. पीएच. डी. पदवी मिळाल्याबद्दल आचार्य श्याम घळसासी यांच्या हस्ते डॉ. पितळे यांचा सत्कार करण्यात आला. 'गणपती अथर्वशीर्ष मराठीत असून, हा अनुवाद प्रसन्न, सुबोध आणि सरल आहे,' असे मत डॉ. गावडे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमास शांता पितळे, एन. व्ही. रत्नाळकर, एस. एम. फडके, एम. के. शिरुडे, डी. डी. बडे, राजेंद्र भरते, एन. बी. जमेनीस, डॉ. एस. आर. काळे, श्रीराम बोरसे आदी मान्यवर उपस्थित होते.

## ✍ बडोदा येथे मराठी वाङ्‌मय परिषदेचे ६८वे अधिवेशन

'साहित्य हा केवळ अक्षरानुभव नव्हे, जीवनानुभव व्हावा. केवळ वास्तवाचे चित्रण करायचे आणि परिणामांसाठी ते वाचकांपुढे मांडायचे, हे योग्य नाही. वास्तव मांडल्याने प्रश्न सुटत नाहीत, तर प्रश्न समजतात आणि त्यावरील चिंतनाने ते सुटतात. केवळ वास्तवाचे चिंतन म्हणजे साहित्य नव्हे, तर वास्तवाच्या चित्रणाबरोबर चिंतन म्हणजे साहित्य होय,' असे विचार बडोदा येथील मराठी वाङ्‌मय परिषदेच्या वतीने आयोजिलेल्या ६८व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रामचंद्र देखणे यांनी व्यक्त केले.

श्रीमंत राजमाता शुभंगिनीराजे गायकवाड यांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्‌घाटन झाले. डॉ. पी. डी. पाटील, बडोद्याचे महापौर भरत डांगर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. बडोदा वाङ्‌मय परिषदेचे अध्यक्ष दिलीप खोपकर, कार्यवाह चंद्रकांत धाडणकर, मिलिंद बोडस, विजय कारखानीस आदी उपस्थित होते. या वेळी ठाणे येथील प्रा. नरेंद्र पाठक यांनी संपादित केलेल्या 'चैत्रेय' या वार्षिकाचे प्रकाशन डॉ. देखणे यांच्या हस्ते करण्यात आले.

महाराष्ट्राबाहेर ज्या ज्या ठिकाणी मराठी भाषा, संस्कृती टिकून आहे, त्या ठिकाणी भेट द्यावी, या भूमिकेतून आपल्याशी संवाद साधत आहे. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी कोल्हापूरच्या साहित्य संमेलनात रसिकांना 'सभ्य गृहस्थ' म्हणून हाक दिली होती आणि मराठी माणूस जोडला गेला अशी आठवण डॉ. पी. डी. पाटील यांनी सांगितली. बडोदा हे शहर गुजरातची सांस्कृतिक राजधानी आहे. येथे मराठी, गुजराती आणि हिंदी या भाषा प्रेमाने नांदत आहेत. त्या भाषांतील चांगल्या साहित्याचे आदानप्रदान होते,' असे प्रतिपादन राजमाता शुभांगिनीराजे गायकवाड यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात लोकसाहित्य, दलित साहित्य, ललित साहित्य आणि सुधारकांच्या साहित्य प्रवाहाचा तपशीलवार मागोवा डॉ. देखणे यांनी घेतला.

संत, सुधारक, साहित्यिक आणि जनलोक हीच माझ्या साहित्यचिंतनाची चतुःसूत्री आहे, असे सांगत डॉ. देखणे म्हणाले, "मराठी भाषेचे सामर्थ्य अलौकिक आहे. जगातील प्रमुख २० भाषांमध्ये मराठी अभिमानाने वावरते आहे. शिक्षणाच्या माध्यमातून जरी इंग्रजी ही माध्यमांची भाषा झाली तरी मराठी माणसाच्या अभिव्यक्तींची भाषा मराठीच आहे. अभिव्यक्ती दडपणे म्हणजे मुकेपण होय. म्हणूनच उत्तम अभिव्यक्तींसाठी मातृभाषेचे संस्कार व्हायलाच हवेत. मराठीपासून दुरावलेल्या मुलांना ज्ञानोबा-तुकोबांची प्रासादिक वाणी सांगा, मराठीची गोडी

आपोआप लागेल. उच्चभ्रू आणि काहीसा मध्यम वर्ग मराठीपासून बाजूला जातो आहे, तो केवळ संतवाणीपासून दुरावल्याने. एकदा ती अवीट गोडी चाखू या, की मग भाषेविषयी गोंधळलेले सारेच जण पुन्हा मायमराठीचा- अमृतवाणीचा- आनंद घेऊ लागतील. भाषा ही शब्दांच्या अंगाने वसत असते; पण संस्कृतीच्या अंगाने ठसत असते.

## ✍ स्थानिक सेवांसाठी फेसबुकवर सुविधा

जगातील सर्वांत मोठे सोशल नेटवर्किंग संकेतस्थळ फेसबुक स्थानिक सेवेसाठी संकेतस्थळाची चाचणी घेत आहे. त्यामुळे वापरकर्त्यांना इव्हेंट प्लॅनिंगपासून फिटनेस, स्पा आदी सेवा स्थानिक पातळीवर शोधता येतील. वापरकर्त्याला घेतलेल्या सेवांचे मूल्यांकनही करता येणार आहे. हे संकेतस्थळ हायपरलोकल मॉडेलच्या तत्त्वानुसार काम करेल. त्यानुसार या संकेतस्थळाच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर विविध सेवा पुरविल्या जातील. या सेवा पुरविणाऱ्यांना आपल्या फेसबुक पेजमार्फत सेवांची सविस्तर माहिती अपलोड करता येईल. वापरकर्त्यांना अपेक्षित असलेल्या सेवा आणि या सेवा देणाऱ्या वापरकर्त्यांची पेजेस सहज उपलब्ध होण्यासाठी आम्ही हा पुढाकार घेतल्याची माहिती कंपनीच्या प्रवक्त्याने दिली आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरपासून या संकेतस्थळाची चाचणी सुरू आहे. सध्या संकेतस्थळावर कला, मार्केटिंग, ऑटोमोटिव्ह, बिझनेस, आर्थिक, वैद्यकीय आणि आरोग्य, स्पा, सौंदर्य आदी सेवांची यादी केली आहे. फेसबुकवर २० लाखांपेक्षा अधिक लघू आणि मध्यम व्यावसायिकांचे खाते असून, ते आपल्या व्यवसायासाठी फेसबुकचा वापर करतात. कंपनीच्या नव्या संकेतस्थळामुळे आधीपासूनच स्पर्धात्मक असलेल्या स्थानिक सेवांच्या मार्केटवरचा दबाव आणखी वाढेल. सध्या क्विकर, अर्बन क्लॅप आदींच्या मार्फत अशा सेवा पुरविल्या जातात.

## ✍ चरित्रातून उलगडणार अनेक अनभिज्ञ बाबी- सुरेश भट होते धाडसी

सुरेश भट हे मराठीतील एक सुप्रसिद्ध कवी होते. त्यांनी मराठी भाषेत गझल हा काव्यप्रकार रुजवला, अशा बऱ्याच गोष्टी आपल्याला या गझलसम्राटाबद्दल माहिती आहेत. त्यांच्या स्वभावाचे अनेक किस्से आजही चर्चिले जातात. पण, ते अत्यंत संयमी आणि धाडसीदेखील होते. त्यांच्या या स्वभावासोबत त्यांच्याबद्दल अनेक माहिती नसलेल्या गोष्टी 'गझलसम्राट सुरेश भट आणि...' या चरित्रातून बाहेर येणार आहेत.

‘दूर तू आहेस अन् सुचते न गाणे
हे असे माझे जीणे लाजीरवाणे
मी भट्टांचा कोण आहे काय सांगू
गझल माझी सांगते आहे घराणे...’

असे म्हणणारे पुण्याचे प्रदीप निफाडकर हे सुरेश भटांचे शिष्य आणि गझलकार असून, तेच सुरेश भटांचे चरित्र लिहीत आहेत. हे तीनशे पानांचे चरित्र सप्टेंबर महिन्यापर्यंत प्रकाशित होईल, अशी माहिती प्रदीप निफाडकर यांनी दिली. ते म्हणाले, ‘‘सुरेश भट मला आपला मुलगाच मानत. त्यामुळेच त्यांचे चरित्र लिहिण्यास सुरुवात केली. सुरेश भटांचे चरित्र अजून आलेले नाही. जवळपास तीनशे पानांचे हे चरित्र असेल. यात सुरेश भटांचे दोन महत्त्वाचे गुण प्रकर्षाने पुढे येणार आहेत. एक म्हणजे संयम. त्यांची जेव्हा जेव्हा उपेक्षा झाली आणि समकालीन कवींनी व समीक्षकांनी त्यांना जो त्रास दिला, त्याला कधी त्यांनी उलट उत्तर दिले नाही. आपल्या प्रतिभेवरचा विश्वास त्यांनी कधी ढळू दिला नाही आणि दुसरा गुण होता धाडस! बाळासाहेब ठाकरे व शरद पवार यांच्यासारखे दिग्गज नेते हे राजकारणात कुठे चुकले किंवा त्यांनी ढोंगीपणा केला, तर सुरेश भट आपल्या लेखणीतून त्यांच्यावर सडकून टीका करीत असत. या दोन दिग्गजांविरुद्ध लिहिण्याचे धाडस केवळ सुरेश भटांमध्येच होते.’’

प्रदीप निफाडकर हे चरित्र लेखन २००७ सालापासून करीत आहेत. त्याकरिता ते बऱ्याचदा नागपुरातही येऊन गेले आहेत. सुरेश भट यांच्या आठवणी, दुर्मिळ छायाचित्रांचा त्यांनी संग्रह केला असून, त्यांचा या चरित्रात समावेश करण्यात आला आहे.

सुरेश भट आणि गझलेची चळवळ, तिचा प्रारंभ कसा झाला, ही चळवळ कशी वाढत गेली, त्यासाठी त्यांना काय कष्ट करावे लागले, अशा अनेक गोष्टी चरित्रातून बाहेर येणार आहेत. याशिवाय, त्यांच्या उर्दू गझलही या निमित्ताने वाचायला मिळतील. बऱ्याच लोकांना ते उर्दूतही लिहीत होते, हे माहिती नाही.

‘सुरेश भट मध्य प्रदेशातील इंदूर येथे काही काळ जकात नाक्यावर कारकून होते, हेही अनेकांना माहिती नाही. अशा अनेक गोष्टी चरित्रातून पुढे येणार आहेत. सुरेश भट व ग्रेस यांच्यात मतभेद होते का, यावरही यात प्रकाश टाकला आहे,’ असे प्रदीप निफाडकर यांनी सांगितले.

## ✍ दिवस पटकथा लेखिकांचे

स्त्रिया अधिक प्रगल्भ आणि सुंदरपणे पाहू शकतात. म्हणूनच त्यांनी त्याच त्या गुलाबी फुग्यांमध्ये न अडकता पटकथालेखनातून व्यापक दृष्टिकोन प्रेक्षकांपर्यंत पोहोचवायला हवा.

मराठीत पटकथलेखिका वाढत आहेत. यात 'जीत'च्या मंजुश्री गोखले, 'अँड जरा हटके' लिहिणाऱ्या मिताली जोशी, 'कॉफी आणि बरंच काही' आणि आता आगामी 'सायकल' लिहिणारी आदिती मोघे, 'मला आई व्हायचंय', 'प्रकाश बाबा आमटे,' आणि आगामी 'हेमलकसा' लिहिणाऱ्या समृद्धी पोरे या पटकथालेखिका आहेत. यापूर्वीही 'प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं' (मनीषा कोरडे) आणि 'एलिझाबेथ एकादशी' व 'तप्तपदी'चं (मधुगंधा कुलकर्णी) पटकथा आणि संवादलेखन स्त्रियांनीच केलं आहे.

पूर्वी मराठीत फक्त अभिनय, नृत्य, गायन, यांसारख्या कला क्षेत्रातच स्त्रियांचा वावर दिसायचा. आता मात्र या पलीकडच्या सिनेमातील विविध उपक्षेत्रांतही स्त्रियांनी जोरदार मुसंडी मारली आहे. मराठीत प्रदर्शित होणाऱ्या सिनेमांत तरी पटकथा लेखिकांचं प्रमाण जवळपास ५० टक्के दिसू लागलंय.

लेखन ही स्वांतसुखाय- घरातील टेबलाशी बसून करायची गोष्ट असते. पटकथालेखनात दिसणारं दृश्य आणि ते रंगवणारी व्यक्तिरेखा यांना लिहिलेले शब्द योग्य ठरतील की नाही, ती व्यक्तिरेखा, त्याची स्वभाववैशिष्ट्यं ही सिनेमाच्या दृष्टीनं कशी पुढे जाणार, याचा विचार सिनेमाशी संबंधित व्यक्तींशी बोलून करावा लागतो. हा संयम ज्यांच्यात आहे, त्या स्त्रिया पटकथा आणि संवादलेखनही करू शकतात. हा बराचसा तांत्रिक भाग असल्यामुळे त्याकडे वळण्याचे प्रमाण सुरुवातीला कमी होते.

सिनेमाच्या क्षेत्रात एकदा का तुमचा योग्य लोकांशी उत्तम संपर्क प्रस्थापित झाला, की हे घरीच बसून करता येण्यासारखंही काम आहे आणि त्यात भाषेनुसार अर्थार्जनही उत्तम होत असल्याचें 'अँड जरा हटके'ची पटकथा लेखिका मिताली जोशी सांगते. ती म्हणाली, 'स्त्रिया बहुतेक वेळा नात्यांचे बंध आणि भावनांचा आविष्कार लेखनातून मोठ्या प्रमाणात करत असतील, तर तीच आमची ताकद आहे; कारण स्त्रियांचा भावनांक जास्त असतो. त्यांनी पुरुषांसारखं लिहिण्याची काहीच गरज नाही. तसं त्या करत नाहीत; म्हणूनच त्यांचे विषय वेगळे ठरतात.' हिंदी सिनेमात पटकथालेखिकांची यादी चांगलीच मोठी आहे.

'मालामाल वीकली', बिल्लू', 'भुलभुलैया, 'ढोल', 'रंगरेज', 'बम बम बोले', 'मेरे बाप पहले आप' या सिनेमांचे पटकथा आणि संवादलेखन एका स्त्रीनं

केले आहे. पटकथालेखिका मनीषा कोरडे म्हणाल्या, "मुंह में तमाखू की गोली जितना गाव है हमारा' सारख्या संवादांना उत्तम हशा मिळतो. हे स्त्रीने लिहिलेले संवाद आहेत, हे कळल्यानंतर 'स्त्री कसं काय हे लिहू शकते?' अशी प्रतिक्रिया किंवा 'म्हणजे तंबाखू वगैरे खात असली पाहिजे ही' असा समज लोक करून घेतात. अर्थात, यासाठी अनुभवाची नाही, तर परकायाप्रवेशातून भावना लक्षात घेण्याची आणि बारकाईने केलेल्या निरीक्षणाची आवश्यकता असते.'

## ✍ खरी समता आर्थिक

'स्वातंत्र्य, समता, बंधुभाव फक्त नावाला उरला आहे. अमुक आपले बंधुत्व आहे, असे म्हणणेसुद्धा जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. नुसत्या आरक्षणाने समता येत नाही. खरी समता आर्थिक असावी लागते,' असे प्रतिपादन ज्ञानपीठ विजेते ज्येष्ठ साहित्यिक डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी केले. 'मुक्तसंवाद' कार्यक्रमात ते बोलत होते.

राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष बाबा भांड यांच्या 'स्वातंत्र्ययोद्ध्यांचे पाठीराखे महाराजा सयाजीराव गायकवाड' या पुस्तकाचे डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. बाबा भांड, संजय भास्कर जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी नेमाडे यांनी साहित्य, इतिहास, संस्कृती, राजकारण यांवर चौफेर भाष्य केले. 'जात मोडा असे सांगणारेच मनात जात जपतात, असे अनेक लोक पाहिले. ब्राह्मण राष्ट्रवाद रोखण्यासाठी १९०१ मध्ये जाट, नागा, मराठा अशा जाती तयार झाल्या. तोपर्यंत मराठ्यांना कुणबी म्हणत. आपण कुणबी होतो मग आरक्षण पाहिजे, पण या रचनेमागील सत्य समजून घेतले जात नाही. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव जाहीर करूनही देशाचे भले झाले नाही. यामागील ६६ वर्षांत घरोघरी पाणीसुद्धा दिले नाही. आरक्षणाने समता येत नाही. खरी समता आर्थिक असावी लागते. नोकरी हुकली की दुसऱ्यांना आरक्षण असल्यामुळे संधी मिळाली नाही, असे म्हणण्याची फॅशन आहे. तर ज्यांचा नंबर खुल्या प्रवर्गात लागतो, ते स्वतःला मेरिटचे समजू लागले,' असे नेमाडे म्हणाले.

## ✍ चित्रपट संग्रहालयात दुर्मिळ पोस्टर्स

१९३७ मध्ये प्रदर्शित झालेला कुंकू, तसेच बाजीप्रभू देशपांडे (१९३९), छाया (१९३६), विलासी ईश्वर (१९३५) या चित्रपटांची दुर्मिळ पोस्टर्स संग्रहालयात आता पाहता येतील. शिवाय, हॉलिवूडमधील १० चित्रपटांच्या

पोस्टर्सचेही जतन केले जाणार आहे.

इतिहासाचा सार्थ अभिमान मिरवणारे... भक्तिरसाला वाहिलेले... आणि मानवी नातेसंबंधांचे तरल चित्रण असणारे चित्रपट म्हणून भारताच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील चित्रपट ओळखले जातात. या काळाचा अन् तत्कालीन भारतीय मनाचा आरसा असणाऱ्या सुमारे ५० चित्रपटांच्या पोस्टर्सचा दुर्मिळ ठेवा राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाला मिळाला आहे. संग्रहालयात तो जतन करून ठेवला जाणार आहे.

पुण्यातील हौशी संग्राहक सतीश अदिवरेकर यांनी हा अनमोल ठेवा संग्रहालयाकडे सुपूर्त केला आहे. अदिवरेकर यांना त्यांच्या वडिलांकडून हा ठेवा मिळाला होता. एवढे दिवस जपलेली ही पोस्टर्स त्यांनी आता संग्रहालयाला जतन करण्यासाठी दिली आहेत.

ही सर्व पोस्टर्स १९३०च्या दशकातील चित्रपटांची असून, त्यांची संख्या ५० हून अधिक आहे. 'चित्रपट रसिक, समीक्षक, अभ्यासकांकडे चित्रपटाच्या संदर्भात कुठल्याही स्वरूपाचा दुर्मिळ संग्रह असल्यास त्याचे शास्त्रीय पद्धतीने जतन होण्याकरिता त्या वस्तू संस्थेकडे द्याव्यात,' असे आवाहन संग्रहालयाचे संचालक प्रकाश मगदूम यांनी केले.

## ✍ 'जंगल' ५० कोटींवर


छोट्यांची उत्सुकता ताणणारा आणि मोठ्यांना 'नॉस्टॅल्जिक' होण्याची संधी देणारा 'द जंगल बुक' थिएटरवर धो-धो चालतोय. या सिनेमाने पहिल्या चार दिवसांत सुमारे ५० कोटींची रेकॉर्डब्रेक कमाई केली असून, हा आकडा आणखी वाढतोच आहे.

हॉलिवूडमध्ये ॲनिमेशनपट हे वर्षभर प्रदर्शित होतच असतात; पण भारतात ॲनिमेशन म्हणजे मुलांचे सिनेमे असं समीकरण असल्याने सुट्ट्यांच्या दिवसांत असे सिनेमे मोठ्या प्रमाणावर आले आहेत. त्यामुळेच अमेरिकेआधी इथल्या सुट्ट्यांच्या मुहूर्तावर 'द जंगल बुक' आठ एप्रिलला आपल्याकडे प्रदर्शित झाला आणि तो रेकॉर्डब्रेक कमाई करतोय. या सिनेमाचे वैशिष्ट्य म्हणजे मुलांबरोबरच आई-वडीलही हा सिनेमा बघण्यासाठी उत्सुक असल्याच दिसून येतेय. या सिनेमाच्या निमित्ताने मोठ्यांना आपल्या बालपणात डोकावण्याची संधी मिळतेय. 'जंगल बुक' या कथेच्या दोन पिढ्यांशी असलेल्या नात्यामुळेच हा सिनेमा बघण्यासाठी थिएटर्सवर तुफान गर्दी होतेय.

या सिनेमाने भारतातलं हॉलिवूड सिनेमांबाबतचं आजवरचं समीकरण बदललंय. त्याचं मुख्य कारण म्हणजे 'जंगल बुक' कथेचं अस्सल भारतीयपण.

**४थी आवृत्ती**






**मूळ लेखक -** रत्नाकर मतकरी

**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

‘अॅडम’चा नायक वरदचा जीवनप्रवास थोड्याफार फरकाने बऱ्याच पुरुषांचा असतो, तसाच आहे.

लहानपणी स्त्री-देहाविषयींचे कुतूहल, ते नीटसे न भागणे. पुढे असमाधानी स्त्रियांकडून वापरले जाणे,

नंतर खरेखुरे प्रेमात पडण, त्याच्याविषयी प्रेम नसतानाही ‘श्यामले’ने सोयीसाठी त्याच्याशी लग्न करणे,

आणि कालांतराने आपल्या प्रियकरांशी संबंध ठेवून वरदचे जिणे उद्ध्वस्त करणे, जिला तिच्या मुलांसह विनाअट आधार दिला त्या ‘प्रेमा’ने पुढे घरामध्ये वाटा मागणे

आणि ज्या ‘निर्मले’कडून किंचितकाल प्रेम मिळाले तिलाही अखेर दुरावणे, असा वरदच्या प्रेमाचा आलेख आहे.

आज आपल्या मुलांना हा सिनेमा पाहायला घेऊन जाणाऱ्या आई-बाबांनी कधी काळी ‘जंगल बुक’ ही मालिका घरबसल्या पाहिली होती (किंवा पुस्तकातून वाचली होती.) त्यातल्या लाडक्या हिंदी अभिनेत्यांच्या आवाजातले शेर खान, बगिरा यांच्यामुळे त्यांची रविवारची सकाळी टीव्हीला चिकटण्यात गेली होती. ‘जंगल जंगल बात चली है...’ या गुलजार यांनी लिहिलेल्या गाण्यामुळे तर हे जंगल बुक आणखी आपलंसं वाटलं. हॉलिवूडच्या ॲनिमेशनपटात रुडयार्ड किपलिंग यांनी लिहिलेल्या कथेतला मोगली आपला मित्र वाटतो. त्यामुळे ‘जंगल बुक’ हिट झालं होतं. (आजही आहे.) डिस्नेनं ‘जंगल बुक’ भारतात प्रदर्शित करताना नेमकी ही गोष्ट लक्षात ठेवल्यानं हा सिनेमा हिट झाला. ‘जंगल बुक’ महाराष्ट्रात हिंदी आणि इंग्रजी या दोन भाषांत प्रदर्शित झाला.

प्रदर्शित झाल्यापासून या सिनेमानं देशभरात सुमारे ४८.७ कोटींची कमाई केली. हॉलिवूडच्या कोणत्याही सिनेमाला चार दिवसांत इतकी कमाई करता आलेली नाही.

## ✍ पुस्तकं सांगतात गोष्ट; वाहून गेलेल्या दिवसांची

पुस्तकं सांगतात गोष्ट, वाहून गेलेल्या दिवसांची युगायुगांची, विश्वाची, माणसांची, आजची, कालची, उद्याची, एका-एका क्षणाची...

या कवितेची आठवण यावी, असे दृश्य जागतिक पुस्तक दिनानिमित्त आयोजित पुस्तक प्रदर्शनात अनुभवायला मिळाले. जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातर्फे हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

वाचनसंस्कृती वाढावी हा उद्देश समोर ठेवून पुस्तक प्रदर्शन आयोजित करावे, असा अध्यादेश राज्य सरकारने प्रसिद्ध केला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातर्फे आयोजित प्रदर्शनात जुनी व नवी नानविध पुस्तके ठेवण्यात आली आहेत. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज, शिवाजी महाराज यांच्यापासून अब्दुल कलाम यांच्यापर्यंतच्या विविध पुस्तकांना या प्रदर्शनात चांगली मागणी आहे. याशिवाय कथा, कादंबऱ्या, कविता या वाङ्मय प्रकारांतील पुस्तकांना आणि पक्षी कोश, भारतीय सरिता कोश, वाणिज्य कोश यांनाही प्रतिसाद मिळत आहे. वाचक उत्सुकतेने ही पुस्तके घेत आहेत. अशी माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी उज्ज्वला लोंढे यांनी दिली.

## ✍ ‘जैन’ परिषदेत धर्म-कर्म-ज्ञानाचा त्रिवेणी संगम

'जितो' तर्फे दर दोन वर्षांनी आंतरराष्ट्रीय परिषद व संमेलनाचे आयोजन करण्यात येते. यंदा हे संमेलन पहिल्यांदाच पुण्यात मे मध्ये तीन दिवस संपन्न झाले. देश-विदेशातील चार लाख उद्योजक यात सहभागी होते. त्यासाठी गुलटेकडी मार्केट यार्डजवळील गंगाधाम चौकालगतच्या १६ एकरांत सभामंडप उभारला होता.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामुळे जगातील उद्योगव्यापार जगताचे स्वरूप बदलले. भारताने १९११ मध्ये जागतिकीकरणाच्या धोरणांचा स्वीकार केला आणि इथला उद्योजक व व्यापारी वैश्विक बनू लागला. मात्र, इथली परिस्थिती, उपलब्ध साधनसामग्री आणि त्यासाठी आवश्यक ज्ञानाची कमतरता असल्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर काहीच भारतीय उद्योजकांना आपल्या कामाची मोहोर उमटविता आली. या वाटचालीत उद्योजक व व्यापारी कुठेही कमी पडू नयेत व त्याला काळानुरूप अद्ययावत करता यावे, या उद्देशातून जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन म्हणजे 'जितो' या संस्थेचा जन्म झाला.

पारंपरिक व्यापार आणि उद्योग करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. मॉल आणि ऑनलाईन व्यापार व उद्योगाच्या काळात आता ही परिस्थिती बदलणे अपेक्षित आहे. जागतिक बाजारपेठेत भारतीय टॅलेंटला मागणी आहे. इथे उद्योगांचीदेखील कमतरता नाही; परंतु, त्यासाठी उद्योजक व व्यापारी वर्गाचे प्रशिक्षण होणे गरजेचे आहे. आपला समाज विविध जाती-जमातींमध्ये विभागला आहे. अशीच परिस्थिती जैन धर्मातही आहे. स्थानकवासी, दिगंबर, मंदिरमार्गी, तेरापंथी अशा पंथांत तो विभागला आहे. या समाजाला एकत्र आणण्याचे काम 'जितो' करीत आहे.

'जितो'द्वारा उद्योजकांसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग घेतले जातात. त्याचबरोबर महिलांसाठीही विशेष शाखा आहे. उच्च शिक्षणासाठी 'जितो'ने जेएटीएफ सुरू केले आहे. यामध्ये प्रशासकीय सेवेत जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्वप्रकारच्या सुविधा पुरविल्या जातात. जैन धर्मातील सर्व पंथांच्या धर्मगुरूंच्या आरोग्यासाठी काम करण्यात येते. 'जितो'चे जगात अमेरिका, युके, दुबई, सिंगापूर, हाँगकाँग या ठिकाणी, तर भारतात ४७ एवढे विभाग आहेत. भारत देश सध्या विकासाच्या महत्त्वाच्या टप्प्यावर आहे. त्यामुळे देशाचा सुवर्णकाळ परत आणण्यासाठी हातभार लावला पाहिजे. हेच काम जितोच्या सर्व विभागांमार्फत सुरू आहे.

जैन धर्मातील नवीन पिढीला हे तत्त्वज्ञान व जीवनपद्धतीचा इतिहास माहिती व्हावा, तसेच इतर धर्मीयांना जैन धर्माची माहिती होण्यासाठी जैन पॅव्हेलियन तयार केले आहे. यामध्ये महावीर जैन यांच्या दुर्मिळ व मौल्यवान स्फटिकांमध्ये

बनविलेल्या मूर्त्या ठेवणार आहे. ४० हजार चौरस फूट आकाराचे जैन पॅव्हेलियन तयार केले आहे. यामध्ये लेझर शो, जैन धर्माविषयी ३ डी ॲनिमेशन फिल्म आणि जैन धर्म व विज्ञान यांच्या सहसंबंधाविषयीचे मार्गदर्शन होणार आहे.

महाराष्ट्रात सध्या दुष्काळाची परिस्थिती आहे. त्यामुळे 'जितो'ने दुष्काळग्रस्त भागातील ५०० गावे दत्तक घेण्याचा निर्णय घेतला आहे.

## ✍ 'सामाजिक कविता : शोध आणि बोध'चे प्रकाशन

"सामाजिक आशय लिहिणारे कवी जास्त असले तरी सामाजिक कविता म्हणजे 'स्लोगन' नव्हे. 'सामाजिक' हा शब्द खूपच ढोबळ असला, तरी वर्गलक्षी आणि जातलक्षीमध्ये आजची कविता अडकली आहे. सामाजिकतेला पुरून उरते ती सामाजिक कविता; पण अशा कविता किती आहेत, याचा शोध घ्यावा लागेल," असे मत संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केले.

स्वरूप प्रकाशनातर्फे आयोजित सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. अविनाश सांगोलेकर यांच्या 'सामाजिक कविता : शोध आणि बोध' या समीक्षाग्रंथाचे प्रकाशन झाले. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, मंगेश काळे व प्रकाशक वासुदेव मुलाटे, सांगोलेकर उपस्थित होते.

डॉ. मोरे म्हणाले, "वैयक्तिक आणि सामाजिक आशय अशा मांडणीमधून कविता व्यक्त होते; पण वैयक्तिकतेपेक्षा सामाजिक कविता लिहिणे खूप अवघड असते. प्रत्येक कवी स्वत:शी निगडित भावनांची मांडणी करीत असतो. स्वत:मध्ये काय चालले आहे, हे समजणे तसे अवघड नाही; पण सामाजिक कवितेत कवी ज्या इच्छा-आकांक्षा व्यक्त करतो त्या स्वत:च्या असतीलच असे नाही. समाजाचा तो एक प्रवक्ता बनतो."

डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, "सामाजिक कवितेचे प्रमुख अंग वेदना हेच असते, त्याशिवाय ती व्यक्त होत नाही. वर्ग आणि जातीचे वास्तव यांचे पदर कवितांमधून मांडले जात आहेत, परंतु या सामाजिक जाणिवांच्या मागे असलेला समाज कोणत्या वर्गाचा आहे, याचा शोध घ्यायला हवा."

डॉ. प्रभाकर देसाई यांनी सूत्रसंचालन केले.

## ✍ 'मसाप'च्या अध्यक्षपदी डॉ. कसबे

मराठी भाषा, साहित्याची जपणूक, विकास आणि प्रसारासाठी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या (मसाप) अध्यक्षपदी ज्येष्ठ विचारवंत डॉ.

रावसाहेब कसबे यांची, तर परिषदेत नव्याने स्थापन करण्यात आलेल्या संशोधन विभागाच्या प्रमुखपदी कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांची निवड झाली आहे.

उपाध्यक्ष म्हणून लेखिका तारा भवाळकर, निर्मला ठोकळ आणि चंद्रकांत शेवाळे यांची निवड झाली. परिषदेच्या विश्वस्तपदाचा मान भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम, माजी खासदार यशवंतराव गडाख, माजी आमदार उल्हास पवार यांना दिला आहे. साहित्य परिषदेच्या 'मसाप पत्रिका'च्या संपादकपदाची धुरा डॉ. पुरुषोत्तम काळे यांच्याकडे तर सहायक संपादकपदाची जबाबदारी सुरेश देशपांडे यांच्याकडे सोपविली आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळावर परिषदेचे प्रतिनिधी म्हणून प्रा. जोशी, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे आणि रवींद्र बेडकीहाळ यांची निवड झाली आहे. विभागीय साहित्य संमेलनाची जबाबदारी पद्माकर कुलकर्णी, राजन लाखे, विनोद कुलकर्णी, शशिकला पवार यांच्यावर सोपविली आहे. पुण्याबाहेरील कार्यवाह म्हणून विनोद कुलकर्णी (सातारा), तानसेन जगताप (जळगाव) यांची या बैठकीत निवड करण्यात आली.


## ✍ अहिराणी कस्तुरी साहित्य संमेलन

"अहिराणी भाषेत एक वेगळा गोडवा आहे. अहिराणी संस्कृतीचा बाज निराळा आहे. त्याचा आपण अभिमान बाळगला पाहिजे. खानदेशातील खेड्यापाड्यांत अनेक बहिणाबाई चौधरी आहेत. मात्र, त्या उपेक्षित आहेत. त्यांना योग्य संधी मिळायला पाहिजे. अहिराणीला राजभाषेचा दर्जा मिळावा आणि खानदेशाचे 'कान्हदेश' असे नामकरण व्हावे," अशी भूमिका प्रसिद्ध अहिराणी अभ्यासक डॉ. उषा सावंत यांनी मांडली.

चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात खानदेश अहिराणी कस्तुरी मंचातर्फे (पुणे) तिसऱ्या एक दिवसीय राज्यस्तरीय अहिराणी कस्तुरी साहित्य संमेलनाचे आयोजन केले होते. 'खानदेशहित संग्राम'चे अध्यक्ष भैय्यासाहेब पाटील, संमेलनाचे कार्याध्यक्ष नामदेव ढाके, स्वागताध्यक्ष विवेक ठाकरे, प्रसिद्ध दिग्दर्शक प्रवीण तरडे, मंचाच्या संस्थापक विजया मानमोडे, प्रकाश पाटील, डॉ. सुरेश सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

संमेलनात दिवंगत डॉ. भवरलाल जैन (मरणोत्तर) यांना जाहीर झालेला 'अखिल भारतीय खानदेश कोहिनूर पुरस्कार' त्यांचे नातू राहुल जैन यांनी स्वीकारला. अहिराणी साहित्यिक देविदास हटकर (अहिराणी कस्तुरी साहित्यरत्न),

**९वी आवृत्ती**




*भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न*
*डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम*
*यांचे अनमोल विचारधन*

# अदम्य जिद्द

**मूळ लेखक -** ए.पी.जे. अब्दुल कलाम

**अनुवाद -** सुप्रिया वकील

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

‘अदम्य जिद्द’ हे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी विविध प्रसंगी, विविध ठिकाणी केलेली भाषणे, संवाद, चर्चा यांचे संकलन आहे.
रामेश्वरच्या सागरतीरापासून ते राष्ट्रपती भवनापर्यंतच्या त्यांच्या विलक्षण जीवनप्रवासाचे लख्ख प्रतिबिंब यात उमटले आहे. ‘अदम्य जिद्द’ हे आहे त्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोनाचे व चिंतनाचे सार.
विकसित भारताचे स्वप्न पाहणाऱ्या एका थोर, द्रष्ट्या नेत्याचा कणखर आदर्श या पुस्तकात पाहायला मिळतो.
हा आहे एका मूल्यप्रेमी, देशभक्त, सच्च्या ज्ञानोपासकाच्या नितळ काळजाचा उत्कट उद्‌गार! अनेक घटना, प्रसंग, कथा, सुविचार यांची ओघवती माला गुंफत
डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम आपल्याला एक चिंतनशील विचारवंत, वैज्ञानिक, शिक्षक व राष्ट्रपती अशा विविध भूमिकांमध्ये भेटतात, त्यांतून त्यांच्या व्यक्तित्वाचे मार्गदर्शक व प्रेरणादायी असे विविध पैलू झळाळून उठले आहेत.
हे अनमोल विचारधन सर्वांनाच विचारास प्रवृत्त करणारे व आदर्शवत आहे.

ज्येष्ठ पत्रकार कुंदन ढाके, साहित्यिक सुरेश पवार आणि सामाजिक कार्यकर्ते दादाभाऊ पाटील, ज्येष्ठ साहित्यिक बापूसाहेब पिंगळे, सुरेश पाटील (खानदेशरत्न), ज्येष्ठ अहिराणी साहित्यिक एम. के. भामरे आणि 'सकाळ'चे पत्रकार दीपेश सुराणा (समाजरत्न), निर्माता कैलास वाणी आणि ज्येष्ठ नाट्यकलाकार शिवदास जोंधळे (कलारत्न), आमदार उन्मेष पाटील (समाजव्रती), उद्योजक दीपक पाटील (उद्योगरत्न) आदींना विविध पुरस्कार देण्यात आले. भटुलाल बागूल, अनुपमा जाधव यांनी सूत्रसंचालन केले. दिलीप पाटील यांनी आभार मानले.

सहा महिन्यांनंतर चौथे खानदेश अहिराणी कस्तुरी ग्रामीण साहित्य संमेलन जळगावातील जैन उद्योगसमूहाच्या वतीने घेण्याची घोषणा संमेलनाचे स्वागताध्यक्ष विवेक ठाकरे यांनी केली. मायबोली अहिराणी भाषेसोबतच अहिराणी भागातील शेतकऱ्यांना सहभागी करून शेती, पाणी व संवर्धनासाठी आगामी संमेलनात काम केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## ✍ झोपडपट्टीवासीयांसाठी मोबाईल लायब्ररी

वापरात नसलेल्या टेम्पो ट्रॅव्हलरचे पुस्तक वाचनालयात रूपांतर करून शेकडो मुले, त्यांचे पालक यांची वाचनाची भूक भागवण्याचा उपक्रम डब्ल्यूएनएल ग्लोबल सर्व्हिसेस (डब्ल्यूसीएफ) यांच्या वतीने कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी, अर्थात 'सीएसआर'च्या माध्यमातून मुंबई, नाशिक आणि चेन्नई येथे राबवला जात आहे. या वाचनालयात जाऊन तुम्ही पुस्तके वाचू शकताच तसेच एखादे पुस्तक आवडल्यास ते घरीही नेऊ शकता. या प्रयोगाला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

झोपडपट्टीतील उकिरडा, वाहणारी गटारे, दूरवरून येणारा शिव्यांचा आवाज अशा वातावरणात वाचनसंस्कृती रुजवण्याचे आव्हान 'डब्ल्यूसीएफ'ने स्वीकारले आणि मुलांना, मोठ्यांना वाचनाची गोडी लागावी यासाठी प्रयत्न सुरू केले. कंपनीच्या सीएसआर फंडाच्या माध्यमातून वाचनसंस्कृतीचा प्रसार करण्याचे त्यांनी ठरवले. आज मुंबईतील मानखुर्द आणि परिसरात तीन तसेच नाशिक परिसरात तीन व्हॅन त्यांनी झोपडपट्टी परिसरात दिल्या आहेत. केवळ महाराष्ट्रातच नाही; तर चेन्नईमध्येही त्यांनी मोबाईल लायब्ररी दिल्या आहेत. या मोबाईल लायब्ररीमध्ये विविध विषयांवरील अडीच हजार पुस्तके आहेत. यातील पुस्तके घरीही नेता येतात; ती एक आठवड्याच्या परताव्यावर. अभ्यासाची पुस्तके विकत घ्यायलाच पैसे नसतात; तर पूरक पुस्तके कुठून घेणार? अशा स्थितीत ही व्हॅन मुलांसाठी

फायदेशीर ठरते. टीव्ही, कॉम्प्युटर आणि एका शिक्षिकेचीही व्यवस्था या व्हॅनमध्ये करण्यात आली आहे. जेणेकरून मुलांना मार्गदर्शनाबरोबरच कॉम्प्युटरद्वारे काही रिसर्च प्रोजेक्टमध्येही मदत होऊ शकेल. या पुस्तकांच्या आधारे त्यांच्या कविता स्पर्धा, वादविवाद स्पर्धा घेण्यात येतात; जेणेकरून 'पुस्तकांमधून वाचलेले ज्ञान मुलांमध्ये किती खोल रुजले आहे याची चाचपणीही केली जाते. दर महिन्याला साधारण हजाराहून अधिक मुले या मोबाईल लायब्ररीचा फायदा घेत आहेत.

## ✍ शत्रुघ्न सिन्हांच्या चरित्राचे प्रकाशन

'द क्लॅरिडगेझ' (The Claridges) आणि 'डेलीहंट' यांच्या सहकार्यानं 'ओम बुक्स इंटरनॅशनल' यांनी हिन्दी चित्रपट अभिनेता तसंच वादग्रस्त राजकारणी व्यक्ती म्हणून प्रसिद्ध असलेले 'शत्रुघ्न सिन्हा' यांचं भारती एस. प्रधान यांनी लिहिलेलं चरित्र 'एनिथींग बट खामोश' नुकतंच प्रकाशित झालं तेव्हा भाजपा तसंच काँग्रेसमधले बरेचसे वरिष्ठ राजकारणी उपस्थित होते. एल.के. अडवाणी, यशवन्त सिन्हा या राजकीय पुढाऱ्यांबरोबरच प्रसिद्ध अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा तसंच इतर कुटुंबीयही हजर होते. दीप प्रज्वलनानंतर ओम बुक्स इंटरनॅशनलच्या चिफ एडिटर दिपा चौधरी यांनी एल के अडवाणी, यशवन्त सिन्हा आणि शत्रुघ्न सिन्हा यांच्यात एक चर्चाही घडवून आणली. चर्चेचा शेवट सोनाक्षी सिन्हा आणि कुश सिन्हा यांच्या याच पुस्तकाच्या अभिवाचनानं करण्यात आला. शत्रुघ्न सिन्हा आणि त्यांचे कुटंबिय तसंच एल.के.अडवाणी, यशवंत सिन्हा, अजय मागो, संजय आणि ओमप्रकाश यांच्या उपस्थितीत पुस्तक प्रकाशन पार पडलं.


ओम बुक्स इंटरनॅशनलचे प्रकाशक अजय मागो म्हणाले, माझ्या डोळ्यासमोरचा शत्रुघ्न सिन्हा म्हणजे पोलीस वेशातला, पोलीस व्हॅनमध्ये फिरणारा. कधीकधी रस्त्यावर मारामाऱ्या करणारा, गोळी लागल्यानंतर सगळ्यांची सहानुभूती मिळविणारा, स्वतःच्याच मस्तीत राजासारखा वावरणारा असा असला तरीही मनात पक्की बसलेली गोष्ट म्हणजे आदर-अनादराची सरमिसळ असलेलं त्याचं सडपातळ असं काहीसं निराळं व्यक्तिमत्त्व! वैशिष्टयपूर्ण संवादफेक, ऐटदार तोरा, भेदक डोळे, चेहऱ्यावरची ओरखड्याची खूण, आणि पृथ्वीराज कपूरांच्या मैलाचा दगड ठरलेल्या मुगले-आझम चित्रपटातल्या खामोश या गर्जनेची स्वतःच्या भरदार आवाजात केलेली तितकीच प्रसिद्ध नक्कल हे विशेष! 'एनिथींग बट खामोश-द शत्रुघ्न सिन्हा' बॉयोग्राफी - भारती एस. प्रधानांचं हे पुस्तक म्हणजे समृद्ध पण चित्रविचित्र घटनांनी भरलेल्या आयुष्याचा एक लक्षवेधी पट असणार

आहे. सात वर्षांची या पुस्तकाची प्रतीक्षा कारणी लागेल असं वाटतं.

उत्तरादाखल केलेल्या भाषणात शत्रुघ्न सिन्हा म्हणाले, या पुस्तकाचा हा सात वर्षांचा टोकदार प्रवास जेव्हा सुरू झाला तेव्हा माझे अनेक मित्र तसंच लेखिका भारती एस.प्रधान यांच्यासकट आमचं सर्वांचं एकच उद्दिष्ट होतं. ते म्हणजे प्रामाणिकपणा. वस्तुनिष्ठता तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल असं हे पुस्तक असावं. माझ्या गडबड गोंधळाच्या आयुष्यावरून, काहीतरी मिळवण्याच्या हेतूनं झगडणाऱ्या तरुणांनी प्रेरणा घ्यावी असं वाटतं.

**- प्रज्ञा ओक**

❖





# पुरस्कार

## ✻ राजा परांजपे महोत्सव

'व्यंकटेश माडगूळकर, सुधीर फडके आणि राजा परांजपे या त्रयीने चित्रपट म्हणजे काय ते रसिकांच्या गळी उतरविले. सध्या नैसर्गिक अभिनय असा आरडाओरडा केला जातो. कृत्रिमता कोणालाही पाहवत नाही, पण चित्रपटामधील कृत्रिमता घालवण्याचे काम राजाभाऊंनी केले. आजच्या श्रीमंत मराठी चित्रपटाचा पाया खऱ्या अर्थाने त्यांनीच घातला आहे,' या शब्दांत ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांनी राजा परांजपे यांचे मोठेपण उलगडले.

प्रसिद्ध अभिनेते सचिन खेडेकर, दिग्दर्शक अभिजित पानसे, गायक स्वप्नील बांदोडकर आणि अभिनेत्री स्मिता तांबे यांना जोशी यांच्या हस्ते 'राजा परांजपे सन्मान पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले, प्रतिष्ठानचे प्रमुख अर्चना राणे व अजय राणे या प्रसंगी उपस्थित होते.

'माडगूळकर, फडके आणि परांजपे हे मराठी चित्रपट संस्कृतीमधील दत्तगुरू होत. तंत्रज्ञान हातात नसताना त्या काळी त्यांनी कसे चित्रपट केले असतील? लाइट्स, कॅमेरा कोणत्या दर्जाचे असतील? पण राजाभाऊंचे चित्रपट पाहण्यासाठी भानुविलासला गर्दी होत असे. त्यांचे चित्रपट पाहतच आम्ही मोठे झालो. जगातल्या दहा दर्दी अभिनेत्यांमध्ये त्यांचा समावेश होईल. या त्रयीने संस्कृती घडवली व सांस्कृतिक वातावरण निर्माण केले,' असे गौरवोद्गार जोशी यांनी काढले.

आज मराठी प्रेक्षक केवळ मराठीचा राहिला नसून तो हिंदी, इंग्रजी आणि दूरचित्रवाहिनीचाही झाला आहे. मराठीकडून प्रेक्षकांच्या ज्या अपेक्षा आहेत त्याला अनुसरून चित्रपट बनतो आहे. चित्रपटांचे प्रश्न आणि कलादृष्टी बदलली आहे; पण मनोरंजन आणि प्रबोधन व्हावे हा आशावाद टिकून आहे, अशी भावना खेडेकर यांनी व्यक्त केली. पूर्वार्धात प्रसिद्ध नृत्य कलाकार शर्वरी जमेनीस हिने नृत्यातून रसिकांच्या मनाचा ठाव घेतला. उत्तरार्धात प्रवीण तरडे यांनी पाच

कलावंतांची मुलाखत घेतली.

### ❋ 'युनिक ॲकॅडमी'तर्फे सत्कार सोहळा

''एकदा सरकारी नोकरी लागली म्हणजे झालं, त्यानंतर फक्त 'पाट्याच टाकायच्या' असे नाही. नोकरी लागल्यानंतरही अवांतर वाचन आणि नवनवे अनुभव घेत आपले क्षितिज विस्तारत राहिले पाहिजे. पैसा, हुद्दा आणि ओळखीने 'वरच्या'ची कामे होतातच; पण चांगला अधिकारी तोच, जो वंचितांनासुद्धा वेळीच न्याय मिळवून देतो,'' अशा शब्दांत पुणे परिमंडळ एकचे पोलिस उपायुक्त तुषार दोशी यांनी 'द युनिक ॲकॅडमी' तर्फे आयोजित राज्यसेवा परीक्षा (एमपीएससी) आणि आयबीपीएस परीक्षेतील यशस्वी उमेदवारांच्या सत्कार प्रसंगी व्यक्त केले. यवतमाळ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, ॲकॅडमीचे संचालक तुकाराम जाधव उपस्थित होते. 'महाराष्ट्र वार्षिकी २०१६' या पुस्तकाचे प्रकाशनही झाले. दोशी म्हणाले, ''कायद्यात कोणतेही बदल आपोआप होत नाहीत. त्यासाठी समाजमनात होणारा बदल प्रशासकांनी टिपला पाहिजे.'' कलशेट्टी म्हणाले, ''आपल्या प्रत्येकाचीच पार्श्वभूमी वेगवेगळी असते आणि तिचा कार्यक्षमता विकासासाठी फायदा होऊ शकतो.''

एमपीएससी परीक्षेत प्रथम आलेले अतुल कानडे म्हणाले, ''झोपेत पाहिलेली स्वप्नं झोपेतच विरून जातात. जागेपणीची स्वप्नं प्रत्यक्षात उतरतात. आज तेच झालंय. गेली दोन वर्षं जे स्वप्न माझ्या उराशी होतं, त्याची आज पूर्ती झाली आहे. एमपीएससीत यशस्वी झालेले अनेक जण पंचविशीच्या आतील आहेत, त्यामुळे आता या परीक्षेत 'यंग ब्रिगेड' निर्माण झाली आहे, असं मी म्हणेन. तुम्हीही हा अवघड गड योग्य नियोजन केल्यास सहज चढू शकाल.''

### ❋ 'जनहितार्थ आयुर्वेद' पुस्तकाचे प्रकाशन

आयुर्वेदिक महाविद्यालयांमधून उत्तीर्ण झालेले ९० टक्के डॉक्टर्स ॲलोपॅथीची प्रॅक्टिस करतात. या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्राला 'चीप लेबर' मिळत आहे. ही परिस्थिती बदलण्याची गरज आहे.'' अशी अपेक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आरोग्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. भूषण पटवर्धन यांनी येथे व्यक्त केली.

डॉ. सदाशिव वेल्टे लिखित 'जनहितार्थ आयुर्वेद' पुस्तकाचे प्रकाशन नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर

यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी राज्याच्या आयुर्वेद विभागाचे माजी संचालक डॉ. भा. वि. साठ्ये, 'आयुष इन पब्लिक हेल्थ'चे मानद संचालक प्रा. रा. के. मुटाटकर उपस्थित होते. आयुष इन पब्लिक हेल्थ आणि महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेतर्फे याचे आयोजन केले होते. डॉ. पटवर्धन म्हणाले, ''आधुनिक काळात आयुर्वेद मंत्रालयात टिकून नसले तरीही घराघरात टिकून आहे. बाराशे वर्षांपासून आयुर्वेदाला बंदिस्त केले आहे. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातही तो बंदिस्तच आहे. बहुतांश देशांचे आरोग्य धोरण हे औषध कंपन्याच ठरवितात. त्याचे बाजारीकरण झाले आहे. प्रतिजैविके ही उपयुक्त आहेत; पण ती केव्हा अणि किती वापरायची याचे भान ठेवले पाहिजे. स्वास्थ्य हे आपल्या हातात आहे. ते डॉक्टरांच्या हाती देऊ नये, याचा विसर समाजाला पडला आहे. त्यामुळेच आयुर्वेद महाविद्यालयांमधील बहुतांश मुले ॲलोपॅथीची प्रॅक्टिस करतात.''

डॉ. विद्यासागर म्हणाले, ''माणूस आजारीच पडू नये, अशी व्यवस्था आयुर्वेदाला अभिप्रेत आहे. हीच आयुर्वेदाची खरी ताकद आहे; पण आता ॲलोपॅथीच्या स्पर्धेत आयुर्वेद आपली क्षमता विसरत आहे.''

## * कार्यगौरव पुरस्काराचे वितरण

''देशात सध्या नोकराला मालक आणि मालकाला नोकर बनविण्याचे काम सुरू आहे. मालकावर टीका करणाऱ्यास देशद्रोही ठरविण्यात येत आहे. अशाश्वत व्यवस्थेकडे आपली वाटचाल सुरू आहे,'' असे मत भारिप बहुजन महासंघाचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केले.

जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संयुक्त जयंती समारंभप्रसंगी संपादक उत्तम कांबळे, खासदार अमर साबळे, टेली कम्युनिकेशनचे निवृत्त उपमहानिर्देशक एल. आर. मीना, कॅप्टन जी. डी. कांबळे, ब्रह्म प्रकाश, हवामान विभागाचे उपमहानिर्देशक आर. आर. माळी, कार्याध्यक्ष डॉ. कृष्णमूर्ती पडगलवार उपस्थित होते.

ज्येष्ठ आंबडेकर विचारवंत सी. पी. थोरात, सुनील माळी, दिल्ली विद्यापीठातील प्रा. डॉ. कौशल पनवर यांना या वेळी कार्यगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच विभागातर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेतील ४० विजेत्यांना पारितोषिक देण्यात आले.

कांबळे म्हणाले, ''देशाला आर्थिक आणि सामाजिक लोकशाहीची सर्वाधिक गरज आहे. जागतिकीकरणात गल्लीपासून दिल्लीपर्यंत कंत्राटीकरण सुरू असून,

**५वी आवृत्ती**




'मॅन्स सर्च फॉर मीनिंग'
या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद

# अर्थाच्या शोधात

**मूळ लेखक** - व्हिक्टर फ्रॅन्कल

**अनुवाद** - डॉ. विजया बापट

**किंमत : १५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

दररोज, दर तासाला, दर मिनिटाला
स्वतःच्या वागण्यासंबंधी निर्णय घेण्याची
संधी समोर येत असते. तुमच्या अस्मितेचा
नाश करणाऱ्या, तुमचे मनोबल हिरावून
घेऊ पाहणाऱ्या शक्तींना शरण जायचे
की नाही हे पदोपदी ठरवावे लागते.
तुम्ही केवळ नियतीच्या हातातील खेळणे
बनता की नाही, हे तुमच्या निर्णयांवर
अवलंबून असते.
आपले मानसिक स्वातंत्र्य घालवून,
आत्मसन्मान गमावून, मेंढरांसारखे मनानेही
कैदी होता की नाही हे ठरविण्याचे
तुमचे स्वातंत्र्य अबाधित असते...

उद्या सरकारचेच कंत्राटीकरण झाल्यास आश्चर्य वाटायला नको. बाबासाहेबांनी राज्यघटना देव, प्रेषिताला नव्हे तर फाटक्या माणसाला अर्पण केली. आपण ती वाचायची विसरून जातो. राज्यघटनेचे सार्वत्रीकरण संघटन प्रबळ करून आपल्यासह वंचितांसाठी मागण्या केल्या पाहिजेत.''

'भारत वर्षानुवर्षे सटवाईने लिहिलेल्या भविष्यावर चालत होता. भीमाचा जन्म म्हणजे सटवाईचा आणि मनुस्मृतीचा मृत्यू आहे. एक नवा समाज, नवा माणूस बाबासाहेबांमुळे पाहायला मिळाला. त्यामुळे कोट्यवधी कुळांचा उद्धार झाला आहे,' असेही उत्तम कांबळे यांनी सांगितले.

साबळे म्हणाले, ''आरक्षणाचा प्रश्न लवकर सुटणार आहे. पदोन्नतीमध्ये आरक्षण असावे यासंबंधी राज्यसभेत चर्चा झाली, लोकसभेत चर्चा झाली. याला लोकसभेच्या पाठिंब्याची गरज असून, तोही मिळण्याची अपेक्षा आहे.''

'कोणतीही व्यवस्था आपोआप बनत नाही. बनली तरी ती टिकविण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. आता निर्णय घेण्याची वेळ आली आहे. विचारधारा वेगवेगळ्या असल्या तरी राज्य घटनेद्वारा आपण एकत्र राहण्याचा करार केला आहे. राज्य व्यवस्थेत धर्म वेगळा असला पाहिजे; मात्र सध्या धर्म जोडण्याचा प्रयत्न सुरू आहे,' असे ॲड. प्रकाश आंबेडकर, अध्यक्ष भारिप बहुजन महासंघ यांनी म्हटले.

## * भाषेतील भाव समजून घ्या : शाहीर वैराळकर

''भाषा हे संवादाचे माध्यम आहे. प्रत्येक व्यक्तीला हव्या त्या भाषेत व्यक्त होण्याचा अधिकार आहे. त्याची पायमल्ली केल्यास ती व्यक्ती आत्महत्या करण्यास प्रवृत्त होते. त्यामुळे भाषेचे राजकारण न करता त्यातील भाव समजून घेतला पाहिजे,'' असे मत शाहीर सुनील वैराळकर यांनी व्यक्त केले.

हिंदी, मराठी व उर्दू साहित्य विश्वात मोलाचे योगदान देणाऱ्या कवी व साहित्यिकांना 'सोनइन्दर प्रतिष्ठान' सन्मान देऊन गौरवण्यात आले. गझलकार रमण रणदिवे यांना 'काहूर'साठी गझलकार हस्तिमल हस्ती यांना 'ना बादल ना दरिया जाने' गझलसंग्रहासाठी, तर उद्धव महाजन यांना 'गझल के साथ' उर्दू गझलसंग्रहासाठी गौरविण्यात आले. साहित्यिक सुनील देवधर यांना 'साहित्य महासागर' व शाहीर सुरेशकुमार वैराळकर यांना 'काव्यकलश' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी साहित्यिक डॉ. दामोदर खडसे, समाजसेविका कविता गुप्ता, उल्हास पवार आणि दिग्दर्शक नागराज मंजुळे उपस्थित होते. 'सोनइन्दर काव्यसंध्या' या मैफलीत पुरस्कारप्राप्त कवी व गझलकारांनी सुरेख

रचना सादर केल्या.

## ❋ दीनानाथ मंगेशकर पुरस्कार

मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त पुरस्कार देण्यात येतात.

पंडित अजय चक्रवर्ती (प्रदीर्घ संगीतसेवा), बुजुर्ग अभिनेते जितेंद्र (सिने क्षेत्रातील प्रदीर्घ सेवा), ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक अरुण साधू (साहित्य क्षेत्रातील प्रदीर्घ सेवा), ज्येष्ठ पत्रकार दिलीप पाडगावकर (प्रदीर्घ पत्रकारिता), सिने दिग्दर्शक संजय लीला भन्साळी (उत्कृष्ट दिग्दर्शक), अभिनेता प्रशांत दामले (मराठी रंगभूमी व सिनेक्षेत्रातील सेवा) व रणवीर सिंग (सिनेक्षेत्रातील सेवा) हे यंदाच्या पुरस्काराचे मानकरी आहेत. त्याशिवाय सामाजिक क्षेत्रातील भरीव कार्याबद्दल गोपाळ शिक्षण संस्था, परतवाडा आणि उत्कृष्ट नाट्यनिर्मितीबद्दल ‘दोन स्पेशल’ (मिश्री थिएटर्स व अथर्व थिएटर्स) या नाटकालाही यंदा सन्मानित केले गेले.

२३ एप्रिलच्या संध्याकाळी कविता कृष्णमूर्ती, अंकित तिवारी, हिमेश रेशमिया, बेला शेंडे, मोहित चौहान, तुलसी कुमार, फाल्गुनी पाठक यांनी आपली कला सादर केली. २४ एप्रिल रोजी पुरस्कार वितरणानंतर पंडित हरिहरन, रशिद खान, कौशिकी चक्रवर्ती, राकेश चौरासिया, पंडित विजय घाटे यांचा सहभाग असलेला उपशास्त्रीय संगीत कार्यक्रमही झाला.

## ❋ शशिकांत पित्रे यांना शं. ना. जोशी पुरस्कार

मराठी साहित्यात संरक्षणविषयक, सैन्यविषयक लिखाणाची वानवा आढळते. या वाटेने जाणारे लेखक आणि प्रकाशक अत्यंत मोजके आहेत. संरक्षणविषयक साहित्याकडे होणारे दुर्लक्ष ही दुर्दैवी बाब आहे. या साहित्यातील चोखंदळ वाचकांचे वाढते स्वारस्य लक्षात घेऊन अखिल भारतीय साहित्य महामंडळाने आगामी साहित्य संमेलनात संरक्षणविषयक परिसंवाद, तसेच इतर उपक्रम समाविष्ट करावेत, अशी अपेक्षा युद्धविषयक अभ्यासक निवृत्त मेजर जनरल शशिकांत पित्रे यांनी व्यक्त केली.

शशिकांत पित्रे यांच्या ‘न सांगण्याजोगी गोष्ट : १९६२च्या पराभवाची शोकांतिका’ या ग्रंथास इतिहास संशोधक शं.ना. जोशी स्मृती पुरस्काराने गौरवण्यात आले.

ते म्हणाले, ‘‘भारतीय सैन्याने आजवर अनेक पराक्रम गाजवत यश मिळवले. १८६२चे भारत-चीन युद्ध मात्र त्यास अपवाद ठरले. या युद्धात सैन्याचा

निर्णायक, दारुण पराभव झाला. भारत-चीन सीमावाद हे युद्धाचे मूळ कारण होते. १९६० मध्ये मॅकमिलन रेषा आणि अक्साई चीनबाबतचा प्रस्ताव भारताने मान्य केला असता, तर युद्ध टाळता आले असते. राज्यकर्त्यांच्या तर्कनिष्ठतेचे अधःपतन आणि रणनीतीचा अभाव याची परिणती पराभवात झाली. मात्र याच वेळी प्राणांची बाजी लावून लढलेल्या सैनिकांच्या देशप्रेमाच्या गाथांकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. युद्धाबाबतची विश्लेषणात्मक समीक्षा वाचकांसमोर यावी, संरक्षणविषयक इतिहास जाणून घेता यावा, यासाठी जास्तीत जास्त लेखन होणे आवश्यक आहे.''

श्री. मा. भावे म्हणाले, ''इतिहास हा पाऱ्यासारखा असतो. पारा चिमटीत पकडता येत नाही. नाना तऱ्हांच्या कथा, गाथा इतिहासात गुंतलेल्या असतात. १९६२ मधील भारत-चीन युद्धाबाबतही नानाविध निष्कर्ष ऐकायला मिळतात.

मात्र युद्धापूर्वीच्या वाटाघाटींना नकार, तयारीविना केलेली लढाई, भारतीय सैन्याचा पराभव याबाबत कागदोपत्री कोणतेही पत्रव्यवहार उपलब्ध नाहीत. नेव्हील मॅक्सवेलने संकेतस्थळावर सादर केलेल्या अहवालावरही अधिकृत शिक्कामोर्तब करण्यात आलेले नाही. १९६०च्या प्रस्तावाला भारताने विरोध केला, ही बाब सर्वश्रुत आहे; मात्र नेहरू एवढा चुकीचा निर्णय घेतील असे वाटत नाही. त्या काळ्या अधिकाऱ्यांच्या लेखनाचा उपलब्ध साहित्याचा अभ्यास करून शशिकांत पित्रे यांनी मांडलेले वास्तव कौतुकास्पद आहे.

## ❋ वास्तुरत्न पुरस्कार प्रदान

आर्किटेक्चर ही महाविद्यालयांमध्ये शिकता येणारी कला नाही. ती शिकण्यासाठी डोळे उघडे ठेवून आजूबाजूला घडणाऱ्या घटना लक्षात ठेवून ती कॅनव्हासवर बिनचूक चितारता आली पाहिजे. त्यामुळे घडणाऱ्या गोष्टींचे वास्तव चित्रण करता आले पाहिजे, असे मत ज्येष्ठ वास्तुविशारद हफीझ कॉन्ट्रक्टर यांनी व्यक्त केले. वाढती लोकसंख्या सामावून घेण्यासाठी जास्तीत जास्त घरांची आवश्यकता आहे. त्यामुळे एफएसआय वाढवण्याचा पर्याय स्वीकारावा लागेल. तसेच बांधकाम परवाना देण्याची प्रक्रिया सुलभ करावी लागेल, असेही ते म्हणाले.

पद्मभूषण पुरस्काराने गौरव झाल्याबद्दल ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे यांच्या हस्ते हफीझ कॉन्ट्रॅक्टर यांना वास्तुरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डिझाईन क्षेत्रातील प्रकल्पांच्या माध्यमातून देशातील पायाभूत सुविधांना चालना देणारे हफीझ कॉन्ट्रॅक्टर यांच्याशी प्रिया गोखले आणि सलिल सावरकर यांनी संवाद साधला. वाईड अँगल फोरम, पुणे आणि रवी परांजपे स्टुडिओ यांनी हा योग

जुळवून आणला होता. परांजपे यांनी कॉन्ट्रॅक्टर यांच्यासाठी केलेल्या वास्तुचित्रांचे खास प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. परांजपे यांच्या निवासस्थानी साकारलेल्या रवी परांजपे स्टुडिओ येथे  १७ एप्रिल ते १ मे पर्यंत हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले होते. मोठ्या इमारती करण्याची सर्वाधिक क्षमता सरकारची असते. मात्र सरकार वास्तुविशारदाची निवड करते. मंत्री परदेशातील वास्तुविशारदावर अधिक विश्वास ठेवतात. मग देशातील व्यावसायिक कमी रकमेची निविदा भरतात. मग त्या इमारतींचा दर्जा तो काय असणार, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

## ❋ भालचंद्र नेमाडे यांना 'फर्ग्युसन गौरव पुरस्कार'

'भारतामुळे इंग्रजीला किंमत असून, या भाषेला बाहेर कोणी विचारत नाही. आपल्याकडे इंग्रजीचे फॅड आले आहे. इंग्रजी जागतिक भाषा नाही हे ठासून सांगण्याची आज गरज आहे. त्यासाठी 'इंग्रजी हटाव' सेना निर्माण झाल्याशिवाय पर्याय नसून बाकीच्या सेनांना काही अर्थ नाही,' अशा शब्दांत 'कोसला'कार भालचंद्र नेमाडे यांनी शिवसेना व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेवर नामोल्लेख टाळून निशाणा साधला.

'द फर्ग्युसोनियन्स' या फर्ग्युसन कॉलेजच्या माजी विद्यार्थी संघटनेतर्फे नेमाडे यांना केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांच्या हस्ते 'फर्ग्युसन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. ही संधी साधून नेमाडे यांनी मराठीच्या मुद्द्याला हात घालत शिवसेना व मनसेवर टीकास्त्र सोडले. या वेळी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. विजय केळकर, ज्येष्ठ दिग्दर्शिका सुमित्रा भावे, पोलिस महासंचालक प्रवीण दीक्षित, जागतिक जलतरणपटू रोहन मोरे व क्रिकेटपटू अमोल कचे यांना 'फर्ग्युसन अभिमान' पुरस्काराने गौरविण्यात अले. विधानपरिषदेचे सभापती रामराजे निंबाळकर, आमदार राहुल नार्वेकर, संघटनेचे अध्यक्ष यशवंत मेहेंदळे, ॲड. विजय सावंत, किरण शाळिग्राम या वेळी उपस्थित होते.

'प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून देणे आवश्यक असताना आपल्याकडे इंग्रजीचे फॅड आले आहे. त्यामुळे आपली एकूण समज कमी झाली आहे. सर्व जण इंग्रजीमध्ये बोलत असल्याने ते चांगले ठरत आहे. पण अशाने मराठीचा लौकिक कमी झाला आहे,' अशा शब्दांत नेमाडे यांनी मराठीच्या आग्रहाचा पुनरुच्चार केला. 'फर्ग्युसनच्या वसतिगृहामुळे 'कोसला' आकार घेऊ शकली. या महाविद्यालयात आलो नसतो, तर मोठा झालो नसतो,' अशी भावना नेमाडे यांनी व्यक्त केली.

'शालेय शिक्षण मातृभाषेत असायला हवे. मी मराठीत शिकलो, त्यामुळे

विविध देशांत भाषण देण्याचा आत्मविश्वास मला मिळाला. व्यक्तीमधील पूर्ण क्षमतांना वाव फक्त मातृभाषेच्या शिक्षणातून मिळतो. त्यामुळे शिक्षणाची त्याप्रमाणे रचना करायला हवी,' असे सांगत रेल्वेमंत्री प्रभू यांनी नेमाडे यांचा मुद्दा पुढे रेटला. सूत्रसंचालन स्वप्ना नायर यांनी केले.

"देशात जे गोंधळाचे वातावरण आहे ते आमचीच मालकी, आमचाच इतिहास आणि आमचेच पुढारी या भूमिकांमुळे निर्माण झाले आहे. पूर्वी नेत्यांची जातीप्रमाणे वाटणी नव्हती. मराठी संस्कृतीला दर्जा होता. ती शिस्त आता नाही. स्वातंत्र्य-ममता-बंधुभाव हे शब्द केवळ घरात पेंटिंग म्हणून लावण्यासाठी उरले असून, प्रत्यक्षात स्वातंत्र्य, समता वगैरे नाही. स्वातंत्र्य, समता नसले तरी बंधुभाव टिकवण्यास सांगितले जाते," अशा शब्दांत भालचंद्र नेमाडे यांनी देशातील परिस्थितीची खिल्ली उडवली.

## * सयाजीरावांचे मोठे योगदान

इतिहासात सयाजीराव गायकवाड यांचे काम मोठे होते. अनेक पुस्तकांचा अनुवाद त्यांनी करवून घेतला. चि. वि. जोशी यांच्याकडून जातक कथा मराठीत आणल्या १५० हून अधिक पुस्तके त्यांच्यामुळे मराठी माणसाला मिळाली. त्याचे अनेक राजकीय निर्णय दीर्घ काळ सुधारणा करणारे होते, असेही त्यांनी या वेळी सांगितले. अनेक विषयांवर शेरेबाजी करीत इतिहासाचे नीट व नव्याने लिखाण करण्यासाठी आवश्यकता असल्याचेही नेमाडे यांनी या वेळी सांगितले.

साकेत वर्ल्ड बुक आणि बाबा भांड यांच्या 'स्वातंत्र्ययुद्धाचे पाठीराखे सयाजीराव गायकवाड या पुस्तकाचे प्रकाशन झाले. व्यासपीठावर संजय भास्कर जोशी यांची उपस्थिती होती. मराठी संस्कृती संकुचित झाल्याचे सांगत इतिहासाकडे दुर्लक्ष का होते याचे विवेचन करताना नेमाडे म्हणाले की, नको इतके वर्तमानपत्रावरील आणि बातम्यांवरील प्रेम त्यास कारणीभूत आहे. बातम्या ऐकत बसणे हा एक प्रकारचा मनोविकार आहे. अर्ध्या तासात १०० किंवा ४० गावांच्या बातम्या; यातून काय मिळणार?'

तत्पूर्वी इतिहास लिखाणात सयाजीराव गायकवाड याच्याकडे दुर्लक्ष कसे झाले हे सांगण्यासाठी नेमाडे यांनी भाष्य केले. तमिळनाडूमध्ये मराठी संस्कृती जपणारे आहेत. उडियाचे व्याकरण मराठी माणसाने लिहिले आहे. मस्तानीच्या वंशजांना यवन ठरवून त्यांचे मराठीपण नाकारले. गुजरातमध्ये खूप मराठी माणसांनी चांगले काम केले. आपल्याकडे इतिहास लिहिणारे- मुख्यमंत्री कोण, ते

कसे हरले असलाच इतिहास मांडतात. बातम्यांच्या सर्कशीत पडद्याआडचे पायाखालचे, व्यामिश्र असे काही बाहेर येत नाही,' असे ते म्हणाले.

बाबा भांड यांच्या ग्रंथ गैरव्यवहाराच्या बातमीवर प्रतिक्रिया व्यक्त करीत नेमाडे यांनी थेट तळवलकर, टिकेकर आणि भालेराव यांच्या पत्रकारितेवर प्रश्नचिन्ह उभे करण्याचा प्रयत्न केला. एका बहुखपाच्या दैनिकात भांड यांची बातमी आल्यानंतर अनेकांनी प्रतिक्रिया विचारल्या. हे खरे आहे काय, असे विचारल्यावर त्यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मुलाला गांजाचरसचे व्यसन होते. त्याच्यावर अमेरिकेत इलाज करण्यात आला. तेव्हा त्याचा खर्च विश्वकोश निधीतून झाला होता. याबाबत हातकणंगलेकरांना विचारले होते. तेव्हा त्यांनी तो लिथोग्राफी म्हणजे नकाशासंबंधीचा अभ्यास करण्यास गेल्याचे सांगितले होते; मात्र याबाबतची बातमी कधी थोर स्वतंत्रतावादी पत्रकारांनी छापली नाही.

## * मधू कांबळे यांना 'वरुणराज भिडे पुरस्कार'

पत्रकार वरुणराज भिडे मित्र मंडळाचा वरुणराज भिडे पुरस्कार 'लोकसत्ता'चे सहसंपादक मधू कांबळे (मुंबई) यांना, तर आश्वासक पत्रकारिता पुरस्कार 'सकाळ'चे खास प्रतिनिधी गजेंद्र बडे (पुणे), 'दिव्य मराठी'चे श्रीनिवास दासरी (सोलापूर), 'महाराष्ट्र वन'च्या प्राची कुलकर्णी (पुणे) यांना माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते देण्यात आला.

ज्येष्ठ पत्रकार वरुणराज भिडे यांच्या स्मृतीनिमित्त एस. एम. जोशी सभागृहात हा पुरस्कार समारंभ झाला. या वेळी राजकीय अभ्यासक सुहास पळशीकर उपस्थित होते. पुरस्कार निवड समितीत ज्येष्ठ पत्रकार एस. के. कुलकर्णी, सदा डुंबरे, अरुण खोरे, जयराम देसाई यांचा समावेश होता.

## * ॲड. गवळी यांना 'डॉ. आंबेडकर राष्ट्रीय ॲवॉर्ड'

ज्येष्ठ साहित्यिक ॲड. आनंद गवळी यांना दिल्ली येथील भारतीय दलित साहित्य अकादमीतर्फे 'डॉ. आंबेडकर राष्ट्रीय ॲवॉर्ड-२०१६' हा पुरस्कार जाहीर झाला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त या पुरस्काराची घोषणा अकादमीचे अध्यक्ष डॉ. सोहनपाल सुमनाक्षर यांनी केली. दलित साहित्यातील योगदानाबद्दल गवळी यांना या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. ते विश्रांतवाडी येथील रहिवासी असून, त्यांची विविध पुस्तके प्रकाशित झाली आहेत. मंगड्याचं पाणी (आत्मकथन), माया लावा (कादंबरी), जीवकुसावरती (कादंबरी),

प्रेमाग्नी (कथासंग्रह), 'चर्मकारम् शरणम् गच्छामि' आणि 'मनचंगा संत रोहिदास' (कादंबरी) या पुस्तकांचा यामध्ये समावेश आहे. पुरस्काराचे वितरण दिल्ली येथे होणार आहे.

### * शाहू मोडक स्मृती पुरस्कार

मराठी चित्रपटातील प्रसिद्ध कलावंत शाहू मोडक यांनी चित्रपट कारकीर्द गाजवत प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले. कला क्षेत्रातील कारकिर्दीबद्दल त्यांना अवघ्या जीवनात शासनाचा एकही पुरस्कार मिळाला नाही. पुरस्कार हे उमेदीच्या काळातील प्रोत्साहन आणि नव्या कामासाठी उमेद देणारे माध्यम असते; त्यामुळे त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १९९४ पासून उमद्या कलाकारांना पुरस्कार सुरू करण्याची संकल्पना सुचल्याचे शाहू मोडक स्मृती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा प्रतिभा शाहू मोडक यांनी सांगितले. प्रतिष्ठानच्या वतीने बालकलाकार पार्थ भालेराव, बालगायिका शरयू दाते यांच्यासह अथर्व मारणे आणि पंडित सुधीर दाते यांना शाहू मोडक स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे यंदा २२ वे वर्ष आहे. प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध अभिनेता सचिन खेडेकर, तर अध्यक्षस्थानी चिंचवडच्या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील उपस्थित होते.

त्या म्हणाल्या, ''शाहू मोडक यांच्या चित्रपटाची कारकीर्द ही वयाच्या बाराव्या वर्षी म्हणजे १९३२ मध्ये 'श्यामसुंदर' या चित्रपटाने झाली. त्या वेळी पार्श्वगायक ही संकल्पना अस्तित्वात नव्हती; त्यामुळे गाता येत असेल तरच चित्रपटात संधी मिळायची. आजकाल गायनाला मोठे वलय प्राप्त झाले आहे; त्यामुळे मोडक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बालकलाकार तसेच बालगायकांना गौरवले जाते.'' शाहू मोडक यांना अध्यात्म आणि ज्योतिषाची आवड होती तसेच अपंग व्यक्तींविषयीही कळवळा होता; त्यामुळेच एका वर्षी अध्यात्म आणि एका वर्षी ज्योतिष क्षेत्रातील जाणकारांचा प्रतिष्ठानतर्फे सन्मान केला जातो.

अपंगत्वावर मात करीत पोहण्याच्या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय पुरस्कार पटकावणारा अथर्व मारणे, तर अध्यापन आणि ज्योतिष विषयांमध्ये सखोल ज्ञान असलेल्या पंडित सुधीर दाते यांनाही पुरस्कार दिला जात आहे. त्याचप्रमाणे कलाक्षेत्रातील एखाद्या गरजू व्यक्तीला १५००० रुपयांची वैद्यकीय मदत दिली जाणार असल्याचे प्रतिमा मोडक यांनी सांगितले.

२०१८ हे शाहू मोडक यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्या वेळीच प्रतिभा मोडक यांचा ८० वा वाढदिवस, पुरस्कार सोहळ्याचे २५ वे वर्ष असा दुग्ध-शर्करायोग जुळून आला आहे. हे औचित्य साधून शाहू मोडक स्मृति प्रतिष्ठानच्या

वतीने आगळावेगळा उपक्रम राबवण्याचा प्रतिभा मोडक यांचा मानस आहे.


❖

**५वी आवृत्ती**




## डी. एस. इटोकर

**किंमत : ८०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**




'खेळ खेळणे' हा लहान मुलांचा स्थायीभाव आहे.
अगदी रांगायला लागल्यापासून मुलांना
खेळण्यांचे आकर्षण असते.
आणि ही खेळणी त्यांना
स्वत:लाच करायला सांगितली तर?
त्यांना किती आनंद होईल याची कल्पना करू शकाल?
'मी हे करू शकतो; मी हे केले'
या अभिजात कृतीला योग्य वाव देण्याचा प्रयत्न
या पुस्तकातून केला आहे.
हा प्रयत्न किती सफल झाला,
हे वाचकांनीच ठरवायचे आहे.



# पुस्तक परिचय

*‘अ गोल्डन एज’ या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद*

# तेच दिन सोनेरी...



तहमिमा अनम यांचा जन्म बांगलादेशातील ढाका या शहरामध्ये १९७५ मध्ये झाला. त्यांनी हार्वर्ड विद्यापीठामध्ये सामाजिक मानववंशशास्त्र या विषयामध्ये डॉक्टरेट मिळवली आहे. त्या लंडनमध्ये राहतात. ‘अ गोल्डन एज’ ही त्यांची पहिली कादंबरी आहे.




लेखक
**तहमिमा अनम**

अनुवाद
**भारती पांडे**

*'द कॉस्टा फर्स्ट नॉव्हेल अवॉर्ड' आणि 'द गार्डियन फर्स्ट बुक अवॉर्ड' यांच्या यादीमध्ये स्थान मिळवलेली कादंबरी.*

*१९७१च्या वसंत ऋतूमध्ये रेहाना हक आपल्या दोन मुलांना एक मेजवानी देत आहे. तिला हे माहीत नाही की, आजच्या दिवसानंतर त्यांची सर्वांची आयुष्यं कायमची आणि पार बदलून जाणार आहेत, कारण हा पूर्व पाकिस्तान आहे... युद्धाला तयार झालेला.*

*आपल्या मुलांना सुरक्षित ठेवण्याच्या धडपडीत रेहानाला एका काळीज पिळवटून टाकणाऱ्या समस्येला सामोरं जावं लागणार आहे. बांगलादेशाच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या पार्श्वभूमीवर आधारलेली 'अ गोल्डन एज' ही कादंबरी क्रांती, आशा आणि अनपेक्षित शौर्य यांची कथा सांगते आणि तीही प्रेमाच्या लांबलचक मार्गावरून*

# लाहोरच्या लष्करी राजवटीतील भीषण जीवनाची झलक

***मार्च, १९५९***
*माझ्या पतीस,*
*आज मी आपली मुलं गमावली.*

*न्यायालयाच्या बाहेर रेहानानं 'खान ब्रदर्स स्टोअर्स अँड कन्फेक्शनर्स' मधून दोन पतंग विकत घेतले- एक लाल आणि एक निळा. दुकानातल्या माणसानं ते पतंग खाकी कागदात गुंडाळून सुतळीने बांधले. रेहानानं ते पुडकं काखोटीला मारलं आणि एक रिक्षा थांबवली. रिक्षात बसत असतानाच तिचा वकील तिच्याकडे धावत येताना तिला दिसला.*

*''मिसेस हक मला माफ करा,'' आवाजावरून तरी तो सच्चा वाटत होता.*

*काही झालं तरी रेहानाला यावर 'ठिक आहे' असं म्हणणं शक्य नव्हतं.*

*''तुम्हाला थोड्या पैशांची सोय करायला हवी. तेवढा एकच मार्ग आहे. पैशाची व्यवस्था करा, मग आपण पुन्हा एकदा प्रयत्न करू. हे हरामी लोक हात ओले केल्याशिवाय हलतच नाहीत.''*

*पैसे? रेहाना रिक्षात बसली आणि तिनं रिक्षाचं छत डोक्यावर ओढून घेतलं. 'धनमाँडी' तिच्या स्वरात बारीकसा कंप होता. 'रोड नंबर ५'*

*घरी पोहोचली तेव्हा मुलं सोफ्यावर शेजारी शेजारी गुडघे जुळवून घेऊन बसली होती. मायाचे पाय जमिनीपासून वर तरंगत होते. सोहैल स्वतःच्या तळहातांकडे बघत त्यावरच्या बारीक रेषा मोजत होता. रेहानाकडे पाहून तो हसला, पण जागेवरून उठला नाही किंवा मायासारखी त्याने हाकही मारली नाही. माया म्हणत होती, ''अम्मू, तुला इतका उशीर का झाला?''*

*मुलांसमोर रडणं योग्य होणार नाही असं रेहानानं आधीच ठरवलं होतं आणि सगळं रडणं रिक्षातच उरकून घेतलं होतं... मोठी किंकाळी फोडताना होतो तसा तोंडाचा मोठा 'ओ' करून हुंदके देत रिक्षाच्या सीटच्या अरूंद कडांना घट्ट धरून ठवत तिनं रडून घेलं होतं. खरोखरच तिची काळजी वाटत असल्यासारखं रिक्षावाल्यानं मागे वळून तिला 'पाणीबिणी काही पिण्यासाठी*

कुठे थांबायचंय का' असं विचारलं होतं. आजवर रेहानानं कधीच रस्त्याकडेचं पाणी चाखलं नव्हतं. तिनं मानेनेच नकार दिला होता. 'याला मुलं असतील का?' असा विचारही तिच्या मनात आला. या विचाराने थकून जाऊन तिनं रिक्षाच्या छताच्या कडेला डोकं टेकवलं आणि रस्त्याच्या खड्ड्यांच्या तालावर डोकं आपटत उरलेला प्रवास केला. आता ती दोघं सामोरी आल्यानंतर तिनं स्वतःच्या घशात निर्माण झालेला एक चिमटा आणि तोंडात उमळून आलेली एक जळजळती चव दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. चुरचुरायला लागलेले डोळे आणि दाटून येणारा घसा हेही दडपलं आणि मुलांना हातातली त्रिकोणी पुडकी दिली.

''थँक्यू यू, अम्मू जान.'' हातातलं पुडकं फाडून उघडत माया म्हणाली. सोहैलनं मात्र आपलं पुडकं उघडलं नाही, ते स्वतःच्या मांडीवर ठेवत त्यावर हात फिरवत राहिला.

''तुम्ही फैझ काकांकडे राहणार आहात.'' ''रेहाना संयत स्वरात म्हणाली, ''लाहोरमध्ये.''

''लाहोर?'' माया उद्‌गारली.

''आय ॲम सो सॉरी.'' रेहाना आपल्या मुलाला म्हणाली.

''आम्ही परत केव्हा यायचं?''

लवकरच .. मी वचन देते, देवाची प्रार्थना करत राहा..., तिला म्हणावसं वाटलं. ''ते तुम्हाला घ्यायला गुरुवारी येणार आहेत.''

''मला नाही जायचं.''

रेहानानानं जीभ चावली. ''तुम्हाला जावंच लागणार आहे.'' ती म्हणाली. ''जा आणि शहाण्यासारखं वागा. तुला तुझा पतंग उडवता येईल बेटा, ...आणि तो दिसेल थेट इथे... लाहोरपासून इथपर्यंत. तो खास पतंग आहे. तुला चांगलं वागावं लागेल, चांगलं आणि शूर वीरासारखं.. शूर मुलांनाच चांगले वारे मिळतात आणि मग एक दिवस इतका जोराचा वारा सुटेल की तुम्ही त्या वाऱ्यावर स्वार होऊन इथे माझ्याजवळ उडत येऊ शकाल, खरं नाही वाटतेय तुम्हाला?.. बघाल मग.''

प्रिय पतीस,
आपली मुलं आता आपली मुलं नाही राहिली.
त्याला सांगायला सुरुवात तरी कशी करायची?
ती मुलांना घेऊन पुन्हा रिक्षात चढली. '

*'अझीमपूर कबरस्तान.'' तिनं रिक्षावाल्याला सांगितलं.*

*संध्याकाळी कबरींना नमस्कार करायला आलेले काही लोक कबरस्तानात होते. आपल्या प्रिय जनांच्या कबरींवरच्या ओल्या गवतावर ते गुलाबाच्या पाकळ्या उधळत होते. पुढच्याच रांगेत पांढरी टोपी घातलेला एक माणूस तळहातांमध्ये तोंड लपवून रडत होता. त्याच्या शेजारी एक वयस्कर स्त्री हातात बकुळीचा गजरा घेऊन बसली होती. रेहानानं आपल्या मुलांचे गुबगुबीत, गोंडस हात हातात घेतले.*

*''आपल्या बाबांचा निरोप घ्या.'' इक्बालच्या कबरीकडे हात करत ती म्हणाली.*

*सोहैलनं चेहऱ्यावर बोटं टेकवून म्हणायला सुरुवात केली, ''ला-इल्लाहा इल्लल्लाहा....''*

*''माया, तूसुद्धा.''*

*माझी मुलं आता माझी मुलं नाही राहिली.*

*'स्वतःच्या पतीच्या मृत्यूनंतर रेहाना नीटपणी सावरली नाहीये; स्वतःच्या जबाबदारीवर मुलांची काळजी घ्यायला ती अजून लहान आहे, तिनं त्यांना अजून स्वर्ग आणि मृत्यूनंतरचं जीवन याबद्दल नीटसं शिकवलेलंही नाही' न्यायाधीशाचं म्हणणं होतं.*

*माया एका फुलपाखराच्या मागे धावत शेजारच्या रांगेत निघाली. तिचं कोपर पकडत रेहाना म्हणाली, ''तुझ्या वडिलांचा निरोप घे बरं.''*

*फुलपाखरांच्या मागे धावणाऱ्या नजरेला बाजूला न वळवता माया म्हणाली, ''गुडबाय, अब्बू.''*

*''मिसेस हक,'' न्यायाधीशांनी विचारलं होतं, ''तुमच्या पतीला काय करावसं वाटलं असतं?''*

*''ती सुरक्षित राहावी असं वाटलं असतं.'' असं उत्तर रेहानानं दिलं होतं. होय, ती दोघं सुरक्षित राहावी असंच त्याला वाटलं असतं.*

*फैझ म्हणाला होता, ''इथे ती मुलं सुरक्षित नाहीयेत. मिलॉर्ड, लष्करी राजवट, संप, रस्त्यावर उतरलेले लोक... सुरक्षित नाहीतच, म्हणूनच माझी पत्नी आणि मी, आम्हाला दोघांनाही या मुलांना लाहोरला घेऊन जायचं आहे.''*

*लाहोर बगीचांचं, नव्या रस्त्यांचं आणि सुबक इमारतींचं शहर. भारताच्या पलीकडे पार दुसऱ्या टोकाला एक हजार मैलांवरचं शहर. फैझ तिच्या नवऱ्याचा थोरला भाऊ. तो बॅरिस्टर होता आणि खूप श्रीमंतही होता. त्याची बायको उंच, फुगीर ओठांची आणि वांझ होती. मुलांकडे ती हावऱ्या नजरेने बघत होती.*

*फैझला रेहाना कधीच आवडली नव्हती, त्याचं मुख्य कारण इक्बालचं तिच्यावरचं कमालीचं प्रेम हेच असावं. ती स्नानाला गेली की स्नानगृहाबाहेर तिच्या सपाता आणून ठेवणं, ऑलिव्ह तेल लावून तिचे पाय चेपून देणं, तिच्याशी नेहमीच अगदी कोवळ्या आवाजात बोलणं. 'सगळ्यांच्या लक्षात येतंय,' फैझ म्हणायचा, 'भाई, तू तुझ्या बायकोला बिघडवतोयस.' आणि धनमाँडीमध्ये राहणारी मिसेस चौधरी तर उसासा टाकत मान्य करायची, 'तुझा नवरा संत आहे.'*

*फैझनं न्यायाधीशांना 'क्लिओपात्रा'बद्दलही सांगितलं. इतक्या लहान मुलांना दाखवण्यासारखा हा चित्रपट आहे? न्यायाधीशांच्या डोळ्यासमोर एलिझाबेथ टेलरची छाती उभी राहिली हे तिला स्वच्छ जाणवलं. मग फैझनं नाण्याची हकीकतही सांगितली. आठ वर्षांपूर्वी इक्बालला कलकत्त्याची एक रेहाना अली नावाची मुलगी सांगून आली होती. रेहाना खानदानी कुटुंबातली होती. चुकीचा सल्ला आणि दुर्दैव यांमुळे रेहानाच्या वडिलांचा फार मोठा तोटा झालेला होता. इक्बाल तेव्हा छत्तीस वर्षांचा झालेला होता, त्याचा विम्याचा व्यवसाय उत्तम चालत होता, मग आता लग्न का करू नये? खरंच का करू नये? त्याने एक नाणं उडवलं होतं, त्याचा काय निर्णय झाला ते पाहून तो झोपायला निघून गेला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याने मुलगी पसंत असल्याचा निरोप पाठवून दिला होता. रेहानाला ही हकीकत कधीच खरी वाटली नव्हती, कारण इक्बाल हा असा जुगार खेळणारा माणूस नव्हता. तो विमा व्यवसायात होता. सुरक्षितता हा त्याचा व्यवसायच होता. अपघात टाळणे, दुष्परिणामांपासून दूर राहणे, कदाचित लग्नाआधी तो वेगळा असेल, कदाचित म्हणूनच फैझ एवढा अस्वस्थ झाला असेल. त्याचा भाऊ आता त्याचा भाऊ राहिला नव्हता.*

*तिनं त्याची मिरच्यांनी दृष्ट काढून टाकायला हवी होती, काही नाही तर निदान एखादा बकरा तरी बळी द्यायला हवा होता, पण तिनं यांपैकी काहीच केलं नव्हतं आणि तो मरून गेला होता. जानेवारीतल्या एका सकाळी,*

*घरासमोरच गुडघ्यांवर कोसळत, जाकिटातल्या घड्याळाकडे हात नेत... जणू काही तिला सोडून जात असल्याची निश्चित वेळ त्याला टिपून ठेवायची होती. त्याची काठी घरंगळत गटारात जाऊन पडली होती. तिच्याकडे पाहात तो पुटपुटला होता, ''मला माफ कर.''*

*आणि आता ती एक विधवा होती, दुसरा कोणताच गुण नसलेली, जवळचे कुणी नातेवाईक नसलेली - एक विधवा. तिचे आई-वडील वारलेले होते, तिच्या तिघी बहिणी कराचीमध्ये राहात होत्या; तेव्हाच फैझ आणि परवीनने मुलांना घेऊन जाण्याचा विषय काढला होता. सुट्टीमध्ये रेहाना त्यांना भेटू शकणार होती. थोड्या वर्षांसाठीच फक्त. परवीन म्हणाली होती, ''तुला थोडा सावरायला वेळ मिळेल.'' जणू काही हा काहीतरी आजारच होता, बरं होण्यासारखं काहीतरी, देशाच्या बाबतीत घडत होतं तसंच काहीसं...! रेहानाने नकार दिल्यानंतर फैझ आणि परवीनने न्यायालयामध्ये धाव घेतली होती.*

*''मिलॉर्ड'' फैझ म्हणाला होता, ''मिसेस हक दुःखाने बावरून गेल्या आहेत. त्यांना विश्रांतीची गरज आहे. आम्ही केवळ मुलांच्या भल्याचाच विचार करतोय,''*

*तिने अशा माणसाशी लग्न केलं होतं ज्याच्यावर प्रेम करण्याची तिने अपेक्षाच केली नव्हती. तिने ज्याच्यावर प्रेम केलं होतं तो तिला सोडून जाईल अशीही तिने कल्पना केली नव्हती. एक संयमी जीवन ती जगली होती, ज्यामध्ये फारसे धक्के नव्हते असं जीवन. फारशी महत्त्वाकांक्षा नसलेला, फार कुठेतरी जाऊन पोहोचणार नसलेला असा नवरा शोधायला तिने आपल्या वडिलांना सांगितलं होतं.*

*अंधार पडायला लागला होता. कबरीवरच्या अंधारलाटा त्यांच्या पावलाशी येऊन ठेपल्या होत्या.*

*''अम्मू, मला भूक लागलीये.'' माया म्हणाली.*

*रेहानाने ग्लुकोज बिस्किटांचा एक पुडा घेतला होताच बरोबर. त्याचं गुलाबी वेष्टण फाडत ती म्हणाली, ''हे घे.''*

*पुतळ्यासारखा उभा राहून सोहैल आपल्या वडिलांच्या कबरीकडे पाहात होता.*

*''चल, आपण घरी जाऊया.'' तो म्हणाला.*

*''थोडा वेळ,'' इक्बालला अजून सगळं सांगून झालं नव्हतं. ''हे पतंग*

*उडताहेत ना ते बघा बरं जरा वेळ.'' मुलं कबरस्तानाच्या कडेला असलेल्या एका मोकळ्या जागी गेली. फिरक्यांना गुंडाळलेला दोरा सोडवायला लागली. रेहानाने पुन्हा सुरुवात केली.*

> *प्रिय पतीस,*
>
> *तू मला दिलेली एकुलती एक गोष्ट मी आज हरवली आहे. मला न्यायाधीशांनी जेव्हा विचारलं, की 'मुलांची काळजी घ्यायला तुम्ही समर्थ आहात अशी तुम्हाला खात्री आहे का?' तेव्हा मी 'हो' म्हणू शकले नाही. मी गप्प राहिले आणि त्या माझ्या मौनात त्यांना माझं अडखळणं जाणवलं, म्हणूनच त्यांनी मुलांना देऊन टाकलं. हा माझा एकटीचा– फक्त माझा गुन्हा आहे, दुसऱ्या कोणाचाही नाही. तुझ्या भावाला ती हवीशी वाटताहेत याबद्दल मी त्याला दोष देणार नाही. ती मुलं कोणाला हवीशी वाटणार नाहीत? तुझीच हुबेहूब प्रतिकृती आहेत ती.*

*त्या गरम खोलीत गरगरणाऱ्या पंख्यांवर धुळीची लव जडली होती. तिथल्या बाकांवरची मखमली आवरणं जुनी होऊन चमकायला लागली होती. न्यायाधीशांचा काळा-पांढरा टोप फाटायला आलेला होता. अशा त्या खोलीत हा निकाल ऐकल्यावर ती गुडघ्यांवर कोसळलीच होती. ती गरीब होती, या शहरामध्ये तिला जवळचं कुणीही नव्हतं आणि वारस म्हणून तिला फक्त एका लहानसा जमिनीचा तुकडा मिळालेला होता... त्यातली भातशेती इतकी नुकती बंद करण्यात आली होती की रोज पहाटेच्या प्रार्थनेसाठी ती उठायची तेव्हा तिच्या लहानशा बंगल्यावर चाल करून आलेले अनेक लहान-मोठे कीटक तिला आधी मारावे लागायचे. हे असं जरी सगळं असलं तरी ती आपल्या मुलांची आई होऊ शकली असती हे काही तिला कुणाला पटवून देता आलं नव्हतं. त्यांचे वडील नक्की कोठे गेले आहेत हे तिने मुलांना नीट समजावून सांगितलं नव्हतं, शाळा बुडवून घरी राहण्याची परवानगी तिनं मुलांना दिली होती. तिनं त्यांना 'क्लिओपात्रा' बघायलाही नेलं होतं, पण तरीही ती त्यांची आई होतीच ना...! स्वत:चं दु:ख, स्वत:ची गरिबी, स्वत:चं तारुण्य हे सारं मनामागे टाकण्याचा ती प्रयत्न करणार होती, एकटीनंच त्यांच्यावर प्रेम करण्याचाही ती प्रयत्न करणार होती, पण कोणीही*

*तिच्यावर विश्वास ठेवला नाही. आता काही आठवड्यांतच तिची मुलं एक मोठा खंड ओलांडून पलीकडे जाणार होती - आणि ती परत कधी तिच्या दृष्टीला पडतील हे तिला माहीत नव्हतं...!*

*काही दिवसांनंतर फैझ आणि परवीन मुलांना घेऊन पाकिस्तान इंटरनॅशनल एअरलाईन्सच्या ०१० या क्रमांकाच्या विमानाने कराचीला निघून गेले. विमानतळाच्या एका खिडकीतून... केसांच्या तेलाचे आणि निरोपाच्या हाताबोटांचे तेलकट ठसे उमटलेल्या त्या काचेतून रेहाना त्यांना जाताना बघत उभी होती. ही जगबुडी कधी संपणार याचा विचार करत तिनं हलकासा हात हलवला. आपआपले पतंग काखोटीला मारून माया आणि सोहैलने खुर्चीच्या पट्ट्या बांधल्या आणि पाण्याने भरलेल्या भातशेतांवरून मोठ्या डौलाने ती दोघं आकाशात तरंगत निघून गेली.*

*ती सगळीजणं सुखरूप पोहोचल्याचं कळवण्यासाठी परवीनने दुसऱ्या दिवशी फोन केला, पण इतक्या दूरवरून आलेल्या त्या फोनवर इतर खरखरच अधिक होती. तिला फक्त परवीनचं सौम्य आणि सुसंस्कृत बनवलेलं हसणं ऐकू येत होतं... त्यामध्ये जेवढा आत्मविश्वास होता, तेवढाच एक खजील असा पश्चात्तापही होता.*

*पुढचे काही दिवस लोक तिला भेटायला येत होते... इक्बालचे व्यावसायिक परिचित, तिच्या वडिलांचे स्नेही असल्याचा दावा करणारे म्हातारे लोक, फडफडणाऱ्या जिभांनी 'आम्हाला फार दुःख झालं.' असं म्हणत राहणारे दूरचे नातलग, ढाका जिमखाना क्लबमध्ये तिच्याबरोबर पत्ते खेळणाऱ्या तिच्या मैत्रिणी... अगदी तिचा वकीलसुद्धा. दुःखाचं पर्यटन करणारे लोक... रेहानाच्या मनात आलं आणि मग तिनं खडखडणाऱ्या दाराकडे लक्ष देणं बंदच केलं.*

*मिसेस चौधरी सोडून... त्या एका दुःखी, रडणाऱ्या मुलीला फरफटत बरोबर घेऊनच आल्या. त्यांनी आपल्या मांसल, थुलथुलीत दंडांच्या मिठीत रेहानाला घेतलं आणि त्याच वेळी आपल्या रुसलेल्या मुलीला खडसावलं.*

*"सिल्वी, ही काही जगबुडी झालेली नाहीये... ते येणारेत परत." आणि मग त्या रेहानाकडे वळल्या, "तुला थोडी वर्षं तरी सुख मिळालं गं, मी त्याला मुलगा देऊ शकले नाही म्हणून माझा हरामी नवरा मला सोडून गेला.*

हिच्याकडे एक नजर टाकली आणि जो गेला तो आजवर माझ्या दृष्टीला पडलेला नाही.''

बागेकडे टक लावून पाहात रेहाना निश्चल बसली होती. अखेरीस मिसेस चौधरी म्हणाल्या, ''आपण तिला बिचारीला विश्रांती घेऊ दिली पाहिजे.''

सिल्वी स्वयंपाकघराच्या दारामागे खुडबुडत होती. ''नऊ वर्षांची...'' मिसेस चौधरी मोठ्याने म्हणाल्या, ''रुसावं तर मोठी झालीये आणि प्रेमभंग झालाय म्हणावं तर अजून फार लहान आहे. तुला काय वाटतं, दुसरा कोणी मुलगा तुला लग्नाबद्दल विचारणारच नाही?''

''थांबू दे तिला इथे.'' रेहाना म्हणाली. ''आम्ही जेवू बरोबर.'' या पोरीला काय खायला द्यावं याचा ती विचार करायला लागली. ती बाजारात गेलीच नव्हती. घरात फक्त थोडी पाणचट आमटी आणि कडू भोपळा होता.

''तू म्हणाली होतीस, आपण 'रोमन हॉलिडे'ला जाऊ म्हणून.''

''पुन्हा कधीतरी जाऊ हं, सिल्वी!''

''ते आलेच परत कधी तर... ठीक आहे.''

ती गेली. रेहाना तिला दरवाजापर्यंत सोडायलाही गेली नाही.

दिवस जाताना रेहाना बघत राहिली. तिनं सोहैल आणि मायाला पत्रं लिहायला सुरुवात केली.

'या वर्षी आंबे फार छान येणार आहेत. अगदी योग्य वेळेलाच उकडत होतं आणि पाऊस पडत होता. मला तर त्या झाडाचा वासही यायला लागलाय.'

तिनं ते पत्र फेकून दिलं.

'माझ्या लाडक्या मुलांनो, मला तुमची किती आठवण येते म्हणून सांगू?' अशी सुरुवात असलेलं पत्रही तिनं फाडून फेकून दिलं.

ती खूप आनंदी, खूप बातम्या देणारी पत्रं लिहायची. मुलांना गोंधळून गेल्यासारखं वाटायला नको. त्यांना सर्व महत्त्वाच्या गोष्टी माहीत असायला हव्यात.

ती लवकरच त्यांना परत मिळवणार होती.

अजूनही जग मैत्रीपूर्णच होतं...!

सिल्वी त्यांना विसरली नव्हती.

शेजारपाजार त्यांच्या आठवणीतल्यासारखाच होता.


मुलांविषयीच्या तिच्या आठवणी पुसट-फिकट व्हायला लागल्या. ती जेवढी त्यांना पकडून ठेवण्याचा प्रयत्न करायची तेवढ्या त्या दूर पळायच्या. मग तिनं फक्त वास्तवाला धरून ठेवण्याचा प्रयत्न करायला सुरुवात केली. मायाला निळा रंग आवडतो, सोहैलचा आवडता रंग लाल आहे, सोहैलच्या हनुवटीवर थोडं खाली एक व्रण आहे. त्याला चिडवताना ती म्हणाली होती, ''हा व्रण फक्त तुझी बायकोच बघू शकेल, कारण ती तुझ्याजवळ उभी राहील आणि तुझ्याकडे वर बघेल.'' तेव्हा तो अगदी गंभीरपणे म्हणला होता, ''आणि ती खूप उंच असली तर?'' तिच्या मुलाकडे विनोदबुद्धी होती. नाही... त्याला विनोद अजिबात कळत नसे. तो हसायचाही अगदी क्वचित. यातलं खरं काय होतं?

आपल्या दोन मुलांमधला फरक आठवण्यात ती रमून जायची. एक मूल हट्टी- आरडाओरडा करणारं होतं, दुसरं शांत- सगळं निरखून बघणारं होतं. आपलं गाणं ऐकून पक्षी उलट गातात का हे बघणारं एक मूल होतं. माती खायला आवडायचं म्हणून एकाची नखं तिला तपासावी लागायची. उकाडा असो की थंडी, एकाला नेहमी सर्दी व्हायची. अबोलीच्या चिमुकल्या फुलातला लाल रस एक चोखायचं, एक बोलकं तर दुसरं अगदी गप्प. एकाला क्लार्क गेबल आवडणार तर दुसऱ्याला दिलीपकुमार. भटकी कुत्री, बागेच्या दरवाजावर नखांचा कर्कश्श आवाज करत उतरणारे कावळे, दूधभात आणि आईस्क्रीम...!

इक्बाल त्यांची सतत काळजी करत राहायचा, थंडी नसली तरी त्यांना स्वेटर घालायला लावायचा, दर महिन्याला डॉक्टरला घरी बोलावून त्यांच्या चिमुकल्या छात्या तपासायला लावायचा, गर्दीच्या रस्त्यांवर त्यांचे हात धरायचाच, पण रिकाम्या रस्त्यांवरही हात धरून ठेवायचा... 'असू दे, उगाच नको, आली गाडी एखादी तर...' असं म्हणत... अशा क्षणांच्या आठवणींमधून तर ती बाहेरच पडू शकत नव्हती आणि तो त्यांचा आगगाडीचा प्रवास... न होता होता झालेला.

मायाचा चौथा वाढदिवस होता. इक्बालची नवी वॉक्झॉल गाडी नुकतीच इंग्लंडहून येऊन पोहोचली होती. १९५७मध्ये लंडनच्या वॉड्सवर्थमधल्या वॉक्झॉलच्या कारखान्यामधून निघालेल्या पन्नास मोटारींच्या खास ताफ्यातून ती गाडी ढाक्याला येऊन पोहोचली होती. इक्बालनं या नव्या गाडीची,

**८वी आवृत्ती**




# चकाट्या

लेखक - **द. मा. मिरासदार**

**किंमत : १६०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

शिवाजीमहाराजांच्या हस्ताक्षराने मास्तर व बाबांकडून खिंडीत सापडलेला मोरेश्वर... जगबुडीचा प्रलय आला; पण तो गावापर्यंत पोहोचलाच नाही... भुतालाही न घाबरणारे बाबा – चक्क उंदराला घाबरले...

दगडू व बाबूचा फोटो तर काढला, पण त्यांची छबी त्यात उमटलीच नाही...

'स्वभाव' तो कोणाचाही असो, पण मग तो शेजारणीचा असेल तर...

जागेवर न जाता केला जाणारा पोलीस-तपास होता कसा... घराला रंग दिला; पण तो पेंटरने नव्हे?... शेतातून नवा रस्ता जाऊ नये म्हणून एकनाथला करावी लागलेली तडजोड...

ढग कसे तयार होतात?... ग्रहण म्हणजे काय?... या सोप्या प्रश्नांची उत्तरं 'बाबांच्या अभ्यास'मध्ये मिळाली...


गावगप्पांमधून तयार झालेला खास असा 'गावरान मेवा' द.मा. मिरासदारांनी आपल्या खास विनोदीशैलीतून 'चकाट्या'मध्ये मांडला आहे.

तिच्या नव्यानं बनवलेल्या रेडिएटरची आणि खिडकीच्या काचा खालीवर करणाऱ्या हँडल्सची जाहिरात बघितली होती; त्यात एक छायाचित्रही होतं. तो त्या गाडीच्या प्रेमातच पडला होता - तिची गोलाई, बाहेर आलेले आरसे... रुंद लालबुंद फितीने सजवलेली ती गाडी चालवत मोठ्याने हॉर्न वाजवत तो स्वत:च्या गराजमध्ये आणत असल्याची स्वप्नं त्याला पडायला लागली, पण जेव्हा ती गाडी खरोखरच येऊन पोहोचली तेव्हा मात्र ती चालवायला तो कचरायला लागला, मग त्याने एक ड्रायव्हर नेमून टाकला– तोसुद्धा ब्रिटिश कॉन्सल- जनरल साहेबांची रोल्स रॉइस चालवणारा ड्रायव्हर. मोटार चालवण्यात अगदी वाकबगार. त्याचं नाव होतं कमाल. ज्या दिवशी मायाने तिच्या वडिलांकडे बघत तेजगाव -फुलबारिया आगगाडीच्या डब्याच्या खिडकीतून हात हलवला तेव्हाही कमालच ती वॉक्झॉल चालवत होता.

मायाच्या वाढदिवसाची खास भेट म्हणून त्यांनी आगगाडीतून सफर करायचं ठरवलं होतं. शहराच्या सीमाभागावरच्या एका नव्या स्थानकापासून फुलबारिया सेंट्रलपर्यंतची सफर- हा रेल्वेमार्ग नुकताच सुरू झाला होता. आशावादी सरकारने बांधलेल्या नव्या चकचकीत, रंगीबेरंगी स्थानकातून ब्रिटिश राजमध्ये बांधण्यात आलेल्या– आता मोडकळीला आलेल्या स्थानकापर्यंत, एक लहानशी सफर. हा त्यांचा आगगाडीचा पहिलावहिला प्रवास होता. ठरलेल्या दिवशी रेहानाने कबाब रोल बनवले, इक्बाल आकाशातले ढग मोजत एखादं वादळ होण्याची चिन्हं दिसली तर हा सगळाच कार्यक्रम रद्द करता येईल का ते पाहात होता, पण ऑक्टोबरची एक छानशी झुळूक आणि आकाशात जाळीदार नक्षीचे ढग याखेरीज त्याला काहीच सापडलं नाही. कमालनं मोटार सुरू केली आणि त्या सर्वांसाठी दरवाजे उघडून धरले. इक्बालने सर्वांना मागच्या सीटवर बसायला लावलं. सर्वांत आधी माया आत शिरली. रेहानानं तिच्यासाठी नवा, फिकट निळ्या रंगाचा, सॅटिनचा फ्रॉक शिवला होता, तो तिनं घातला होता. फ्रॉकच्या आत जाळीचा पेटिकोट होता, त्यामुळे तो फ्रॉक अगदी ताठपणे आणि थोड्या विचित्रपणेही मायाच्या चारी बाजूंना पसरला होता. तिच्या केसांमध्ये निळ्या रिबनी होत्या, शिवाय तिनं आज रेहानाला मनवून स्वत:च्या ओठांवर अगदी फिकट गुलाबी रंगाचं लिपस्टिकही फिरवून घेतलं होतं आणि आता ओठांचा चंबू करून तो रंग ती सांभाळत होती. मांडीवर खाण्याच्या पदार्थांचं बास्केट

८वी आवृत्ती

# फ्रीडम अॅट मिडनाइट




**मूळ लेखक** - डॉमिनिक लॉपिए
लॅरी कॉलिन्स

**अनुवाद** - माधव मोर्डेकर

**किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

'भारतातील ब्रिटिश सत्तेवर आपण आपल्याच हाताने उदक सोडत आहोत. आपण आपल्याच हाताने हा धोंडा पायावर पाडून घेत आहोत. त्यातून होणारी हानी आपल्या दृष्टीने अंतिम व आपल्या एकूण अस्तित्वाला धोक्यात आणणारीच ठरेल. यथावकाश, आपल्याला जगातील एक किरकोळ प्रतीची सत्ता बनवणाऱ्या एका प्रक्रियेची ती सुरुवातच ठरणार यात मला तर शंका वाटत नाही.'

— विन्स्टन चर्चिल
हाऊस ऑफ कॉमन्स मधील एका भाषणात
फेब्रुवारी १९३१

सांभाळत रेहाना मोटारीत बसली आणि तिनं इक्बाल आणि सोहैलला लवकर चलण्याची खूण केली, पण ते दोघे मोटारीबाहेर उभं राहून कोणत्या तरी वादात अडकलेले दिसत होते.

''अब्बू, मागच्या सीटवर जागाच नाहीये.''

''तू पुढच्या सीटवर बसायचं नाहीस, ते धोक्याचं आहे.''

''उफ, अब्बू, मी काय लहान आहे का आता?'' जमिनीवर पाय आपटत सोहैलनं निषेध नोंदवला.

''अपघात घडतात ना तेव्हा तू लहान आहेस की मोठा आहेस ते बघून घडत नाहीत.''

रेहानानं खिडकची काच खाली केली. ''सौहैल, तुझे अब्बू सांगताहेत तसं कर.''

अखेरीस सोहैल नाराजीनंच मोटारीत घुसला, त्याच्यापाठोपाठ इक्बालही.

तिथं सगळीजणं- चौघंजण मागच्या सीटवर बसली तेव्हा थोडी गर्दीच झाली होती. एखाद्या लहानशा निळ्या भरतीच्या लाटेसारखा मायाचा फ्रॉक तिच्यासमोर तरंगत होता. इक्बालचा पांढरा शार्कस्किनचा सूट चुरगळायला लागला होता. 'खरोखर, इक्बालनं त्या बिचाऱ्या पोराला पुढे ड्रायव्हरजवळ बसायची परवानगी दिली असती तर बरं झालं असतं.' रेहानाच्या मनात आलं. खूप उकडत होतं. तिनं हट्टानं खिडकीची काच खाली केली आणि दुसऱ्या बाजूचीही काच खाली करायला सोहैलला सांगितलं. आत येणाऱ्या बारीकशा झुळकीने मायाच्या निळ्या रिबनी डुलत होत्या. तेजगावला पोहोचेपर्यंत इक्बालनं पुन्हा त्यांच्या प्रवासाविषयी काळजी करायला सुरुवात केली होती. ते सगळे जर आगगाडीत अडकून पडले तर ते इतरांना कसं कळणार? स्टेशनवर पोहोचायला कमालला उशीर झाला तर काय? हे असं घडण्याच्या शक्यतांचा हिशेब त्यानं मनातल्यामनात करायला सुरुवात केली. तेजगाव स्थानकापर्यंत पोहोचता पोहोचता त्याच्या मनात एक कल्पना आली.

''रेहाना, तू मुलांना घेऊन जा, मी मागे थांबायचं ठरवलंय.''


''काय? काय म्हणालास?''

''मी कमालबरोबर मोटारीतून येतो. आम्ही आगगाडीच्या बरोबर येऊ म्हणजे काही झालं तर तुम्ही सरळ गाडीतून उतरून मोटारीत येऊ शकाल. वा! काय कल्पना!''

*अखेरीस त्यांनी तसंच केलं, तिला अगदी स्वच्छ आठवत होतं. माणूस मोटारीत, त्याचं कुटुंब आगगाडीत, आगगाडीचा डबा त्या नव्या कोऱ्या रुळांवर आणि शेजारच्या रस्त्यावरून चाललेली ती नवी परदेशी मोटार, कबाब रोल्स आणि लिंबू सरबताची जिभेवर रेंगाळणारी चव आणि तिचा नवरा- आपण लढवलेल्या युक्तीने आता आपल्या कुटुंबाला काहीही होणं शक्यच नाही या खात्रीनं फुललेला त्याचा चेहरा!*

❖


**५वी आवृत्ती**




# भेटीगाठी

**लेखक** - शंकर पाटील

**किंमत : ११०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

तो असा बसताच चाबूक कडाडे... वादी पिंजून जाई, तुटून जाई. निबार कातडीवर वळ उठत. दवबिंदूगत रक्ताचे थेंब अंगावर थरथरत उभे राहत. कोयंड्याची काठी चिंबून, एकेक कुंडं मनगटाएवढा उठे; पण सर्जा जागचा हलत नसे. हे बघून लोक त्याला 'बशा' म्हणायचे. बशा बैल म्हणून सर्जाचं नाव बद्दू झालं. म्हातारपणी त्याच्या नशिबी बोल आला. त्याच्या गुणाला बट्टा लागला...

८वी आवृत्ती

# गंमतगोष्टी




**लेखक - द. मा. मिरासदार**

**किंमत : १५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

खासबातमीचं भांडवल करणाऱ्या किसन न्हाव्याची तऱ्हा...
पंचनाम्यात दुरुस्ती कशी करायची याचे प्रात्यक्षिक घेणारा नारायण कॉन्स्टेबल...
दिल्लीला प्रदर्शन पाहण्यास निघालेल्या पाटलांनी घेतलेले विशेष 'दर्शन'....
डिगूनानांच्या क्रियाकर्माला केवळ पैशांमुळे मिळालेला 'वारस'....!
नवशिक्षणशास्त्राचा प्रयोग बासनात गुंडाळून; पुन्हा 'विद्या येई'चा पाठ गिरवणारे नवशिके शिक्षक...
वधूसंशोधनाऐवजी 'बुद्रुक' का 'खुर्द' या फेऱ्यातच अडकलेला वर...अन् लगीन घरात सफाईने हात मारून सर्वांसमक्ष पोबारा करणारा 'भामटा'....
...या आणि अशाच इरसाल पात्रांचा आपल्या ग्रामीण शैलीतून मागोवा घेणाऱ्या द.मा. मिरासदारांच्या 'गंमतगोष्टी'!



# पुस्तक परिचय

‘अ किडनॅप्ड माइंड’ या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद

## एका मातेचा लढा

*पालकांमधील दुराव्याच्या दुष्परिणामाला बळी पडलेल्या मुलाच्या आईची हृदयविदारक कहाणी*




पॅमेला रिचर्डसन या ‘द सॅटर्डे शो’ हा कार्यक्रम सादर करीत असत. तसेच ‘टोरंटो लाइफ फॅशन’, ‘व्हँकूव्हर मॅगेझिन’, ‘वेस्टर्न लिव्हिंग’ यासाठीही काम करीत होत्या. त्यांनी टीव्हीसाठी काही कार्यक्रम तयार केले. मासिकांमधून लिहिले. सध्या त्या पूर्णवेळ गृहिणी असून आपली दोन तरुण मुले आणि पती डेव्हिड यांच्यासमवेत व्हँकूव्हरमध्ये वास्तव्य करीत आहेत.

*आईचा आपल्या मुलाबद्दलचा शोक आणि 'पालक दुराव्याची लक्षणे' (पॅरेन्टल एलिनेशन सिंड्रोम – पी.ए.एस.) सांगणारी ही दुपदरी कहाणी आहे. १९८५ मध्ये डॉ. रिचर्ड गार्डनर यांनी 'पीएएस' प्रथम उजेडात आणला. मुलाबद्दलचा कस्टडीचा वाद आणि तदनुषंगाने मुलाला पढवणे, दुसऱ्या जोडीदाराबद्दल मुलाच्या मनात विष कालवणे (इतकं की, ते पढवलेले विचार शेवटी त्या मुलाला स्वत:चेच वाटू लागतात.) यामुळे त्या मुलाचे मानसिक संतुलन ढासळते. यालाच 'पीएएस'*

मूळ लेखक
**पॅमेला रिचर्डसन**

अनुवाद
**सुषमा जोशी**



*नाव दिले गेले. पॅमेला रिचर्डसनचा मुलगा डॅश हा त्याच्या वयाच्या पाचव्या वर्षापासून पीएएसपीडित होता. याला कारण त्याचा बापच होता. फोनवरचे निर्बंध आणि ॲक्सेसमध्ये आणलेले अगणित अडथळे याकडे दुर्लक्ष करून, 'आपल्या आईने आपल्याला टाकून दिलं, तिने विश्वासघात केला,' हे डॅशच्या मनावर हरतऱ्हेने बिंबवले गेले. आणि आठ वर्षांच्या डॅशने ठरवले की, आईकडे जाण्यासाठी त्याच्यावर बळजबरी करू नये. शेवटी तर त्याने आईला असेही सांगितले की,*

*'जर आई कोर्टात गेली, तर तो तिचे तोंडही पाहणार नाही.' यानंतरची आठ वर्षे डॅशचा बाप, न्यायव्यवस्था, मानसोपचार- तज्ज्ञ, शिक्षण व्यवस्था या साऱ्यांशी पॅमेला झुंजत राहिली. आपल्या मुलाचा त्याच्या बापापासून आणि शेवटी त्याचा त्याच्या स्वत:पासून बचाव करण्यासाठी झगडत राहिली.*

## मुलांचे पालनपोषण करण्यात अपयशी ठरणारे काही पालक अपयशी ठरतात, त्यामागची कारणीमांसा

मुलं या जगात येतात तेव्हा ती त्यांच्या पालकांवर, त्यांच्या प्रेमावर पूर्णतया विसंबून असतात. मुलांचं पालन-पोषण करण्याच्या पद्धती, क्षमता या वेगवेगळ्या असतात. पण बहुतेक जण हे आयुष्यभराचं काम यशस्वीरित्या पार पाडतात. तथापि काही मुलांना मात्र असं पालकांचं सुख मिळत नाही.

**काही आई-वडिलांना त्यांच्या शारीरिक, मानसिक अक्षमता, आजारपणं, व्यसनाधीनता, गुन्हेगारी, गरीबी, युद्ध अशा अनेक कारणामुळे मुलांचे संगोपन करता येत नाही. काही वेळा इच्छाही होत नाही. अशावेळी या परिस्थितीतील मुलांचे पालन-पोषण कुटुंबातील इतर व्यक्ती. त्या कुटुंबाचे मित्रमंडळ, शेजारी किंवा सामाजिक संस्था यांकडून केले जाते.**

पण काही वेळा असेही पालक आढळतात की, ते आपल्या मुलांचं रक्षण, संगोपन, शिक्षण, मार्गदर्शन करण्यात अपयशी ठरतात. आई-वडील झालेली ही मंडळी काही असमर्थ किंवा पुरेशी साधनसामग्री नसलेली अशी अजिबात नसतात. उलट ही मंडळी पालकत्व सोडलं तर स्वच्छ विचारांची, हिकमती, जीवनाच्या इतर क्षेत्रात कार्यक्षम असतात. या मंडळींचे मुलांवरचे प्रेम, आस्था विचारात घेतली, तर या पालकांची गणना आदर्श पालकांमध्ये केली जाईल. इतर अकार्यक्षम पालकांपेक्षा या व्यक्ती त्यांच्या स्वत:च्या गरजांकडे अधिक लक्ष देतात. आणि त्यांच्या या स्वत:बद्दलच्या निष्ठेमुळे ही मंडळी इतरांपेक्षा वेगळी वाटतात. **स्वत:च्या गरजा पूर्ण करण्याच्या भरात ही मंडळी आपल्या**

**मुलाचे त्याच्या इतर पालकांबरोबर असलेले संबंध, नाते नष्ट करतात. मग त्यासाठी कसलीही किंमत मोजण्यास त्यांची तयारी असते.**

पॅमेला रिचर्डसनच्या 'अ किडनॅप्ड माइंड' या पुस्तकात तिने आपल्या मुलाची मानसिक पडझड आणि परिणामी त्याची आत्महत्या हे सारं नोंदवलं आहे. ही एक व्यथित करणारी कहाणी आहे. यात डॅशची जगण्याची धडपड आहे. त्याच्या बापाने आपल्या माजी पत्नीवर सूड उगवण्यासाठी आपल्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या आपल्या मुलाच्या गरजाकडे संपूर्ण दुर्लक्ष केलं होतं. अशा परिस्थितीतील डॅशची धडपड आहे. डॅशला जणू त्याच्या सोळा वर्षांच्या आयुष्यातील अकरा वर्षे मानसिकदृष्ट्या ओलिस ठेवलं गेलं होतं.

'अ किडनॅप्ड माइंड' ही केवळ एका आईची, तिचा कटू घटस्फोट आणि कस्टडी, यानंतर मुलाची कस्टडी मिळवण्याची लढाई यांची कहाणी नाही. एखाद्या मुलाचा दोन्ही पालकांवर प्रेम करण्याचा आणि दोघांकडून त्याच्यावर प्रेम करवून घेण्याचा हक्क हिरावून घेतल्यामुळे त्याची जी भावनिक हानी होते. त्या हानीची ही कहाणी आहे. न्यायव्यवस्थेचं मुलांच्या गरजांकडे केलं जाणारं दुर्लक्ष, याची ही कथा आहे. आई-बापाच्या उबदार प्रेमाचा अनुभव घेतलेल्या आनंदी निरोगी मुलाला, पद्धतशीरपणे एका पालकाच्या प्रेमापासून का तोडलं जातं, त्या कारणांचा कायद्याच्या मूलभूत चौकटीच्या पलीकडे जाऊन शोध घेण्याची न्यायव्यवस्थेची अनास्था या कथेत आहे.

डॅशची कथा ही 'पालक दुराव्याचे' मानसिक कटुतम दुष्परिणाम सोसण्याचे प्रतिनिधित्व करते. 'पालक दुराव्याचे दुष्परिणाम' हे कस्टडी केसमधले 'जोड उत्पन्न' आहे. आपल्या माजी जोडीदाराला धडा शिकवणे, हेच उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवल्याने आपल्या पाल्याच्या आनंदाकडे, भल्याकडे दुर्लक्ष करणारे अनेक पालक आहेत. त्यामुळे कित्येक मुलांना हे दुःख भोगावे लागत आहे. हे पालक मूल आणि दुसरा पालक यांच्यातील नातेसंबंध मुद्दाम नष्ट करत असतात. घटस्फोटानंतर 'संयुक्त कस्टडी' हा चांगला पर्याय आहे, असा विचार १९८०नंतर कोर्टाने केला. पण तेव्हापासून त्या घटना वारंवार घडत असल्याचे संबंधित व्यावसायिकांच्या लक्षात येत आहे. 'पालक दुराव्याचे मानसिक दुष्परिणाम' ही बाब विवाद्य झाली आहे. कारण 'जस्टीस फॉर चिल्ड्रेन' आणि 'नॅशनल अलायन्स फॉर फॅमिली कोर्ट' अशांसारख्या इतर काही घटकांनी आपल्या कार्यक्षेत्राच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी ही बाब अस्तित्वात नाही, असे मत व्यक्त केले आहे.

**माझा विश्वास आहे की, हे पुस्तक काही दृष्टिकोन देईल. घटस्फोटित पालकांची मुलं शिक्षणात अयशस्वी ठरतात. मग हे शिक्षण उपपत्तीवर वा**

**निरीक्षणावर आधारलेलं असो. अशा मुलांच्या गरजांकडे बघण्याची व्यापक आणि वेगळी दृष्टी 'अ किडनॅप्ड माइंड' या पुस्तकामुळे मिळेल, असा मला विश्वास आहे.**

ह्या कारणामुळेच हे पुस्तक न्यायाधीश, कुटुंब वकील आणि घटस्फोटित कुटुंबाचे सर्व संबंधित यांनी जरूर वाचले पाहिजे.

आपल्या मुलाला त्याच्या आयुष्यभर, त्याच्या मदतीसाठी आणि नंतर त्याच्या मृत्यू व्यर्थ जाऊ नये यासाठी पॅमेला रिचर्डसनने दाखवलेली ताकद, केलेला पाठपुरावा आणि तिची बांधिलकी याची मी प्रशंसा करते. या उत्तम पुस्तकाला हातभार लावण्याची मला संधी मिळाली, हा माझा सन्मानच समजते.

**– डॉ. रिना सॉमर,** पीएच.डी

(घटस्फोट आणि कस्टडी सल्लागार)

## पालकांमधील बेबनावामुळे मुलांचे भावविश्व असुरक्षित होते.

''सावध, ऐका पुढल्या हाका...!''

घटस्फोटित पालकांच्या मुलांची प्रेम आणि निष्ठा याबद्दल होणारी कुचंबणा, फरपट, त्यांना वाटणाऱ्या भावनिक व मानसिक अस्थैर्य-असुरक्षिततेची ही कॅनेडियन कहाणी. एका अर्थाने ती वैश्विक कहाणीही आहे. आपल्या जोडीदाराला शह देऊन त्याच्यावर मात करण्याची इच्छा, त्यासाठी मुलांचा केला जाणारा वापर, न्यायालयातील विलंब, कायद्यातील पळवाटा, आईची मुलाबद्दलची ओढ– या आणि अशा अनेक गोष्टी जगाच्या पाठीवर – तपशीलात थोडाफार फरक असेल; पण तशा त्या सारख्याच असतात. त्यामुळे या कहाणीला वैश्विक रूप मिळते.

त्याचबरोबर यात अधिक लक्षणीय आहे तो, एका आईनं न्यायव्यवस्था आणि कायदा यांच्यातील त्रुटीविरुद्ध दिलेला अपयशी लढा!

आज आपल्या समाजातील व्यक्तिवादाचा अतिपुरस्कार, घटस्फोटाचे वाढते प्रमाण कुटुंब व्यवस्थेवर आघात करत आहेत. मी काही कुणी विचारवंत, अभ्यासक, समाजशास्त्रज्ञ नाही. मी एक कुटुंबवत्सल गृहिणी, आई, आजी आहे. त्यामुळे माझा विचाराचा आवाका मर्यादित आहे. पण आईवडिलांच्या चढत्या आवाजामुळे, भांडणामुळे, बेबनावामुळे मुलं अस्वस्थ, बैचेन होतात, त्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना तयार होते. याची सर्वांना जाणीव आहे. त्यामुळेच कौटुंबिक पातळीवर ''प्रत्येक वेळी मीच का?'' हा प्रश्न न विचारता, मुलांच्या निकोप वाढीसाठी आपला व्यक्तिवाद आवरता घ्यावा. आपल्या झगड्यात मुलांचा उपयोग केला जाऊ नये हे भान या पिढीला – सर्वांना येवो. हीच सदिच्छा!

हा अनुवाद शब्दश: नाही. कायदेशीर किचकट गुंता, मानसशास्त्रीय विश्लेषण, शिक्षण-प्रणाली इत्यादी गोष्टींचे शब्दश: भाषांतर न करता शक्यतो मूळ आशय भाषांतरित करण्याचा प्रयत्न केला आहे. अनुवादामध्ये आता मराठीत रुळलेले, वीकएंड, ख्रिसमस, हॅलोविन, पाइ इत्यादी शब्द तसेच ठेवले आहेत.

यातून दिसलेली शिक्षण-व्यवस्था कौतुकास्पद आहे. भावनिक-मानसिक दृष्ट्या अस्थिर मुलांसाठी, अक्षर-लेखन-वाचनाची अक्षमता (dyslexia) असणाऱ्या मुलांसाठी, वर्गात मागे राहणाऱ्या मुलांसाठी अभ्यास करवून घेण्याच्या पद्धती आहेत, वेगवेगळ्या शाळा आहेत. आणि या साऱ्याचा सर्व पातळीवरचा शहाणपणाचा, समंजसपणाचा स्वीकारही आहे.

**– सुषमा जोशी**

## डॅशची कहाणी

**आ**पल्या मुलांवरच्या प्रेमाचं आपण मोजमाप करू शकतो का? त्याचं वर्णन करू शकतो का? 'प्रेम' या शब्दाखेरीज त्या उत्कृष्ट, दशांगुळं उरणाऱ्या भावनेचं कसं वर्णन करणार? आणि तेही वर्णन पूर्णांशानं करू शकू का? प्रत्येक वेळी मी माझ्या डॅशवरच्या प्रेमाचा विचार करते, त्या वेळी मला घुसमटल्यासारखं होतं. सगळे शब्दकोश निरर्थक वाटू लागतात. डॅश हा पंचेंद्रियांनी बनलेला, हाडामांसाचा, हवापाण्याची गरज असलेला होता. मोठे तपकिरी डोळे, लांबसडक पापण्या, दुधाळ रंग, नाकावरचं वांग, मऊ कुरळे केस, लांबसडक हात आणि प्रमाणशीर नखं. कोपरापर्यंत, धूळमातीने माखलेला असूनही डॅश हा देखणाच मुलगा वाटायचा. तान्हेपणीचा अंघोळीनंतरचा त्याचा स्पर्श इतका शांतवणारा होता की, अजूनही त्याची जादू वाटते. तो उत्साहाने, आनंदाने, सुखाने ओरडायचा. प्रत्येक ओरडा हा वेगवेगळा असायचा. गोष्टीच्या वेळचा त्याचा आवाज नादमधुर असायचा, तर त्याच्या सशाच्या ताटलीत त्याचं आवडीचं जेवण वाढलं की, त्याचा ओरडा वेगळाच असायचा. सुरुवातीला डेव्ह आल्यावर त्याच्या उत्साहाला येणारा ऊत पाहून मला खूप आनंद होई. डेव्ह कामावरून आला की हाक मारायचा. ''लिटिल बडी.''

''बिग डी.'' डॅश ओरडायचा.

डेव्ह कमरेत वाकायचा. सव्वासहा फूट उंचीचा डेव्ह निम्म्या उंचीचा व्हायचा. म्हणायचा, ''मित्रा, कसा गेला दिवस?''


''आम्ही पोहायला गेलो. मग ग्रॅनव्हिल आयलंडवर जाऊन हॅम-चीज-सँडविच खाल्लं.''

''व्वा! सगळा दिवस गेला म्हणायचा. माझ्यासाठी काही मस्ती ठेवलीस की नाही?''

''होऽऽ!'' मग दोघांची दंगामस्ती सुरू व्हायची.

**१५वी आवृत्ती**

# रंग मनाचे
## वपु




**लेखक** - वपु काळे

**किंमत : २००/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

प्रत्येक नव्या अनुभवाचं नातं - अंगावर काटा किंवा रोमांच उठवणाऱ्या केवळ एका क्षणाशी असतं. दुसऱ्याच क्षणक्ष तो अनुभव जुना झालेला असतो. तो क्षण आनंदाचा असो की दु:खाचा. प्रत्येक क्षणाचा, अनुभवाचा रंगही अलग आणि अनुभूतीही अलग. वेदनेच्या स्पर्शानं व्यक्तीनुरूप मनाच्या सप्तरंगाचं दर्शन घडतं. कधी वेदनेतून अत्युच्च मन:सामर्थ्याचं इंद्रधनुष्य झळाळतं, तर कधी निराशेच्या काळ्या रंगाचं साम्राज्य पसरतं. ज्या क्षणी हा वेदनेचा स्पर्श होतो, त्या क्षणातच बिजलीप्रमाणे मनाचे हे रंग झळाळून उठतात.

या मनाच्या विविध रंगछटांचं दर्शन वपुंच्या या पुस्तकातून घडतं. यातल्या प्रत्येक कथेतला वेदनेचा अंतस्त्रोत वाचकांना वेढून टाकतो. या वेदनेसह जगणाऱ्या मनस्वी व्यक्तींच्या मनस्वी कथा अंतर्मुख करणाऱ्या...

स्वत:लाच शोधायला लावणाऱ्या...

मी डॅशची तो तीस सेकंदांचा असल्यापासूनची सारी वाढपाहिली होती. पहिली पावलं, पहिला शब्द, पहिला प्रश्न ऐकला होता. त्यानं वस्तूला, भावनेला दिलेले प्रतिसाद बघितले होते. त्याला पोहायला, संगीताच्या वर्गाला नेलं होतं. बालवाडीत त्याला खेळताना प्रोत्साहन दिलं होतं. त्याच्यासाठी बिस्किटं भाजली होती. माझ्या कामासाठी उपयुक्त जेवणावळी, फॅशन शो अशा ठिकाणी तो माझ्याबरोबर येत होता. एक वर्षं आम्ही परदेशात होतो. तेव्हा इटालियन ग्रामीण भागातील भटकंतीच्या वेळी माझ्या पाठंगुळी बसला होता. माझा मुलगा मनानं चांगला होता, हे मला माहीत होतं. कोर्टात जेव्हा त्याच्यासाठी काय भलं, हे तो सांगू शकला नाही, तेव्हा मीच त्याच्याऐवजी बोलले होते. कारण मी त्याला ओळखत होते. एखाद्या आईची तिच्या मुलाबद्दलची माहिती, तिचं मूल तिच्यापासून दूर मोठं होतंय, म्हणून नाहीशी होत नसते. इतका काळ लोटला होता, तरी मला तो अल्फा तलावाच्या थंडगार पाण्यात उड्या मारणारा किंवा मॅकेंझी रस्त्यावरून स्केटबोर्डवरून भरारी मारणारा तरुण उत्साही मुलगा माहीत होताच. तोच मुलगा त्याच्या सोळाव्या वर्षी आमच्या वेस्टीबॉबी कुत्रीच्या नव्या पिलांशी अगदी हळुवार, कोमलपणे खेळत होता. त्याच्या मुखवट्यानं माझ्या मुलाला वरपांगी झाकलं होतं. आणि काहीही घडलं असलं, तरी त्याला कसं हसवायचं, माझ्यात कसं विरघळवायचं, हे मला ठाऊक होतं. अस्सल डॅश झाकोळला होता. पण तो होताच ना! आणि माझं सारं लक्ष माझ्या मुलावर होतं. त्याच्या बापानं निर्माण केलेल्या मुलावर नव्हे आणि तो मला तसा प्रतिसादही देत होता. इतक्या वर्षांत ती ज्योत काजळली होती मिणमिणत होती. पण उंच झोक्यावरून व्हीऽऽ ओरडणाऱ्या त्या लहान मुलाची पिवळी ज्योत अजूनही जळत होती.

डॅशच्या मृत्यूनंतरच्या त्या काळोख्या महिन्यात मी माझ्या मनातल्या रागाचा निचरा होण्यासाठी वेगवगळे मार्ग शोधत होते. मला काहीतरी शरीराला कष्ट देणारं काम हवं होतं. त्यामुळे मनातलं विष निपटलं गेलं असतं. डेव्हच्या सोबतीनं मी व्हँकूव्हरच्या अर्धमॅरेथॉन शर्यतीत भाग घेतला आणि त्या प्रशिक्षणाला सुरुवात झाली. मला पळण्याचा मनस्वी कंटाळा होता. तेच-तेच करत बसायचं. पण ते शरीराला कष्टप्रद होतं, म्हणूनच मी भाग घेतला. मी मनातला राग शांत करण्यासाठी राग, दुःख व्यक्त करणारी पत्र ब्रेनर आणि सिडर्गसनला लिहिली होती. (ब्रेनरनं तर उत्तरही धाडलं नाही. सिडर्गसननं एका ओळीत बोळवण केली.) आणि रडत राहिले. रडून-रडून माझे डोळे सुजले. माझा राग शमवण्यासाठी मला काम हवं होतं. मला त्या रागात रुतायचं नव्हतं. रागामुळे कटवट, सूड घेणारी व्हायचं नव्हतं. तो राग मला माझ्यातून निघून जायला हवा होता. मला निरोगी राहायचं होतं. माझ्यासाठी, मुलांसाठी, डेव्हसाठी आणि डॅशशी संबंध असलेल्या

साऱ्यांसाठी आणि ते मलाच करायला हवं होतं. एका दु:खसमुपदेशनाच्या बैठकीत कोल्बी म्हणाला होता, ''ममी, तू दु:खी तर आम्ही दु:खी. पण तू ठीक असलीस की, आम्हीदेखील ठीक.'' म्हणून डेव्ह आणि मी पळालो. मी तीन महिने स्वत:शीच रडत पळत राहिले.

माझ्या रागाचं, दु:खाचं काय होईल; हे मला, मी प्रशिक्षण घ्यायला सुरुवात केली, तेव्हा मुळीच ठाऊक नव्हतं. त्या पळण्यानं मला बरं वाटेल, माझ्या दु:खाचा निचरा होईल, या कशाचाही विचार न करता, मी बूट घालून पळण्याची तयारी करायचे. सर्जनात्मक निष्क्रियतेतच याची उपयुक्तता लक्षात आली. पळताना माझं मन मोकाट सुटायचं. ते काम करत नसायचं. गुंतागुंतीत अडकत नसायचं. ते फक्त असायचं. मनातल्या भावना पळताना बाहेर पडत असायच्या. त्या दु:खद असायच्या, कधी उचंबळणाऱ्या असायच्या. कधी पळताना मी शांतपणे आजूबाजूचं सौंदर्य डोळ्यात साठवत असायचे. समुद्राचा वास घ्यायचे. रस्त्याकडेची वेगवेगळी घरं निरखायचे, तर कधी दु:खानं मी हताश व्हायचे. पण मुठी वळवून तशीच पळायचे. मनात कैक काळापासूनचे प्रश्न उसळत असायचे; का? मी खूप केलं का? मला हे आधीच का दिसलं नाही? त्यादिवशी मी व्हँकूव्हरला असते तर तो माझ्याकडे आला असता का? मी त्याला पाचव्या, सहाव्या, आठव्या वर्षी बोलावलं, त्या वेळी त्याच्यावर दडपण आलं होतं का? मी आणखी जास्त वेळा बोलवायला; हवं होतं? कमी वेळा? मी त्याच्यासाठी कायदा मोडायला हवा होता? मला चाइल्ड ॲडव्होकेट आधीच का मिळाला नाही? मी कोर्टातच जायला हवं होतं? तो मला मिळेपर्यंत मी कोर्टात लढायला हवं होतं? मी जे करत होते, त्यावर विश्वास ठेवणारे व्यावसायिक, त्यांची मदत मिळेपर्यंत मी आंधळेपणानं खूप वर्षं काम केलं. एकटीनंच केलं. एकटीनंच सगळे निर्णय घेतले. फोन घ्यायचा की नाही? वकिलाशी बोलायचं की नाही, ॲसेंटमध्ये पाठवायचा. त्याच्या खोलीत त्याला पडू द्यायचा – हे असे विचार शिगेला पोहोचले की, मला रडू फुटायचं. डोळ्यासमोर त्याचं, नव्या वर्षांच्या दिवशी, पहाटे चार वाजता रस्त्यावर पडलेलं उबदार प्रेत दिसायचं. आजही मला, त्याच्या शरीराची ऊब जाणवली की, कळवळून येतं. सकाळी मुलांचे कपडे आवरताना, त्या कपड्यांतून मला मुलांच्या शरीराचा गंध, स्पर्श जाणवतो. आणि मनात डॅशचा विचार येतो – प्राण गेलेला, श्वास सोडलेला. पळणं ही दु:ख करायची माझी वेळ होती. दु:ख करायला तेव्हा मला मुभा होती. उत्तेजन मिळत होतं. दु:खाची पावती मिळत होती. पळणं संपवून मी घरी यायचे. अंघोळ करून कामाला लागायचे. मनातले राक्षस त्या दिवसापुरते हद्दपार व्हायचे.

त्या अर्धमॅरेथॉनच्या दिवशी वॉकमनच्या साहाय्याने हवा तसा वेग राखत,

डोळ्यांवर चढलेल्या गॉगल्समुळे अश्रू लपवत, मी अडीच तास धावले आणि अखंड रडले. माझे ओठ वेडेवाकडे झाले होते. आणि मला ठाऊक होतं की, मी चेहरा जरा जरी सैल केला, तरी माझं अवसान गळून जाईल; मी दु:खात बुडेन. मी नुकतीच बावन्न वर्षांची झाले होते. डॅश मरून साडेचार महिने झाले होते. मी दिवसभर पळत होते. शर्यती अखेरीस, माझ्या आधी अर्धा तास पळणं थांबवलेल्या डेव्हनं माझ्याभोवती चंदेरी ब्लँकेट गुंडाळलं. मला स्वत:लाच मी त्याच्यासाठी पात्र असल्यासारखं वाटलं; यशस्वी झाल्यासारखं आणि स्वच्छ, निर्मळ झाल्यासारखं वाटलं.

ऑगस्ट, २००४मध्ये पीटर हर्ट त्याच्या घरी मृतावस्थेत आढळला. त्या वेळी मी या पुस्तकाचा शेवटचा खर्डा तयार करत होते. पीटर कोर्टात हजर झाला नाही, म्हणून 'लॉ सोसायटी'नं त्याच्याशी संपर्क साधण्याचा खूप प्रयत्न केला. शेवटी त्यांनी कोणाला तरी त्याच्या घरी पाठवलं, तेव्हा पीटर मेलेला आढळला. त्याचा कुत्रा त्याच्याजवळ बसून होता. आठवड्यापूर्वी त्याचा मृत्यू झाला असावा. तो एकसष्ट वर्षांचा होता. त्याच्या मृत्यूची तारीख ११ ऑगस्ट लिहिली. डॅशच्या विसाव्या वाढदिवसानंतरचा एक दिवस.

हर्ट कुटुंबासोबत बराच काळ राहिलेल्या, डॅशचे अंत्यसंस्कार करणारा तो गृहस्थ मला हळूच म्हणाला, ''मी पीटरला दोन वर्षांची मुदत दिली होती. तो घसरणीला लागला होता. त्यानं काय केलं, हे त्याला कधीच उमजणार नव्हतं. आणि तो बराही होणार नव्हता. ज्याला आपलं मन खातंय, अशी गुन्हेगार व्यक्ती प्रेत पाहण्याचा आग्रह धरेल – जे पीटरनं केलं. मी त्याला ते पाहण्याची मनाई केली होती. पण तरीही तो गेलाच. तो आणि ग्रेग.''

केनच्या फोननंतर मी पीटरला फोन लावला होता. पीटर शवागारात जाऊन डॅशला पाहून आला होता. आणि मी तेथे जाणार होते, हे गृहीत धरून म्हणाला, ''तुला सांगतो, तो तितका वाईट दिसत नाही.'' या वाक्याचा काय अर्थ घ्यायचा? पीटर आणि डॅश यांच्यातला महत्त्वपूर्ण भाग त्यांची शरीरं मरण्यापूर्वीच मेला होता. १९८१मध्ये मी पीटरच्या प्रेमात पडले, कारण तो तेव्हा प्रेम करण्याजोगा वाटला. पण पुढच्या काळात भावनिक समस्या, दारू, नशा यांत त्या प्रेम करण्याजोग्या गोष्टी हरवून गेल्या. डॅशच्या मृत्यूनंतर काही महिन्यांनी माझ्या मानसोपचार तज्ज्ञानं मला सांगितलं, ''पॅम, ज्या बाळाला तू या जगात आणलंस, तो मुलगा खूप दिवसांपूर्वीच निघून गेला होता.'' त्याच्या शब्दांनी मला वास्तव स्वीकारण्याचा धीर दिला, सुखद आधार दिला.

डॅशच्या अंत्यसंस्काराच्या वेळी त्या धर्मोपदेशकानं मला सांगितलं, ''तू पीटरला क्षमा केली पाहिजेस, असं मुळीच नाही. आयुष्यात तुम्ही बऱ्याच गोष्टी

करू शकत नाही. ठीक आहे.'' मी पीटरला त्यानं डॅशचं जे काही केलं, त्याबद्दल कधीही क्षमा करणार नव्हते. मी केन वेस्टलेकला क्षमा करणार नव्हते. हात बांधले गेले होते, अशा न्यायाधीशांनाही क्षमा करणार नव्हते. कदाचित हे खूप लवकर म्हणत असेन. कदाचित हे घडणारही नाही. ठीक आहे. आपल्याला वाटचाल तर करावी लागते. डॅश हयात होता, तेव्हा मला नेहमी विचारलं जायचं, 'इतकी वर्षं तुम्ही कशा लढलात? तुम्ही इतक्या खंबीर कशा?' मी नेहमीच खंबीर नव्हते. खंबीर असेन, असंही नाही. पण माणसाचं मोठेपण त्याच्या यशात, जयात नसतं; तर तुम्ही अपयशाला, निराशेला कसे सामोरे जाता, तुम्ही कशाची निवड करता यावर असतं, तुम्ही दुसऱ्याला दोष देता की समजून घेता? तुम्ही कृतिशील बनता की निष्क्रिय? सूडबुद्धी बाळगता की करुणा? कडवटपणा की शांतता? मी शांतता निवडली. शांतता माझ्या घरासाठी, माझ्यासाठी, कुटुंबासाठी आणि या साऱ्यातून जे गेलेत, त्या सर्वांसाठी. डॅशला शांती मिळाली. पीटरलाही शेवटी शांतता मिळाली. मीही त्याच वाटेवर आहे.

मी एका देखण्या पशूबरोबर – रागाबरोबर राहते. तो माणसाळलाय, मी त्याला खतपाणी घातलं नाही, त्याला जिवंत ठेवण्याचाही प्रयत्न केला नाही. पण तो आहे. माझा एक भाग आहे. काही वेळा तो पिंजऱ्यात येरझाऱ्या घालतो. पण बऱ्याचदा कोपऱ्यात पडून असतो. अधूनमधून एक डोळा उघडून सुस्तपणे पाहतो. आणि कुठल्याशा आठवणीने हसतो. डॅशसाठी मी छोटी लढाई जिंकले तेव्हा किंवा मी त्याला ॲसेंटला घेऊन गेले तेव्हा किंवा आता चौदा वर्षांच्या कोल्बीला धीर देताना. कोल्बी फोटोग्राफी शिकतोय. त्याला ग्रॅनव्हिल पुलावर उभं राहून फोटो काढण्याची भीती वाटत होती. ''मला वाटतं की, तू हे आव्हान स्वीकारावंस आणि मनातल्या भीतीचा सामना करावास,'' पाच फूट सात इंच उंचीच्या माझ्या मुलाला कवेत घेत मी म्हणाले आणि हळूच कुजबुजले, ''हे बघ, मी तुला माझी सगळी शक्ती या मिठीद्वारे देत आहे. माझ्यातली शक्ती तुझ्यात आल्याचं तुला जाणवेल आणि त्या शक्तीची तुला सतत आठवण राहील. तू पुलावर असशील, तेव्हा तर ती तुला नक्कीच जाणवेल.'' नंतर कोल्बीनं फोन करून अभिमानाने सांगितलं, ''मॉम, मी केलं.''

आपण पुढे जातच असतो. गेल्या पंधरा वर्षांच्या अनुभवानं मी शिकलेय की, कह्यात ठेवलेल्या निकोप रागामुळे आपल्याला आतूनच एक बळ मिळत असतं. आणि आपण ते बळ सत्कारणी लावत असतो. असं सकारात्मक परिणामाचा विचार करणारं बळ स्त्रियांच्या चळवळीला इंधन पुरवत असतं. साऱ्या जगभर चालणाऱ्या सामाजिक न्यायाच्या लढ्यासाठी ताकद पुरवत असतं. बदलासाठी ताकद लागते. शांततेसाठी ताकद लागते. पण पशूला शांत करता येतं. आणि ते

करण्याचा मी प्रयत्न करते आहे. काही वेळा त्यातही अडचणी येतात. मोडून पडण्याची वेळ येते. पण माझ्या आत्म्याच्या पिंजऱ्यातल्या काठीवर शांतता येऊन बसली आहे. आणि ती जागा वाढते आहे.

आपल्या निकटवर्तीयांच्या, अगदी आपल्या मुलांच्या मृत्यूमुळे आपण आपल्या जगण्याबद्दल विचार करू लागतो. अधिक सजग होतो. डॅशच्या मृत्यूमुळे मी अधिक चैतन्यशील बनले. मला माझ्यातच एक सावधपण, कोणाला न समजणारं एक भान आल्यासारखं वाटलं. आयुष्याच्या क्षणभंगुरतेबद्दल मी जास्त संवेदनशील बनले. क्षणभंगुरतेचा सन्मानही करू लागले. आणि डॅशच्या मृत्यूनं काही गोष्टींत लगेच बदल होतो, हेही शिकवलं. मी कोर्टात घालवलेला वेळ, डॅशच्या घ्यायच्या भेटी किंवा एकांतात रडत बसलेली मी या सगळ्या गोष्टींनी, माझ्या कुटुंबासाठी द्यायचा माझा खूप वेळ खाल्ला; याची मला जाणीव आहे. त्यांना माझ्या गैरहजेरीमुळे, तसंच माझ्या दु:खाला ते काही आवर घालू शकत नाहीत, या त्यांच्या अगतिकतेमुळे त्यांना खूप सोसावं लागलं, याचं मला पूर्ण भान आहे. डेव्हनं ज्या बाईशी लग्न केलं, तिच्या यातना दूर करण्यासाठी त्याला काही करता येत नव्हतं, ह्या वेदना तर सोसल्याच; शिवाय त्याला खूप पैसा कोर्टात ओतावा लागला. मला माझ्यासाठी आणि डॅशसाठी खंबीर, कणखर राहायचं होतं; पण त्यांच्यासाठीही तितकंच खंबीर असायला हवं होतं. या सगळ्या कोर्टबाजीच्या वर्षांनी माझ्या कुटुंबाकडून खूप मोठी किंमत वसूल केली. डेव्ह आणि मी यांबाबत फारसं बोलत नाही. पण आम्ही दांपत्य म्हणून या साऱ्यात टिकून राहिलो, तगलो; ही भावना आम्ही प्रेमानं जतन करत असतो. माझ्या पीटरशी झालेल्या लग्नापासून डॅशच्या मृत्यूपर्यंतच्या अनुभवानं मला कशाची निवड करावी, हे शिकवलं. मी कुटुंबाची निवड केली. मी प्रेमाची निवड केली.

मी वेगवेगळ्या सात शाळांत शिकले. कुठेही मी मोठ्या आत्मविश्वासाने वावरायचे. तिथे गेले की, मी सगळ्यांना आवडावे, अशी माझी धडपड चालायची. पण आता मला कळलंय की, सगळ्यांनाच मी आवडेन, असं नाही. आणि आता ते ठीक आहे. मला जे करता येणं शक्य आहे, तेवढं मी केलं. मी खूप प्रयत्नही केले. डॅश हा दुरावलेला मुलगा होता, हे मला सिद्ध करावं लागलं नाही – फॅमिली ॲडव्होकेटला ते ठाऊक होतं आणि वर्षभर चाललेल्या केसतपासणीनंतर कॉरोनारच्या तपासनिसांनी त्यावर शिक्कामोर्तबही केलं. (जरी खात्यानं तो अहवाल 'पालकाकडे बोट दाखवू नये,' असा बदलला असता तरी!) कॉस्टकोमध्ये एकदा मला डॅशची सातवीची शिक्षिका डोना ॲण्ड्र्यूझ भेटली होती. ती म्हणाली, ''डॅशनं आत्महत्या केली, याबद्दल कुणालाच नवल वाटलं नाही.'' मलाही नवल वाटलंच नव्हतं. मला या गोष्टीचं खूप वर्षं भय वाटत होतं. ते होऊ नये, यासाठी मला अजून


वेळ हवा होता, असं मला वाटायचं. माझ्या चुका मला अल्सरसारख्या सलत होत्या. मी काय करायला हवं होतं? त्याला पळवायला हवं होतं का? तसं असेल, तर मी त्याला तो ज्याच्यावर प्रेम करत होता, अशा पालकापासून हिरावून घेतलं असतं. आता मी असं होऊ देणार नाही. पुढच्या वेळी माझ्या मुलांना घेऊन मी पळून जाईन – ऑस्ट्रेलिया, फ्रान्स आणि नाहीशी होईन. डॅशच्या बाबतीत अपयशी ठरलेल्या न्यायव्यवस्थेकडे कधीही वळणार नाही. पंधरा वर्षांच्या अनुभवाने माझा निष्पापपणा हिरावून घेतला. इतरांशी चांगलं वागा. तेही तुमच्याशी चांगले वागतील. खरं सांगा – तुमचं म्हणणं ऐकलं जाईल. कोर्टात मदत मागा, तुम्हाला मदत मिळेल. माझा विश्वास होता की, इतर कोणत्याही बाबीपेक्षा मुलांचा विचार प्राधान्याने होईल. माझा विश्वास होता की, न्यायाधीश धीट आणि शहाणे असतील. आणि माणसंही त्यांच्या कोशातून बाहेर येऊन, एखादा मुलगा धोकादायक परिस्थितीत असेल, तर त्याबद्दल मोकळेपणे बोलतील. पण सल्लागार म्हणून काय करतोय. आणि तिने आपल्या दुरावलेल्या मुलांबरोबर कोणीही उघडपणे सांगत नाहीत, ''मी हे पाहिलंय. मी काही केलं नाही.''

आमची निकटवर्ती, पीटरची बहीण सँड्रा स्कार्थ – डॅशच्या अंत्यसंस्काराच्या वेळी माझ्याजवळ आली. ''मला वाईट वाटतं.'' म्हणाली. सँड्रा चिल्ड्रेन सर्व्हिस या ओटेरिओतील मिनिस्ट्री ऑफ कम्युनिटी अँड सोशल सर्व्हिसच्या शाखेची संचालक होती. १९८९मध्ये पीटरला तात्पुरती कस्टडी मिळाली, तेव्हा ती त्या पदावर होती. त्या वेळी तिनं पीटरच्या उत्तम पालकत्वाबद्दल फर्डी ॲफिडेव्हिट लिहिली होती. तिनंच डॉ. एल्टरमनला पीटरपेक्षा मीच जास्त दारू पिते, असं सांगितलं होतं. ही एक मजेशीर माहिती होती. कारण पीटरबरोबरच्या आठ वर्षांच्या माझ्या वैवाहिक काळात आमच्या अगदी क्वचित भेटी होत होत्या. ती नंतर व्हँकूव्हर आयलंडमध्ये राहू लागली. आणि डॅशच्या मरणापूर्वीच्या सहा महिन्यांच्या काळात ती पीटरकडे होती. मी तिला पीटरच्या स्वयंपाकघराच्या खिडकीतून डॅशला त्याच्या घरी सोडताना बऱ्याचदा पाहिलं होतं. तिथं जे काही होत होतं, त्यात तो कसं निभावत असेल, याचंही तिला नवल वाटलं होतं. डॅशच्या अंत्यसंस्काराच्या वेळी मी तिला काकुळतीनं विचारलं, ''तू मला फोन का केला नाहीस? काय चाललं होतं, हे का सांगितलं नाहीस? तुला तर काय घडतंय हे ठाऊक होतं ना?'' ती रडू लागली. म्हणाली, ''तुझं बरोबर आहे... तुझं बरोबर आहे.'' नंतर खालच्या आवाजात मला म्हणाली, ''मी तुझ्याशी नंतर बोलेन.'' पण पीटर ओरडला. ''नाही, तू फोन करायचा नाहीस.'' आणि तिनं फोन केला नाही.

एखाद्या निष्पाप मुलाचा मृत्यू स्थितपज्ञ वृत्तीनं सहन करणं अत्यंत कठीण असतं. समाजातला एखादा मुलगा असा गरजू असणं, म्हणजे तो समाज काही

६वी आवृत्ती

# खुश खरेदी




**लेखक - शंकर पाटील**

**किंमत : १००/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

बाबू चांगलाच कर्जबाजारी झाला. तवनाप्पाचे घेतलेले दहा हजार रुपये कशानं फेडायचे हे कळेना झालं. अखेर यावर पंचायत बसली आणि सगळ्यांनी मिळून असं ठरवलं, बाबूनं हे हॉटेल कर्जापोटी तवनाप्पाला लिहून द्यावं आणि तवनाप्पानं त्यात आपलं कर्ज वळतं करावं, इतरांचीही देणी भागवावीत आणि एक-दोन हजार रुपये बाबूला रोख द्यावेत.
पंचायतीत ठरल्याप्रमाणे सगळ्या गोष्टी नमूद करून पक्का कागद केला. रोख रुपये दोन हजार घेऊन खुशखरेदी लिहून दिली. हॉटेलची मालकी तवनाप्पाकडे आली. सगळ्या फर्निचरसह, सगळ्या वस्तूंसह हॉटेल ताब्यात देऊन बाबू मोकळा झाला. कुणाच्यातरी व्यवस्थेखाली 'स्वल्पविराम' हॉटेल तवनाप्पा चालवू लागला आणि बाबूनं रोख मिळालेल्या पैशात जवळच दुसरं हॉटेल खोललं. असे आठ-पंधरा दिवस गेले आणि गावात जे अतिशहाणे चार लोक होते, त्यांनी एक नवीच शक्कल काढली.
त्यांनी तवनाप्पाला शिकवलं– ''तू हॉटेल घेतलंस, पन बाई का सोडलीस?''

अवास्तव होत नाही. कुटुंबकोर्टात न जाणं म्हणजे काही जुगार नाही. माझे काही अर्धवट डावपेच आणि काही चुकीचे निर्णय – तसे ते असतीलच – त्यामुळे डॅश मरणपंथाला लागला नव्हता. मी जर डॅशचा सॉकर खेळ पाहणं थांबवलं असतं, जर मला अधिक चांगला वकील मिळाला असता, जर मी नमतं घेणारी अॅक्सेस पालक असते किंवा खंबीर असते, जर मी कोर्टात उंच टाचेचे बूट घालून गेले असते की सपाट; या जर-तरचा कसलाच परिणाम झाला नसता. न्यायाधीशांनी त्यांची खुर्ची बाजूला सारून सर्वश्रेष्ठ पालकाची भूमिका योग्य तऱ्हेनं निभावायला हवी होती. त्यांच्याखेरीज बाकी कुणीच हे करू शकणार नव्हतं.

दरम्यानच्या काळात माझ्या या असह्य आणि वैयक्तिक अनुभवातून इतरांसाठी काही चांगलं, मार्गदर्शक करण्याचा मी प्रयत्न करतेय. कुटुंब, मित्रमंडळ आणि परक्यांनीदेखील माझी कहाणी ऐकली आणि ते बदलासाठी त्यांच्या-त्यांच्या पद्धतीनं – तयार झाले. अनुकूल झाले. मग ते जेवण्याच्या टेबलाबद्दल असेल किंवा माजी जोडीदाराबद्दलच्या नात्यासंबंधी असेल. डॉ. पेगी बॉर्ड पालकांच्या दुराव्याने उन्मळून पडलेल्या मुलांबद्दल काम करतेय. कॅथरिन मेयर या विषयावर गेली दहा वर्षं जसं आपले संबंध पुनर्स्थापित केले आहेत. आमचा एक गट आहे. आणि आम्ही समाजात राहतो. समाजातच काम करतो.

जर तुम्ही मला विचारलं असतं की, आपल्या मुलाच्या आत्महत्येनंतर व्यक्ती कशी तग धरील, तर माझं पहिलं उत्तर 'नाही' तग धरणार, असंच असतं. पण आपल्याला वाटचाल तर करावी लागते, निवड करावी लागते. जसं जगावं की लपावं, दुःख बाजूस सारावं की अभिमानानं मिरवावं, पुढे चालावं की अर्धांगाचा झटका आल्यागत मोडून पडावं – धर्मोपदेशकानं मला डॅशच्या अंत्यसंस्काराच्या वेळी सांगितलं, ''पॅम, दिवसाचे चोवीस तास तुम्ही दुःख करू शकत नाही. ते कठीण आहे. म्हणून दुःख जरूर करा. त्यासाठी वेळ द्या. आणि नंतर ते बाजूस सारून दिवसाला सामोरं जा. रोजचं काम सुरू करा.'' या सांगण्यामुळे सुटल्यासारखं वाटलं. एक मित्र म्हणाला : 'आता डॅश एका चांगल्या जागी असेल, असा आपण विश्वास ठेवू या.'' आणि मी विश्वास ठेवला. गावातून फिरताना मला डॅश जागोजागी दिसतो. रोजच्या दिनक्रमात मी, आम्ही जिथे जात होतो त्या जागा, त्या बागा, ती दुकानं येथून जा-ये करत असते. कित्येक वर्षं माझी मुलं, डॅश ज्या मैदानावर खेळत होता, तिथेच सॉकर खेळत होती. रोज सकाळ-संध्याकाळ मुलांची शाळेत ने-आण करताना आम्ही रोज डॅशच्या लालविटांच्या, गोल मनोरा असलेल्या शाळेवरून जात असतो. मला मी त्याची भेट घेण्यासाठी कशी तडफडत असायची, ते आठवत. त्या मुलाच्या भग्न बालपणाचे अवशेष मी कसे कवटाळले, ते माझ्या शरीराला आठवतं. पण या दुःखाबरोबरच त्याच्याबरोबर घालवलेले सुखाचे सोनेरी क्षणही तेवढ्याच लख्खपणे आठवतात. आणि मला त्याचे कुरळे

केस, तपकिरी डोळे, मोकळं हसू आणि उबदार आनंदी डॅश आठवत राहतो. त्याचं हसू ऐकू येतं. विनोदावर आम्ही केलेला खळखळाट, सोफ्यावर सगळे मिळून गुरफटून घेऊन पाहिलेला टीव्ही आठवतो. चांदण्या पाहत घालवलेल्या अनेक संध्याकाळ आठवतात. आणि मला तो दिसत राहतो. आपल्या अंगठाबोटांना वळवून तो हृदयाचा आकार करत असतो. तो लहान असताना, 'मी प्रेम करतो' हे सांगणारा आणि निरोप घेतानाचा हृदयाचा आकार तो करत असे. डॅश आता चांगल्या जागी असेल. त्याला शांती मिळाली, अशी मी आशा करते. मी सगळ्यांसाठीच शांततेची आशा करते.

❖


**९वी आवृत्ती**

# जुगलबंदी




लेखक - **शंकर पाटील**

**किंमत : १००/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

"मी बोलतोय, आलं का ध्यानात!
एक आयडिया सुचलीया,
तीन-चार दिवस वर्गाची
सहल काढगं!
मला वाटतं, गोव्याला गेलं तर?
तुम्ही दिवसभर समुद्र दाखवत हिंडायचं,
रात्री मुक्काम सम्राटवर करायचा."

# स्मरण



## इंदिरा संत

मराठी भावगर्भ कवितेचा 'शेला' आपल्या शब्दलाघवाने सहजपणे विणला कवयित्री इंदिरा संत यांनी.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात इंदिरा संत यांनी संवेदनशील अंतःकरणाने आपले अवघे भावविश्व प्रकट केले. आपल्या कवितेच्या निर्मितिप्रक्रियेविषयी इंदिरा संतांनी म्हटले होते, ''कविता लिहिताना कुणाच्या कवितेचं अनुकरण करावं, असं मला त्या वेळी वाटत नसे. कविता लिहावीशी वाटली तरच ती लिहिली जाते, अशी माझी सवय आहे. कवितेसाठी मी विषय मुद्दाम शोधत नाही. ज्या ज्या अनुभवातून आणि परिस्थितीतून जाताना काही विशिष्ट अनुभूती मनाला प्रतीत होतात आणि मग पुष्कळ दिवसांनी ती अनुभूती कवितेत व्यक्त होते. मी अगदी शाळेत असल्यापासून कविता करायला लागले खरी; पण कवितानिर्मितीचा म्हणून जो काही आनंद मला लाभला, तो मात्र १९३२ नंतरच. तोपर्यंत कविता रचणे, हा माझा एक खेळ होता.''

सत्य सांगायचे झाले तर बहिणाबाई चौधरी या कवयित्रींनंतर, कवितेमधले अनुभवाचे साधेपण तरीही जिवाला डसणारे भाष्य इंदिरा संतांच्या एकूणच कवितेत सहजपणे, वेलीवरल्या सुंदर फुलांसारखे लगडून

आल्याचे जाणवल्याशिवाय राहत नाही.

इंदिरा संत यांचा कालखंड आहे ४ जानेवारी १९१४ ते १३ जुलै २०००. तवंदीसारख्या एका खेड्यात बालपण घालवलेल्या इंदिराबाईंनी शिक्षणाच्या निमित्ताने, नोकरीच्या निमित्ताने खूप प्रवास केला. त्यांचा संसार चैतन्यमयी होता. परंतु त्यांचे पती आणि नामवंत कवी ना. मा. संत यांच्या आकस्मिक निधनाने ऐन तारुण्यातच त्यांच्या चैतन्यदायी आयुष्यावर सावट पडले. आयुष्याचा बहरच संपला. केवळ कवितेच्या सहवासातच इंदिराबाईंनी नंतर नव्याने मोहोरण्याचे क्षण प्रत्यक्ष अनुभवले. कवितेतून इंदिराबाईंनी निर्माण केलेली, हवीहवीशी वाटणारी दुजी सृष्टी आणि दुसऱ्या बाजूला वास्तव जीवनातले दुःखचटके यांतूनच त्यांचे एकूण अंतर्विश्व प्रकट होत राहिले.

आपले ओझे आपणच व्हायचे असते,
आपले दुःख आपणच सोसायचे असते,
आपली वाट आपणच हेरायची असते,
आपली पावले आपणच चालायची असतात,
शेवटी शेवटी ओझ्याचा बधिर क्रूस होतो...

इंदिरा संतांनी 'आपले ओझे' या छोट्याशा कवितेतून मानवी जीवनातले अटळ सत्य अधोरेखित करताना, आपल्या एकूणच आयुष्याचा, दुःखाचा हिशेब मांडला आहे. बेळगावात आपले निवांत आयुष्य एकटेपणाने अनुभवत, केवळ कवितांच्या सोबतीने घालवले. वाङ्मयीन विश्वातले वाद, वैरभाव, द्वेषवृत्ती यापासून त्या आयुष्यभर अलिप्तच राहिल्या. आपल्या व्यक्तिगत जीवनाला साहित्य विश्वातल्या अंगणात त्यांनी कधीच येऊ दिले नाही. त्यामुळेच की काय, कवी शंकर वैद्यांनी एके ठिकाणी म्हटले होते, 'इंदिराबाईंची कविता म्हणजे कवितेच्या प्रांगणातील तुळशी वृंदावन आहे.' अत्यंत तरल शब्दकळेचे जणू हे अप्रतिम वर्णनच आहे.

मंगेश पाडगावकर यांनी म्हटले होते- ''इंदिरा संत यांची कविता वेगळी आहे, कारण ती अंतःस्फूर्त आणि स्वाभाविक आहे. स्त्रीगीतांच्या संस्कारांतून इंदिराबाईंच्या कवितेला जाग आली. पण हे वळण ती गिरवीत बसली नाही.

आपले भावविश्व अत्यंत संवेदनशीलतेने न्याहाळीत ती उत्कट आत्मनिष्ठेने अनुभवांची अनेक रूपे शोधत राहिली. आत्मनिष्ठा आणि आत्मकेंद्रितता यांतला फरक या कवितेला सहजपणे समजला होता. जे सांगता येत नाही ते शब्दांमध्ये पकडण्याचा तिने ध्यास बाळगला. जीवनाल्या संघर्षांना सामोर जात रक्ताचा जाळ, दुःखाची गडद लाट ती झेलीत राहिली.''

फारसे स्वास्थ्य न मिळाल्यामुळे कदाचित असेल, संघर्षमय आयुष्यावर इंदिराबाईंची अधिक श्रद्धा जडत गेली. जगण्याचे सार्थक करणारे संघर्ष मानवी आयुष्याला अटळपणे भिडतात. यावर निष्ठा ठेवून इंदिराबाईंनी आपली कविता आकाशातल्या शांत आणि देखण्या चांदण्यासारखी फुलवत ठेवली.

'शेला' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह आणि 'निराकार' हा अखेरचा कवितासंग्रह. त्यांच्या सुरुवातीच्या कविता, त्यांचे पती ना. मा. संत यांच्या कवितासंग्रह 'सहवास' मधून प्रकाशित झाल्या होत्या. त्यानंतर इंदिराबाईंचे दहा संग्रह प्रकाशित झाले. पन्नास वर्षांहून अधिक काळ त्यांनी प्रामुख्याने कविताच लिहिल्या आणि मराठी काव्यविश्व समृद्ध केले. 'गर्भरेशीम' या त्यांच्या संग्रहाला 'साहित्य अकादमी'चा मानाचा पुरस्कार लाभला होता. राज्य पुरस्कारसुद्धा त्यांच्या संग्रहांना लाभले होते.

एक एक चोच का ही अशी चालली मिटून?
एक एक झंकार का असा जातो मावळून?
स्वरावली होत गेली सखी आणि मुकी मुकी,
डोलणाऱ्या घंटिका का नादशून्य एकाएकी?
असे एक शून्याकार विश्व माझें आकारतें,
नाद-ब्रह्मांड अवेळी असें अस्ताला टेकतें...
वाट पाहून पाहून थवे शब्दांचे निघाले,
एका अमृतकणाला रेखारूपांत देखिले.
नाद ब्रह्मांडाच्या सूर्या, जाई अस्ताला खुशाल,
मंद चांदण्याने माझें विश्व भरून राहील...

– वामन देशपांडे
डोंबिवली (पूर्व)
९३२४६१५०७७

**१५वी आवृत्ती**

# तप्तपदी

## वपु




**लेखक - वपु काळे**

**किंमत : १५०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.**

वधूने शालू नेसलेला असतो.
वराने उपरणं पांघरलेलं असतं.
त्यामुळे ते उपरणं तो केव्हाही उतरवू शकतो.
वधूला ते उपरणं गाठीसकट सांभाळावं लागतं.
ते उपरण्याचं ओझं झटकून टाकायचं तिने ठरवलं
तर अजूनही ह्या समाजात तिला
जबर किंमत मोजावी लागते.

‘सखा सप्तपदी भव’– एका ओळीच्या ह्या
अष्टाक्षरी कवितेतल्या ‘सखा’ ह्या शब्दाचा अर्थ
ज्या ज्या पुरुषांना समजला,
त्या त्या संसारांच्या बाबतीत
सात पावलांनी स्वर्ग पृथ्वीवर अवतरतो.
उरलेल्या संसारांची ती
तप्तपदीच!

**५वी आवृत्ती**

# हस्ताचा पाऊस




लेखक - **वि. स. खांडेकर**

**किंमत : १२०/-रु.  पोस्टेज : ५०/-रु.**

अरविंदाला कुंदेच्या नि आपल्या एकान्तातल्या पहिल्या भेटीची आठवण झाली. त्या रात्री मृगाचा झिमझिम पाऊस सुरू झाला होता. त्याला वाटले, प्रीतीचे रूप त्या पावसासारखे असते.
- आणि तिचे दुसरे रूप.... त्या दुसऱ्या उत्कट रूपाचे दर्शन त्याला आजच प्रथमतः झाले. त्याला वाटले, हे दुसरे रूप हस्ताच्या पावसासारखे असते.
.... हा पाऊस अगदी अचानक येतो, ऊन तापून-तापून जीव नकोसा झाल्यावर येतो. पण हजार हत्तींच्या सोंडांनी पाणी शिंपून तो तापलेल्या पृथ्वीला घटकाभरात शांत करतो.

६वी आवृत्ती




# संभ्रमाच्या लाटा

**लेखक - रत्नाकर मतकरी**

**किंमत : १४०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.**

काळोखातून आपल्याच दु:खाची वाट चालत नंदिता स्मशानभूमीत येऊन पाहोचलेली. लांबवर एक चिता जळत असलेली. तिचा अंधुक उजेड सगळीकडे पसरलेला. तोही मधूनमधून कमीजास्त होत असलेला. धाप लागल्यासारखा. इथेच-इथेच तो आला! सैरभैर ती त्याला शोधते. हे सगळे हरवलेल्यांचे जग! इथे कोण कुठे, अग्नीचे पांघरूण लपेटून चिरनिद्रा घेता घेता नाहीसे झाले, ते कसे कळणार? पण नाहीसे झाले म्हणजे सर्वत्र पसरले... पंचमहाभूतात मिसळले... म्हणजे इथेच-इथल्याच कणाकणात तो आहे... आणि नाहीही... नंदिता भ्रमिष्ट होऊन गेली...

घाटाच्या पायऱ्या उतरून ती गंगेच्या पाण्याजवळ उभी राहिली... पाणी पंचमहाभूतांपैकी एक. नंदन यातही मिसळला असेल का? मला त्याच्याबरोबरच पंचमहाभूतात विलीन होता येईल का? का नाही येणार?... समोर पसरलेले हे पात्र... काळोखाचे रहस्य घडणारे हे दार... मी या दरातून आत गेले, तर काळोखात मिसळलेल्या नंदनशी माझी भेट होईल...?

रत्नाकर मतकरी यांच्या विलक्षण वर्णनशैलीने नटलेल्या, वास्तव आणि त्या पलीकडचे वास्तव, यांच्यातील धूसर सीमारेषेवरच्या गूढकथांचा हा संग्रह.



# बालनगरी

## पत्राचा प्रवास आणि इतर कथा

शनिवारचा दिवस. सकाळची शाळा. चंदा गडबडीनं शाळेत निघाली होती. तेवढ्यात शेजारच्या काकूंची हाक.



"चंदा, एक काम सांगू?"

"म्हणजे काय काकू, हक्कानं सांगायचं." चंदा म्हणाली. काकू त्यावर कौतुकानं हसल्या. नाही तरी चंदाचं म्हणणं खरंच होतं. घरात काका अन् काकू दोघंच असल्यामुळे त्यांची लहानसहान कामं बरेचदा चंदा



करायची. चंदा खरंच गुणी मुलगी. मोठी लाघवी. काकूंना खूप आवडायची. त्यांना चंदाची नेहमी मदत व्हायची. आता बारा तेराच्या वयात असतो तसा ती एकेकदा वेंधळेपणाही करायची. पण चालायचंच असं काकू म्हणायच्या. आत्ता काय काम होतं काकूंचं?

''हे बघ- शाळेला जाताना एवढं पत्र पेटीत टाकायचं. उद्या रविवार. पोस्टाची सुट्टी. अन् आम्ही तर आता अकराच्या एस.टी.ने गावी निघालो.'' काकूंनी काम सांगितलं.

''काकू, कोकणात तुम्ही दोन-तीन महिने राहणार ना? आम्हाला खूप आठवण येईल तुमची दोघांची.'' चंदा म्हणाली.

''पत्र लवकर पडलेलं बरं ना. म्हणून मुद्दाम तुझ्याजवळ देतेय.'' काकू.

''हो! मी टाकते ना जाता जाताच. बरंय! अच्छा!'' म्हणून चंदानं ते पत्र दप्तरात नीट व्यवस्थित ठेवलं, अन् ती शाळेकडे निघाली. थोडी पुढे गेली न गेली तोवर मैत्रिणी भेटल्या. गप्पाटप्पा, टिवल्या-बावल्या करत सगळा घोळका एकदाचा

शाळेत पोहोचला. मग प्रार्थना, शनिवार म्हणून कवायत, मग अभ्यास. या सगळ्यांत चंदा पत्राचं पार विसरूनच गेली!

दुसरे दिवशी गृहपाठ करताना तिला दप्तरात ते पत्र दिसलं. त्यावेळी ती एकदम वरमली. पण तरीसुद्धा मनात म्हणाली-

''विसरलेय खरं. पण नाही तरी आज रविवारच आहे. टपाल पेटी उघडणारच नाही. उद्या सोमवारी ते नक्की टाकते.'' पण सोमवारच काय मंगळवारसुद्धा तसाच गेला. शाळा सुटल्यावर चंदाच्या लक्षात आलं अन् बुधवारी पुन्हा पोस्टाला कसली तरी सुट्टी! आता मात्र चंदा एकदम ओशाळी होऊन गेली. तिला स्वतःचा राग आला. काय करावं सुचेना. काय बरं करावं असा ती स्वतःशी विचार करू लागली. अन् एकदम तिला वाटलं- खरंच, हे पत्र सारिकाजवळ टाकायला द्यावं. तिचं घर मुख्य पोस्टाच्या समोरच तर आहे. तिथून निदान आज शेवटच्या डाकेला तरी निघेल.

चंदानं ते पत्र सारिकाजवळ दिलं अन् पेटीत नक्की टाकण्याबद्दल बजावून सांगितलं.

''होय गं माझे आई, नक्की टाकते बरं. काळजी करू नकोस.''

सारिकानं तोंड भरून हो म्हटलं खरं. पण ती चंदाचीच मैत्रीण- तिच्या सवाई विसरभोळी! मुख्य पोस्टात पत्र टाकायचं- पण ती तो विषय सपशेल विसरली. झालं. दुसरे दिवशी पोस्टाला सुट्टी. शाळेलाही सुट्टी. म्हणजे त्या दिवशीचा तरी प्रश्न मिटला. पण- पण गुरुवारी किंवा शुक्रवारीसुद्धा पट्ठीच्या लक्षात आलं नाही. कसं येणार? लक्ष सगळं आजोळी लागलं होतं ना. अन् शनिवारी तर बाईसाहेब पसार



झुकझुकगाडीतून मामाच्या लग्नाला! मामाच्या लग्नापुढे इतर कामाचं काय विशेष? शाळासुद्धा बुडवली सारिकानं चार दिवस. या तिच्या प्रवासात पत्र राहिलं दप्तरातच.

गावाहून आल्यावर दुसरे दिवशीची गोष्ट. सारिका शाळेतून परस्परच चंदाकडे गेली होती. चार दिवस शाळा बुडली होती. तेवढ्यात अभ्यास काय काय झाला, गृहपाठ काय दिला, सगळं लिहून घ्यायचं होतं ना. त्या शिवाय शाळेत काय काय मजा झाली, अन् मामाचं लग्न किती थाटात झालं, हेही सगळं बोलायचं होतं. त्यात दीड तास सहज गेला. अन् वह्यापुस्तकं दप्तरात ठेवताना सारिकाला पुन्हा ते पत्र दिसलं. त्याबरोबर तिनं जीभ चावली. अन् म्हणाली- ''व्हेरी व्हेरी सॉरी चंदा. पत्र तसंच राहिलं बघ. ए, आता हे मी तुझ्याच जवळ देते. परत विसरलं तर आणखी गोंधळ.'' असं म्हणून सारिकानं निरोप घेतला.

सारिकानं ते पत्र चंदाकडे परत दिलं. तो शुक्रवार होता. म्हणजे उद्या पंधरा दिवस होतील- काकूंनी मला पत्र टाकायला दिलं त्याला! चंदा मनाशी हिरमुसली. स्वतःच्या चुकीची तिला अगदी लाज वाटत होती. हातात पत्र धरून ती त्याच्याकडे



बघत राहिली. हे सगळं चंदाच्या खोलीत चाललं होतं. आईला काही माहीतच नव्हतं आणि आता तो विषय घरात सांगायचा चंदाला धीरच होईना.

या पंधरा दिवसांत ते अंतर्देशीय पत्र चुरगळून गेलं होतं. थोडंसं मळलंही होतं. हाताला दमट, ओलसर लागत होतं. ''हुंऽऽ! सारिकाच्या दप्तरात वॉटरबॅगचं पाणी लागलेलं दिसतंय. वेंधळी आहे नुसती.'' असं मनाशी म्हणत चंदानं पत्र उलटं पालटं केलं. काकूंकडून चंदाकडे, चंदाकडून सारिकाकडे अन् सारिकाकडून परत चंदाकडे असा पत्राचा प्रवास चालला होता. अन् इतकं होऊनही पत्राची गाडी अजून स्टेशनातच होती!

आता चंदाला त्या पत्राशिवाय काही सुचेना. तिला त्या क्षणी वाटलं की आत्ताच जाऊन ते पेटीत टाकून यावं. पण घरापासून टपालपेटी जरा लांब होती. आई काही यावेळी बाहेर जायला परवानगी देणार नाही. उलट ओरडेल- ''सारिकाबरोबर गप्पा झाल्या ना एवढा वेळ? आता

अभ्यासाला बस.'' चंदा मग त्या पत्राकडे बघत राहिली.

पत्त्यावर नाव होतं. शिरीष कुलकर्णी. शिरीष कुलकर्णी म्हणजे टीव्हीवरचे प्रसिद्ध नट. काकूंचं अन् त्यांचं काही तरी नातं होतं. त्यांची बायको रजनी काकूंकडे कधी कधी येते. मागच्या महिन्यातच आली होती. काकूंनी चंदाला मुद्दाम बोलावून तिच्याशी ओळखसुद्धा करून दिली होती. खूप छान गप्पा झाल्या होत्या. चंदाला आता हे सगळं आठवलं. तिनं उगाचच ते पत्र हातात धरून ठेवलं. पुन्हा उलटं पालटं केलं.

आणि काय आश्चर्य? काकूंनी अंतर्देशीय नीट चिकटवलं नव्हतं की पाणी लागल्यामुळे डिंक निघाला होता? काय झालं होतं कुणास ठाऊक. ते पत्र अगदी एकदम उघडंच होतं! तिला आठवलं, एकदा आत्याचं पत्र आलं होतं. अंतर्देशीय. ते असं उघडंच होतं. आता एवीतेवी उघडंच आहे तर वाचावं काकूंचं पत्र असं चंदाला वाटलं. पण छे. असं दुसऱ्याचं पत्र चोरून वाचणं चांगलं नाही. काय बरं करावं? वाचावं की नाही? चंदाची नुसती चलबिचल चालली होती.

पण मग तिला वाटलं, आपण काही मुद्दाम पत्र उघडलेलं नाही. शिवाय हे लोक तर काकूंचे नातेवाईक. आपल्यासुद्धा ओळखीचे. काकूंनी त्यांना खुशाली कळवली असेल. दोन-तीन महिने कोकणात गावी जाणार ते कळवलं असेल आणि मग त्यांचंही कुशल विचारलं असेल. काकूंच्या या पत्रात असं काय खाजगी असणार आहे?

आणि मग चंदानं पत्र वाचायला सुरुवात केली.

काकूंचं अक्षर कसं छान, अन् पत्रही व्यवस्थित समास सोडून लिहिलेलं होतं. वरती श्री, उजव्या कोपऱ्यात पत्ता, पत्त्याखाली दि. ५ ऑक्टो. असं सगळं पद्धतशीर होतं. पत्रात

लिहिलं होतं-

चि. शिरीषला अनेक आशीर्वाद.

तुझं पत्र मिळालं. दूरदर्शनच्या नव्या मालिकेसाठी आमच्या शेजारच्या चंदाची चाचणी घ्यायचा तुझा विचार समजला. खूप आनंद झाला. चंदा खरंच चांगली मुलगी आहे. सौ. रजनीकडून तुला सगळं कळलं आहेच. चंदा शाळेच्या नाटकात नेहमी भाग घेते आणि बक्षिसं मिळवते. निवड झाली तर तुमच्या कामात तिच्या आईवडिलांचं सहकार्य नक्की मिळेल. तुम्हाला घाई आहे. तरी माझं पत्र पोहोचताच तू त्यांचेकडे फोन कर. म्हणजे १५ ऑक्टोबरच्या चाचणीसाठी ती येऊ शकेल. त्यांचा फोन नं...

चंदाला पत्र पुढे वाचताच येईना. कारण... कारण त्यादिवशी तारीख होती १८ ऑक्टोबर! चंदाच्या डोळ्यांत पाणीच आलं. एक सुंदर संधी दार ठोठावत होती अन् शेवटी कंटाळून, चंदाला वेडावून निघून गेली होती. निव्वळ तिच्या स्वत:च्या निष्काळजीपणामुळे! वेंधळेपणामुळे!

**—शकुन्तला फडणीस**


❖

रॉकेट, यान यांचं अंतराळातलं भ्रमण होतं कसं?
पृथ्वीच्या आतबाहेर नक्की काय आहे?
जमीन, समुद्र, आकाश कुठपर्यंत पसरलं आहे?
पशू-पक्षी आले कुठून? कसे? आणि जगतात कसे?
प्राण्यांचं विश्व आपल्याला कधीतरी दिसेल का?
सुरुवातीला आपण माणसं कुठून आलो? कसे होतो?
त्यावेळी आपली भाषा, संस्कृती, रीतिरिवाज कसे होते?
हो! हो! हो!
या सगळ्या प्रश्नांची उत्तरं आपल्याला मिळतील एकाच खजिन्यात!














**अंतराळ । आपले पूर्वज । भूगोल । खगोल । पशू-पक्षी । प्राणिजगत**


डॉ. बाळ फोंडके


**६ विषयांचं वैविध्य असणारा आगळा वेगळा संच!**



**किंमत प्रत्येकी ५० रु.**


वरील ६ पुस्तकांचा एकत्र संच घेणे आवश्यक आहे.



खालील प्रत्येक चित्रास एक क्रमांक दिलेला आहे. त्यानुसार अंकाची बेरीज करा व उत्तर लिहा.






अ  +  = ७

ब  +  = 


क  +  = 

ड  +  = 

इ  +  = 






## महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे

(डेक्कन व्हर्नाक्युलर ?्रान्सलेशन सोसाय?ी)

तर्फेचा पुरस्कार

# मी मलाला

या मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित

सुप्रिया वकील अनुवादित


आत्मकथनास जाहीर झाला आहे.


हार्दिक अभिनंदन !


RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 May, 2016. Posting Date : 11 May, 2016.

# काही निवडक पुस्तके







## मेहता मराठी ग्रंथजगत

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, ____________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.